
मराठी अस्मितेचा आवाज बुलंद करण्याचे कार्य गेली २७ वर्षे करणारे 'दैनिक वृत्तमानस' आता घरोघरी पोचवण्याचे काम आम्ही करणार आहोत. वाचकांना आमच्या लोकप्रिय दैनिकाची प्रत उपलब्ध होत नसेल तर या दूरध्वनींवर संपर्क साधावा.
**दातार अँड सन्स न्युज पेपर डिस्ट्रिब्युटर्स**
भ्रमणध्वनी - ८६५५१९४४५२, ८५९१६६२६१६,९८६७३०८०६३

मराठी अस्मितेचा बुलंद आवाज.
https://epapervrittamanas. in/

# वृत्तमानस

Email : vrittamanas1@gmail. com
मुंबई/ पालघर | मुंबई, मंगळवार, २० ऑगस्ट २०२४ | वर्ष- २९ | अंक - ६१ | पाने- ८
आर. एन. आय क्र. - ६५६०९/९६ | किंमत : ३ रुपये

चीन-फिलिपाइन्सची जहाजे दक्षिण चीन समुद्रात पुन्हा भिडली पान ८

## प्रासंगिक

### मुख्यमंत्री होण्याची ठाकरेंना घाई!

दूध पिताना तोंड भाजले की माणूस ताक सुद्धा फुंकून पितो. अशाच काहीशा परिस्थितीत उद्धव ठाकरे यांचा राजकीय प्रवास सुरु आहे. त्यामुळे प्रत्येक राजकीय निर्णय ते सावधपणाने घेताना दिसत आहेत. कोणताही धोका पत्करणास ते तयार नाहीत. म्हणूनच मुख्यमंत्री पदाचा चेहरा आत्ताच जाहीर करा असा पविता उद्धव ठाकरे यांनी घेतला आहे. कारण ज्या शिवसेनेचा हात धरून भाजपा राज्यात आणि देशात मोठी झाली. त्याच भाजपाने केंद्रात आणि राज्यात सत्तेवर येताच शिवसेनेचे पंख कापण्यास सुरुवात केली. यातूनच 2014 साली भाजपा शिवसेनेत निर्माण झालेली कटुतेमुळेच 2019 साली 25 वर्षांची मैत्री संपुष्टात आली. शिवसेनाप्रमुख बाळासाहेब ठाकरे, अटलबिहारी वाजपेयी, प्रमोद महाजन, आणि लालकृष्ण अडवानी यांनी केवळ हिंदूंना समोर ठेऊन घट्ट विणलेला धागा भाजप आणि शिवसेनेच्या नव्या पिढीतील नेत्यांनी तोडून टाकला. मैत्रीचा हा धागा तुटण्यामागचे निमित्त होते राज्याचे मुख्यमंत्रीपद. उद्धव ठाकरे आणि भाजपाचे सर्वे सर्वा अमित शहा यांची बंद दाराआड झालेल्या चर्चेत ठरल्यानुसार पहिली अडीच वर्षे शिवसेनेला मुख्यमंत्री पद द्यावे अशी मागणी उद्धव ठाकरे यांनी केली. पण... अमित शहा यांनी असे काही ठरलेच नाही असे सांगून ठाकरे यांची मागणी अमान्य केली. यामुळे तब्बल 25 वर्षे हिंदुत्वासाठी एकत्रित आलेले शिवसेना, भाजपा हे दोन पक्ष वेगळे झाले. यामुळे काहीसे अस्वस्थ झालेल्या उद्धव ठाकरे यांनी तात्काळ काँग्रेस आणि राष्ट्रवादीशी हातमिळवणी करीत मुख्यमंत्रीपद मिळविले. उद्धव ठाकरे यांना मुख्यमंत्रीपद देण्यामागे काँग्रेस आणि राष्ट्रवादी यांची सदभावना अजिबात नव्हती. फक्त बलाढ्य समजल्या जाणाऱ्या पंतप्रधान नरेंद्र मोदी आणि गृहमंत्री अमित शहा यांना उद्धव ठाकरे आणि त्यांची शिवसेना टक्कर देवू शकते हाच त्यामागे उद्देश होता. आणि अल्पावधितच काँग्रेस, राष्ट्रवादी चा उद्देश सफल झाला. उद्धव ठाकरे आणि त्यांच्या शिवसेनेने सुरुवातीला भाजपाकडे दुर्लक्ष केले. पण केवळ अडीच वर्षात एकनाथ शिंदे यांच्या साथीने शिवसेनेत फूट पाडून उद्धव यांचे मुख्यमंत्रीपद भाजपाने खेचले आणि शिवसेना एकनाथ शिंदे यांचीच आहे असा निर्णय निवडणूक आयोगाने दिला. त्यामुळेच अमित शहा, फडणवीस, शिंदे यांच्या विरोधात शिवसेनेचा जोरदार लढा सुरु झाला. उद्धव ठाकरे याचा हा लढा व्हाया गुजरात करीत दिल्लीला पोहचला. उद्धव यांच्या आक्रमकतेमुळे मोदी आणि शहा यांच्यापुढे हतबल झालेल्या काँग्रेस राष्ट्रवादीला बळ आले आणि उद्धव ठाकरे यांचे नेतृत्व मान्य करत काँग्रेस, राष्ट्रवादी ने लोकसभा निवडणुका लढविल्या. या लोकसभा निवडणुकीत संपूर्ण देशात काँग्रेसने 99 जागा जिंकून यश मिळविलेच पण त्यापेक्षा महत्वाचे म्हणजे राहुल गांधी विरोधी पक्ष नेते झाले. त्यामुळे आपसूकच राहुल गांधी यांचे नाव काँग्रेसचे नेते म्हणून देशात नोंदले गेले. आश्चर्य म्हणजे 2014 आणि 2019 साली काँग्रेसचा दारुण पराभव झाल्यावर काँग्रेसचा नेतृत्वाचा चेहरा बदलायला हवा असे राहुल गांधी बाबत टिपण्णी करणाऱ्या शरद पवारांना आता राहुल गांधी याच्याबरोबर चर्चा करावी लागत आहे. कारण पवारांनाही कळून चुकले आहे की राहुल गांधी बाबत जनतेच्या मनात क्रेझ निर्माण झालेली आहे आणि होत आहे. हे सारे पाहता आगामी विधानसभा निवडणुकीत मुख्यमंत्री म्हणून उद्धव ठाकरे यांच्या नावाला काँग्रेस मान्यता देणे कितपत शक्य आहे असा प्रश्न निर्माण झाला आहे. काँग्रेसने तसे करणे म्हणजे आपल्या पायावर दगड मारून घेण्यासारखे ठरेल. भाजपाला मोठे करुन काहीच मिळाले नाही याची पुनरावृत्ती काँग्रेसच्या बाबतीत म्हणूनच उद्धव ठाकरे मुख्यमंत्री पदाबाबत घाई करत आहे असेच म्हणावे लागेल. राज्यातील राजकीय वातावरण पाहता काँग्रेस नेतृत्वाला पक्के ठाऊक आहे की शिवसेना आणि राष्ट्रवादी पेक्षा जास्त जागांवर काँग्रेसला यश मिळणार आहे. कारण लोकसभा निवडणुकीत उद्धव ठाकरे यांच्याबाबत असलेली सहानुभूती आता मागे पडली आहे. त्यामुळे विधानसभा निवडणुकीत राहुल गांधी यांचे नवे नेतृत्व पुढे आलेले आहे. पंतप्रधान मोदी आणि शहा यांना राहुल गांधी फाईट देवू शकतात याचीही जाणीव अल्पसंख्यांकांना झालेली आहे. म्हणूनच मुख्यमंत्री पदाचा चेहरा म्हणून उद्धव ठाकरे यांचे नाव काँग्रेस जाहीर करणार नाही असेच म्हणावे लागेल. चमत्कार झालाच तर तो दिल्लीतून होऊ शकेल. याबाबत शरद पवारांची भूमिका संशयाची आहे तशी ती कायमस्वरूपी संशयाची असते. शिवसेना, काँग्रेस पैकी कोणाचे पारडे जड असेल त्यावरच पवारांचा निर्णय ठरेल. तरीही शिवसेनेच्या माध्यमातून कधी काँग्रेसवर तर कधी काँग्रेसच्या माध्यमातून शिवसेनेवर दबाव टाकण्याची खेळी शरद पवार करत राहणारच आहेत. त्यामुळेच मुंबईत झालेल्या महाविकास आघाडीच्या मेळाव्यात सभेचा शिष्टाचार बाजूला ठेऊन उद्धव ठाकरे यांनी सर्वात आधी भाषण तर केलेच, पण... मुख्यमंत्री कोण असेल हे आत्ताच जाहीर करा अशी विनंती म्हणा, मागणी म्हणा, ठाकरे यांनी काँग्रेस आणि राष्ट्रवादी कडे केली. यामुळे काँग्रेसवर दबाव आलाच असेल. पण शरद पवार आणि नाना पटोले यांनी कोणाचेही नाव जाहीर न करता उद्धव ठाकरे यांच्या विनंती कडे दुर्लक्ष केले. नियतीचा खेळ कसा असतो ते पहा. मुख्यमंत्री पदाचा चेहरा जाहीर करा असे आज सांगत असणारे उद्धव ठाकरे कोणे एके काळी असेच काँग्रेस सारखे वागले होते. 1999 साली राज्यात शिवसेना भाजपा युतीचे सरकार होते आणि नारायण राणे मुख्यमंत्री होते. शिवसेना भाजपाला राज्यात निवडणुकीसाठी चांगले वातावरण आहे असे सांगत प्रमोद महाजन, मनोहर जोशी, उद्धव ठाकरे यांनी बाळासाहेबांच्या गळी उतरविले . त्यामुळे सहा महिने आधी मुदतपूर्व निवडणुका झाल्यात. परिणामी नारायण राणे यांना सहा महिने आधी मुख्यमंत्री पदाची खुर्ची सोडावी लागली. त्यानंतर झालेल्या निवडणुकीत मुख्यमंत्री पदाचा चेहरा म्हणून नारायण राणे यांचे नाव सुचवावे असे मनोहर जोशी, सुभाष देसाई वगळता सर्वच शिवसेना नेत्यांचे म्हणणे होते. पण उद्धव ठाकरे यांच्यामुळेच बाळासाहेब नारायण राणे यांचे नाव जाहीर करू शकले नाहीत अशी त्यावेळी राजकीय वर्तुळात जोरदार चर्चा होती. किंबहुना उद्धव ठाकरे यांचे म्हणणे असे होते की..मुख्यमंत्री पदाचा चेहरा पाहून मतदार मतदान करीत नाहीत तर पक्ष पाहून मतदान करतात. इतकेच नाही तर नारायण राणे यांना खिजविण्यासाठी उद्धव ठाकरे यांनी एका सभेत असेही सांगितले की मुख्यमंत्री कोण होणार हे आम्ही आत्ताच सांगणार नाही! वेळ आली तर गोपीनाथ मुंडेही मुख्यमंत्री होऊ शकतात. मग आत्ता होणाऱ्या विधानसभा निवडणुकीत मुख्यमंत्री पदाचा चेहरा कोणाचा असेल याची घाई उद्धव ठाकरे यांना का लागली आहे! असा प्रश्न निर्माण होणे साहजिकच आहे आणि हे न समजण्याइतकी काँग्रेस अजिबात खुळी नाही.

**- सुरेंद्र मुळीक**

# महायुतीला तडे

## अंतर्गत वाद चव्हाट्यावर

## कदम-चव्हाण वादात थेट तोंड फोडण्याच्या भाषेमुळे खळबळ

**प्रतिनिधी**
**मुंबई**

विधानसभा निवडणुकीवर डोळे ठेवत महायुती सरकारने लाडकी बहीण, लाडका भाऊ यासारख्या योजना आणल्या. या योजनांच्या श्रेयवादावरून महायुतीत आधीच चांगलीच जुंपली होती. त्यात आता महायुतीत मोठ्या प्रमाणात 'खडाखडी' सुरु झाली आहे. आजतर शिवसेना नेते रामदास कदम आणि सरकारमधील मंत्री रविंद्र चव्हाण यांच्यात अगदी मवाली भाषेत जाहीर भांडण झाले. मुंबई-गोवा महामार्गाची भयंकर स्थिती चौदा वर्षात तशीच



आहे. त्याला मंत्री रविंद्र चव्हाण जबाबदार असून अशा कुचकामी मंत्र्यांनी राजीनामा द्यावा, अशी मागणी रामदास कदम यांनी केली. तर चव्हाण यांनी कदम यांच्या या मागणीला प्रत्युत्तर देताना तुम्ही तुमच्या काळात काय केलं त्याचा हिशोब आधी द्या, असं सांगितलं. तसेच तुमच्यासारखी भाषा आम्हालाही वापरता येते असे सांगून थेट त्यांचे तोंड फोडण्याचीच भाषा केल्याने एकच खळबळ उडाली. एका कॅबिनेट मंत्र्याने अशी भाषा वापरल्याने आज हा एक मोठ्या चर्चेचा विषय ठरला होता.

गेल्या काही दिवसांपासून घडत असलेल्या घटनांमुळे विधानसभेपूर्वी महायुती तुटण्याच्या चर्चा राजकीय वर्तुळात सुरू झाल्या आहेत. महायुतीतील अंतर्गत मतभेद आणि श्रेयवादाची लढाई आता चव्हाट्यावर आली आहे. भाजप अजित पवार आणि एकनाथ शिंदे गटातील नेते एकमेकांवर आरोपांची चिखलफेक करत आहेत. एकमेकांवर आरोप-प्रत्यारोप करण्यासह या तिन्ही गटातील अंतर्गत वादही उफाळून येत आहेत.

आज तर टीकाटिप्पणीची परिसीमा झाली. सेना नेते रामदास कदमांनी मंत्री रवींद्र पान 8 वर

### खुलासा मागण्याची मिटकरींची लायकी नाही - मुळीक



जनसन्मान यात्रेदरम्यान जुन्नर तालुक्यात अजित पवार यांना भाजपकडून काळे झेंडे दाखवण्यात आले. तसेच अजित पवारांच्या विरोधात घोषणाबाजीही करण्यात आली होती. या घटनेने संतप्त झालेल्या आमदार अमोल मिटकरींनी देवेंद्र फडणवीसांकडे खुलासा मागितला होता. त्यावर पुण्यातील भाजप आमदार जगदीश मुळीक यांनी खुलासा मागण्याची मिटकरींची लायकी नसल्याचे सांगत त्यांच्यावर जोरदार निशाणा साधला. आम्ही असल्या फालतू मागण्या खपवून घेणार नाही. मिटकरी यांनी आपली राजकिय उंची पहावी आणि बोलावे. देवेंद्र फडणवीस हे राज्याचे नेते आहेत.

### राजकीय रक्षाबंधन



**नवी दिल्ली - शिंदे शिवसेनेच्या नवनियुक्त आमदार भावना गवळी यांनी दोन दिवसांपूर्वीच दिल्ली येथे असतांना पंतप्रधान नरेंद्र मोदी यांना राखी बांधून रक्षाबंधनाचा सण साजरा केला. पंतप्रधान नरेंद्र मोदी यांना दरवर्षीप्रमाणे यंदा रक्षाबंधनानिमित्त राखी बांधत मी रक्षाबंधन साजरा केला. मी भाऊ म्हणून मोदी यांना राखी बांधेतच, असे गवळी म्हणाल्या.**



**मुंबई- रक्षाबंधनाच्या निमित्ताने सोमवारी 'मातोश्री'वर शिवसेना नेत्या सुषमा अंधारे यांनी पक्षप्रमुख उद्धव ठाकरे यांना राखी बांधली. 'इडा पीडा जाऊ दे... भावाचे राज्य येवू दे... भावाला माझ्या सौख्य लाभू दे...', अशी मनोकामना यावेळी अंधारे यांनी व्यक्त केली.**

#### झेलेन्स्कींचं निमंत्रण स्वीकारलं...

### नरेंद्र मोदींचा यूक्रेनचा दौरा करणार



**नवी दिल्ली :** पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या विदेश दौऱ्याबाबत मोठी माहिती समोर आली आहे. पंतप्रधान नरेंद्र मोदी 21 ऑगस्टपासून दोन देशांच्या विदेश दौऱ्यावर रवाना होणार आहेत. विशेष बाब म्हणजे या दौऱ्यात नरेंद्र मोदी यूक्रेनचा दौरा देखील करणार आहेत. मोदींचा यावेळचा विदेश दौरा पोलंड आणि यूक्रेन या दोन देशांमध्ये असेल. रशिया आणि यूक्रेन यांच्यातील युद्ध सुरु झाल्यानंतर भारतानं दोन्ही देशांनी युद्धाचा मार्ग वापरण्याऐवजी सामंजस्यानं अन् चर्चेनं विषय सोडवावा अशी भूमिका घेतली होती. काही महिन्यांपूर्वी पंतप्रधान मोदी यांनी रशियाचा दौरा केला होता. आता मोदी पोलंड आणि यूक्रेनचा दौरा करणार आहेत.

### सोन्याचा नारल ,वाहीन दर्याला...





छाया : राजेश वराडकर

समुद्र म्हणजे कोळी समाजाचे आराध्य दैवत. खवळलेल्या आपल्या 'समिंदर देवा'ला शांत करण्यासाठी सोमवारी वरळी कोळीवाडा येथे कोळी बांधवानी पारंपरिकरितीने नारळीपौर्णिमा पारंपरिक पद्धतीने साजरा केला. कोळीवाडा येथे कोळी बांधवानी सोन्याचे वर्ख असलेला नारळ समुद्राला वाहून 'मासेमारीसाठी खोल समुद्रात गेल्यावर वर्षभर आमचे रक्षण कर. आमच्यावर कृपादृष्टी ठेव' असे साकडे घातले. या सोहळ्यात स्थानिक आमदार ,युवासेनाप्रमुख आदित्य ठाकरे हेसुद्धा सहभागी झाले होते. सोबत मुंबईच्या माजी उपमहापौर हेमांगी वरळीकर आणि अन्य मान्यवर.

### उधमपूरमध्ये दहशतवादी हल्ला; एक जवान शहीद

**उधमपूर :** जम्मू-काश्मीरमधील उधमपूर जिल्ह्यात सुरक्षा दल आणि दहशतवाद्यांच्यात चकमक सुरू झाली आहे. या चकमकीत सीआरपीएफमधील इस्पेक्टर शहीद झाले आहेत. दहशतवाद्यांसोबतची ही चकमक उधमपूरमधील डुडू तालुक्यातील चिल परिसरात झाली. डीआयजी मोहम्मद भट सोमवारी दुपारी तीनच्या सुमारास सुरक्षा दलासोबत गस्त लावत असताना दहशतवाद्यांसोबत चकमक झाली. या चकमकीत दोन्ही बाजूंनी गोळीबार झाला. सुरक्षा दलांनी दहशतवाद्यांचा पाडाव करण्यासाठी सर्च अ‍ॅण्ड डेस्टॉय ऑपरेशन सुरू केले.

### मालवणच्या समुद्रात बोट उलटली; तिघे बुडाले

**मालवण ।** नारळी पौर्णिमा आणि रक्षाबंधन सण राज्यभरामध्ये मोठ्या उत्साहात आणि आनंदात साजरा होत असताना सिंधुदुर्गमध्ये नारळी पौर्णिमा सणाला गालबोट लागल्याची घटना घडली आहे. मालवणमध्ये मासेमारी बोट बुडून 3 जणांचा मृत्यू झाला आहे. तिघांचे देखील मृतदेह सापडले असून हे सर्व खलाशी आचराचे असल्याची माहिती समोर आली आहे. आचरा येथील चार खलाशी मासेमारीसाठी रविवारी रात्री सर्जेकोट समुद्रात गेले होते. समुद्रामध्ये निर्माण झालेल्या धुक्यांमुळे बोट दगडाला आपटली.

**सविस्तर वृत्त पान 6 वर**

### काँग्रेसी आमदार झिशान यांना गुलाबी भुरळ

#### अजित पवारांच्या रॅलीचं केलं जोरदार स्वागत

**प्रतिनिधी**
**मुंबई**

महाविकास आघाडीनं लाडकी बहिण योजनेवर टीका केली होती. मात्र, काँग्रेस आमदार झिशान सिद्दीकी यांनी मुंबईत उघडपणे अजित पवारांच्या जनसन्मान रॅलीचं जोरदार स्वागत करत राष्ट्रवादीशी जवळीक वाढवली. आमदार या नात्यानं मी त्यांचं स्वागत केलं आहे, असं झिशान यांनी सांगितलं असलं तरीही भाषण करताना त्यांची काँग्रेस विरोधातली आपली खदखद व्यक्त केली. तर दुसरीकडे उपमुख्यमंत्री



अजित पवार यांनीही झिशान सिद्धीकी यांचं जाहीर कौतुक केलं.

नुकत्याच झालेल्या विधान परिषद निवडणुकीत काँग्रेसच्या सात आमदारांनी क्रॉस व्होटिंग केले होतं. गुप्त मतदानामुळे आमदारांची नावं समोर आली नव्हती, परंतु काँग्रेसनं झिशानसह सात जणांना ओळखल्याचं बोललं जातंय. त्यानंतर काँग्रेस आणि झिशान यांच्यात दुरावा निर्माण झाला. काँग्रेसेचे माजी मंत्री बाबा सिद्धकी यांनी अजित पवारांच्या राष्ट्रवादीत प्रवेश केल्यानंतर झिशान यांच्या राष्ट्रवादी प्रवेशाची चर्चा रंगली. जनसन्मान यात्रेत झिशानच्या उपस्थितीवरून काँग्रेसचे ज्येष्ठ नेते बाळासाहेब थोरात यांनी टायमिंग साधत टोलेबाजीही केली.

पान 8 वर

### मराठा आरक्षण देण्यात फडणवीसांची मोलाची भूमिका, त्यांचा विरोध आहे म्हणणे चुकीचे!

#### मुख्यमंत्री शिंदेंचे मनोज जरांगेंच्या आरोपाला प्रत्युत्तर

**प्रतिनिधी**
**मुंबई**




मराठा समाजाला आरक्षण देण्यात देवेंद्र फडणवीस यांची मोलाची भूमिका आहे. यापूर्वी देखील ते मुख्यमंत्री असतांना त्यांनी मराठा समाजासाठी विविध योजना आणल्या. यावेळी देखील आमच्या मंत्रिमंडळातील सर्व सहकाऱ्यांनी मराठा समाजाला आरक्षण देण्याचा निर्णय एकमताने घेतला. यात फडणवीसांसह अजित पवार यांचा देखील मोठा सहभाग होता. त्यामुळे मराठा आरक्षणाला फडणवीसांचा विरोध आहे, असे म्हणणे चूकीचे आहे, अशी भूमिका मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी मांडत जरांगे यांच्या आरोपाला प्रत्युत्तर दिले आहे.

मुख्यमंत्री निवासस्थान असलेल्या वर्षा बंगल्यावर आज राज्यभरातील महिलांनी मुख्यमंत्री शिंदे यांच्यासाठी राख्या पाठवल्या होत्या. तर मुंबईसह राज्यभरातील महिला भगिनी शिंदे यांना राखी बांधण्यासाठी वर्षा बंगल्यावर देखील दाखल झाल्या होत्या. यावेळी त्यांनी महिलांशी संवाद साधला.

मुख्यमंत्री शिंदे पुढे बोलताना म्हणाले की, आमचे सरकार हे देना बॅंक आहे, देणारे आहे. तर विरोधक हे केवळ घेणारे लोक आहेत. विरोधकांनी सुरूवातीपासून मुख्यमंत्री लाडकी बहीण योजनेला विरोध केला. ते म्हणाले की, हे लोक पैसे देणार नाहीत, पण आम्ही ते दिले. आम्ही शब्दाचे पक्के आहोत. आता विरोधक महिलांना सांगत आहे की, पैसे काढून घ्या, नाहीतर सरकार पुन्हा वापस करून घेईल. पण विरोधकांना मी सांगू इच्छितो की, आम्ही माता भगिनींचा विचार करणारे लोक आहोत. या योजनेचे पैसे जशी जशी आमची ताकद वाढेल तशी त्याची रक्कम देखील वाढविण्याचा आमचा मानस आहे.

**'वर्षा'वरील रक्षाबंधन / पान3**

*मुंबई: देशातील सर्वोच्च मानाचे पुरस्कार म्हणून ओळखल्या जाणाऱ्या राष्ट्रीय चित्रपट पुरस्कारांमध्ये यंदा चित्रपटेतर विभागात सर्वोत्कृष्ट चरित्रात्मक वा ऐतिहासिकपट म्हणून अशोक राणे लिखित ,दिग्दर्शित ,निर्मित ' आणखी एक मोहेंजोदारो ' या माहितीपटाला रजत कमळ पुरस्कार जाहिर झाला आहे ,गिरणगावचा १९५४ पासूनचा इतिहास आणि गिरणी कामगारांची कथा-व्यथा या माहितीपटात मांडण्यात आली आहे ,अशोक राणेंचा हा चौथा राष्ट्रीय पुरस्कार असून ते' अक्षर प्रकाशनाचे ' ज्येष्ठ लेखक आहेत .प्रभात चित्र मंडळ आणि यशवंतराव चव्हाण प्रतिष्ठान याच्या संयुक्त विद्यमाने आयोजित या माहितीपटाचा प्रिमियर नरिमन पॉईंटच्या यशवंतराव चव्हाण सेंटरमधे शनिवारी आयोजित करण्यात आला होता या कार्यक्रमादरम्यान 'अक्षर प्रकाशनाचे ' व्यवस्थापक चंद्रकांत माळगवे यांनी प्रकाशनाची पुस्तकं देवून राणे यांचे अभिनंदन केले.*



## थोडक्यात

### मधुमेहावर नोव्हालीड फार्मा ने डायअल्कस केले विकसित

**मुंबई:** भारतीय आयुर्विज्ञान संशोधन मंडळाच्या मधुमेह विभागाने २०२३ मध्ये केलेल्या पाहणीनुसार भारतात मधुमेहाचे १० कोटी रुग्ण आहेत तर आणखी १३ कोटी ६० लाख व्यक्ती मधुमेह पूर्व अवस्थेत आहेत. हे भारतापुढील एक कठीण आव्हान आहे आणि २०३० या वर्षापर्यंत भारत जगात मधुमेहाची राजधानी म्हणून ओळखला जाण्याची भीती आहे. या गंभीर आव्हानाचा सामना करण्याचा एक भाग म्हणून डायअल्कस हे डायबेटिक फूट अल्सर (मधुमेहींच्या पायाला झालेल्या ब-या न होणा-या जखमा) या समस्येवरील उपचारासाठी प्रभावी औषध भारतीय बाजारपेठेत सादर केल्याचे इप्का लॅबोरेटरी ने जाहीर केले आहे. नोव्हालीड फार्मा प्रा. लि. यांनी डायअल्कस विकसित केले असून डायबेटिक फूट अल्सर वरील उपचारांच्या बाबतीत ते एक नवे पाऊल ठरणार आहे. या औषधाला CDSCO Central Drugs Standard Control Organization) या औषध विषयक नियंत्रक संस्थेने मंजुरी दिली आहे. डायअल्कस च्या विमोचन सोहळयाला प्रेमचंद गोधा, ए के जैन आणि सुप्रीत देशपांडे यांच्यासह अनेक नामवंत उपस्थित होते. इप्का लॅबोरेटरीचे कार्यकारी अध्यक्ष प्रेमचंद गोधा म्हणाले, की" मधुमेह झालेल्या व्यक्तींपैकी १० टक्क्यां पेक्षा जास्त व्यक्तींना त्यांच्या आयुष्यात एकदा तरी डायबेटिक फूट अल्सर चा त्रास होतो आणि हा आजार अनियंत्रित मधुमेहामुळे निर्माण होणा-या समस्यांपैकी एक आहे.

### उद्योजक विजय केळुसकर यांचे आकस्मिक निधन



**मुंबई:** पालघर जिल्ह्यातील तारापूर जवळील रासायनिक कारखान्याचे मालक, पश्चिम उपनगरातील प्रथितयश उद्योजक विजय शंकर केळुसकर यांचे काल रात्री बोरीवली पूर्व येथील एका खासगी रुग्णालयात आकस्मिक निधन झाले. वयाच्या ७२ व्या वर्षी त्यांनी अखेरचा श्वास घेतला. त्यांच्या पश्चात पत्नी अनुराधा, सुना, नातवंडे असा परिवार आहे. काही काळापूर्वी त्यांच्या दोन्ही मुलांचे ऐन उमेदीच्या काळात निधन झाल्यामुळे केळुसकर परिवार दुखाच्या छायेतून बाहेर येत नाहीत तोवर कर्ते सवरते उद्योजक विजय केळुसकर काळाच्या पडद्याआड गेले. जय महाराष्ट्र नगर, बोरीवली पूर्व येथील एकता विनायक सार्वजनिक गणेशोत्सव मंडळाच्या उपनगराचा राजा, मागाठाणे मित्र मंडळ तसेच विविध शैक्षणिक, सामाजिक संस्थांशी त्यांचा निकटचा संबंध होता.

**महत्त्वपूर्ण निवेदन**

वृत्तपत्रामध्ये प्रसिद्ध होणाऱ्या जाहिरातीचा मजकूर स्वीकारण्यापूर्वी काळजी घेतली जात असली तरी त्याच्या आशयाची पडताळणी करणे शक्य होत नाही. तरी आपल्या वृत्तपत्रामध्ये प्रसिद्ध होणाऱ्या जाहिरातीतील जाहिरातदार कंपन्या, सहयोगी संस्था अथवा व्यक्तीबरोबर व्यवहार केल्यामुळे कोणत्याही स्वरूपाचे नुकसान व हानी झाल्यास त्यासाठी अथवा संबंधित जाहिरातीतील आशयासाठी मरिक मीडिया अँड कम्युनिकेशन्स प्रा. लि.ला जबाबदार ठरविता येणार नाही. त्यामुळे जाहिरातदारांना कोणतीही रक्कम प्रेषित करण्यापूर्वी अथवा त्याच्याबरोबर कोणत्याही स्वरूपाचे संमतिपत्र कार्यसिद्ध करण्यापूर्वी अथवा एखाद्या जाहिरातीवर आधारित कोणतीही कृती करण्यापूर्वी वाचकांनी आवश्यकती चौकशी करण्याची खबरदारी घ्यावी.

## वसई विधानसभेसाठी भाजपमध्ये मोठी चुरस

# मनोज पाटील यांच्यानंतर माजी नगरसेवक किरण भोईरही उमेदवारीसाठी इच्छुक

**प्रतिनिधी**
**■ वसई**

वसई विधानसभा मतदारसंघासाठी स्थानिक भाजप पदाधिकाऱ्यांत मोठी चुरस पाहायला मिळत आहे. यंदाच्या विधानसभा निवडणुकीसाठी वसई विधानसभा प्रथमच भाजपच्या वाट्याला जाण्याची शक्यता आहे. त्यासाठी इच्छुकांची भाऊगर्दी वाढली आहे. सध्या भाजपाच्या पदाधिकाऱ्यांत उमेदवारीसाठी चुरस असली तरी वसई विधानसभा क्षेत्रातील भाजपला मिळालेले भरघोस मताधिक्य पाहता यावेळेस या मतदारसंघासाठी भाजप बाहेरील एखादा मोठा चेहराही आयात करू शकते, असा अंदाज राजकीय जाणकार व्यक्त करत आहेत.

भाजपाचे मनोज पाटील हा भाजपचा वसईतील आक्रमक व अभ्यासू चेहरा म्हणून ओळखला जातो. स्थानिक सत्ताधाऱ्यांना विविध प्रश्नावरून घाम फोडणे, पालिका प्रशासनाच्या कारभाराविरोधात सातत्याने आक्रमक पवित्रा घेणे ही त्यांचा राजकीय लौकीक सध्या वसईत उदयास येत आहे. मात्र याच धर्तीवर आता वसई- विरार शहर महानगरपालिकेतील भाजपाचे एकमेव नगरसेवक तथा गटनेता किरण भोईर हेदेखील विधानसभा निवडणुकीसाठी इच्छूक असल्याचे समजते. वसईत भाजपाचे संघटन नसल्या काळापासून ते सलग तिसऱ्यांना वसईत दांडग्या जनसंपर्कावर निवडून आले आहेत. तसेच भाजप पक्षाच्या विस्तारात त्यांचे मोलाचे स्थान आहे. विविध प्रशासकीय कामे हाताळण्याची त्यांची हातोटी विलक्षण आहे. त्यामुळे मनोज पाटील या इच्छुक चेहऱ्याबरोबरंच माजी नगरसेवक किरण भोईर यांचे नाव इच्छुकांच्या रांगेत आघाडीवर आहे.

वसई विधानसभा मतदारसंघ हा बविआचा बालेकिल्ला असला तरी यावेळच्या लोकसभा निवडणुकित बविआला भाजपाने व ठाकरे गटाने मात दिली. बविआचे वसईतील मताधिक्य मोठ्या प्रमाणात घटल्याचे यावेळी दिसून आले. त्याच धर्तीवर संधीचे सोने करण्यासाठी भाजप पक्ष रणांगणात उतरण्याच्या तयारित आहे. मात्र भाजपमधील अंतर्गत इच्छुकांची संख्या लक्षात घेता भाजपला सत्वपरिक्षेला सामोरे जावे लागणार आहे.

## मुख्यमंत्र्यांची वसईतील बहीण नाराज!

# सर्व कागदपत्रांची पूर्तता, तरीही बँक खात्यात पैसे आले नाहीत

**प्रतिनिधी**
**■ वसई**

मुख्यमंत्री लाडकी बहीण योजनेंतर्गत बहीणींना महिना दीड हजार रूपये अर्थसहाय्य करण्याचा राज्य शासनाने घेतलेला निर्णय हा सध्या फारसा फलद्रुप झालेला दिसून येत नाही. रक्षाबंधन सणाच्या आधी बहीणींच्या बँक खात्यावर पैसे येतील असा दावा शिंदे सरकार करत असताना बहुतांश महिला या लाभापासून वंचित असल्याचे वसईत दिसून येत आहे. त्यामुळे वसईतील मुख्यमंत्र्यांची लाडकी बहीण नाराज असल्याचे चित्र दिसून येते.

मुख्यमंत्र्यांनी राज्यभरातील करोडो स्त्रियांना दोन महिन्यांचे मासिक अर्थसहाय्य रूपये 3000/- महिलांच्या बँक खात्यावर जमा केले असल्याचा दावा केला आहे. यात वसईतील शहरी व ग्रामीण भागातील बहुतांश गोरगरीब, सामान्य महिलांच्या बँक खात्यावर अद्याप पैसे न आल्याने त्यांच्यात तिव्र नाराजी आहे. पालघरसारख्या जिल्ह्यात ज्या महिला सधन आहेत, ज्यांच्याकडे गाडी, बंगला आहे. चिक्कार शेती आहे अशा बहीणींच्या कागदपत्रांची पडताळणी न करता त्यांच्या खात्यावर दोन महिन्याचे रूपये 3000 /- जमा झाले आहेत. तर वसईतील खेडोपाड्यातील आदिवासी तसेच इतर समाजातील महिलांनी सर्व कागदपत्रांची पूर्तता करूनदेखील बऱ्यास महिलांना या अर्थसहाय्याचा लाभ मिळालेला नसल्याने त्यांच्यात नाराजीचे वातावरण आहे.

शासनाच्या अर्थसहाय्याचा लाभ मिळावा यासाठी महिलांनी मोठा त्रास सहन करून कागदपत्रे गोळा केली. ऑनलाईन अर्ज भरण्यासाठी मोठ्या रांगा लावल्या, आधार सिडिंग करण्यासाठी त्या बँकेतल्या गर्दीला सामोरे गेल्या. मात्र तरीही मुख्यमंत्र्यांची वसईतील लाडकी बहीणीची पाटी कोरीच राहिल्याने त्यांच्यात नाराजीचे वातावरण आहे.

# बुधवारी अंगणवाडी कर्मचारी महिलांचा एक दिवसाचा राज्यव्यापी संप

## आझाद मैदानावर करणार शक्तीप्रदर्शन

**प्रतिनिधी**
**■ मुंबई**

गेल्या दीड, दोन वर्षांपासून सुमारे २ लाख अंगणवाडी कर्मचारी सतत लढत आहेत. काय मागतायत त्या? जगण्याइतके मानधन, महागाईपासून संरक्षण देणारा महागाई भत्ता, ग्रॅच्युइटीच्या सर्वोच्च न्यायालयाने दिलेल्या अधिकाराची अंमलबजावणी, संपूर्ण आयुष्य योजना राबविण्यासाठी दिल्यानंतर म्हातारपणाची सोय म्हणून मासिक पेन्शन.... ० ते ६ वयोगटाची बालके आणि त्यांच्या माता यांची सर्वतोपरी काळजी घेणाऱ्या, बालकांच्या सर्वांगीण विकासासाठी, त्यांचे कुपोषण दूर करण्यासाठी झिजणाऱ्या या कष्टकरी महिलांच्या मागण्या आहेत या मागण्यांसाठी अंगणवाडी कर्मचारी महिला बुधवारी एक दिवसाचा राज्यव्यापी संप करून आझाद मैदानावर शक्ती प्रदर्शन करणार आहेत.

अंगणवाडी कर्मचाऱ्यांची कृती समिती या मागण्या मान्य करून घेण्यासाठी सर्वतोपरी प्रयत्न करत आहे पण महायुती सरकारच्या दगडी हृदयाला काही पाझर फुटत नाही! त्यांना त्यांचा हक्क द्यायचा सोडून हे सरकार सर्व कल्याणकारी योजनांचा निधी पळवून लाडक्या बहिणींच्या झोळीत घालत आहे. आणि त्यासाठी सुद्धा अंगणवाडी कर्मचाऱ्यांनाच वेठीला धरत आहे. सरकारची कोणतीही योजना येवो, आपले दैनंदिन कामकाज करून अंगणवाडी कर्मचाऱ्यांना त्या योजना यशस्वी करण्यासाठी मर मर राबावे लागते. पण बदल्यात त्यांना काय मिळते? किमान वेतनाच्या पासंगालाही पुरणार नाही असे अल्प मानधन. म्हातारपणी वर्षभर सुद्धा न पुरणारा एकरकमी सेवा समाप्ती लाभ.... बस्स, इतकेच! असे महाराष्ट्र राज्य अंगणवाडी कर्मचारी कृती समितीचे एम ए पाटील, शुभा शमीम, दिलीप उटाणे, कमल परुळेकर भगवानराव देशमुख , जीवन सुरुडे , जयश्री पाटील यांनी सांगितले.




*मुंबई: गोरेगाव युवक काँग्रेसचे सरचिटणीस अमरीश यादव यांच्या हस्ते गोरेगाव पूर्वेतील 500 गरजू मुलांना मोफत वह्या वाटप करण्यात आल्या. याप्रसंगी मुंबई युवक काँग्रेसचे कार्याध्यक्ष सुफियान हैदर, मुंबई काँग्रेसचे सचिव मनोज यादव व चेतन भट्ट, युवक काँग्रेसचे जिल्हाध्यक्ष प्रतिष तिवारी, मिंटू सिंग व काँग्रेसचे अनेक पदाधिकारी उपस्थित होते.*


# सलग सुट्ट्यांमुळे वालीव प्रभागात अवैध बांधकामांचा स्फोट

## पालिकेच्या जेसीबीला लागलाय गंज

**प्रतिनिधी**
**■ वसई**

वसई- विरार शहर महानगरपालिकेचा वालीव विभाग सध्या भूमाफियांच्या पूर्णत: आहारी गेला आहे. या विभागाच्या प्र.सहा. आयुक्त मनाली शिंदे व त्यांची टीम हे भूमाफियांचे आश्रयदाते झाले आहेत. त्यामुळेच शनिवार ते सोमवार अशा तीन सलग सुट्ट्यांमुळे वालीव विभागाच्या राजावली, कामण, नाईकपाडा, जूचंद्र या भागात अनधिकृत बांधकामांचा अक्षरश: स्फोट झाला आहे.मात्र कारवाई होत नसल्याने पालिकेच्या वालीव विभागाचा जेसीबी कारवाईविना गंज लागून खितपत पडला आहे.

नुकतेच वालीव विभागाच्या शिलोत्तर परिसरात अनधिकृत बांधकामांवर कारवाईसाठी गेलेल्या पालिकेचे उपायुक्त अजित मुठे यांच्यावर हल्ला झाला होता. या हल्ल्यानंतर अहंकार दुखावल्या गेलेल्या अधिकाऱ्यांनी शिलोत्तर परिसरात धडक कारवाया करत तेथील हजारो चौरस फुटावरील अनधिकृत बांधकामं नेस्तनाबूत करण्यात आली होती.



पालिका अधिकाऱ्यांवर हल्ले झाल्यानंतरच अधिकाऱ्यांना धडक कारवाईसाठी जाग येत असेल तर पालिका अधिकाऱ्यांवर वारंवार हल्ले होणे गरजेचे आहेत ! असा उपरोधिक टोला वालीवकरांनी लगावला आहे.

वालीव विभागात अनधिकृत बांधकामांचा मोठ्या प्रमाणात स्फोट झाला आहे. सध्या शनिवार ते सोमवार या तीन दिवसांच्या सलग सुट्ट्यांमुळे वालीव विभागातील नाईकपाडा, राजावली, कामण, जूचंद्र येथे अनधिकृत चाळींची बांधकामं मोठ्या प्रमाणात वाढली आहेत. या अनधिकृत बांधकामांमुळे पालिकेच्या महसुलाचे नुकसान होत असून पालिका अधिकारी मात्र हातसफाई करत असल्याचा आरोप नागरिकांनी केला आहे.

# सर्वोच्च न्यायालयाच्या निकालाला आक्षेप घ्यावाच लागेल - डॉ. अँड. माने

**प्रतिनिधी**
**■ मुंबई**

राखीव जागेच्या संदर्भात प्रचंड माहिती उपलब्ध आहे. 1 ऑगस्ट 2024 रोजी सर्वोच्च न्यायालयाचा अनुसुचित जाती / जमातीच्या उपवर्गीकरणाबाबत आलेला निकाल हा आश्चर्यकारक आहे. आम्हा वकील लोकांना अक्षरातून निकाल समजतो परंतु, निकाल हा शब्दांच्या पलिकडे असतो व दोन ओळीमध्ये (बीटविन द लाईन) तो वाचल्या नंतर त्याचा खरा मतीतार्थ कळतो. तो आपणास समजून घ्यावा लागेल. हा निर्णय सर्वोच्च न्यायालयाचा अंतिम असून तो सर्व थरांवर बंधनकारक आहे. केंद्र शासन, राज्य शासन, सर्व न्यायालय व संविधानात्मक आयोग इ. त्याची नोंद घेऊन अमंलबजावणी करणे क्रम प्राप्त आहे. या मधील क्रिमी लेअरचा मुद्दा घटनात्मक नसतांना आल्याने अनुसुचित जाती / जमातीच्या समुहाच्या प्रगतीला दुरगामी परिणाम करणारा असल्याने याला आक्षेप घ्यावाच लागेल असे प्रतिपादन विधी तज्ञ डॉ.अँड. सुरेश माने, यांनी केले.

ते कर्मवीर दादासाहेब गायकवाड सांस्कृतिक केंद्राने अंधेरी (प), चार बंगला येथे आयोजिलेल्या "अनुसुचित जाती/ जमाती उपवर्गीकरण सर्वोच्च न्यायालयाच्या" या जाहीर चर्चेत न्यायालयीन निकाल समजून सांगत होते. अध्यक्षस्थानी जेष्ठ विश्वस्त आयु. रत्नाकर रिपोटे होते.

डॉ. अँड. सुरेश माने पुढे म्हणाले कि, देशात 110 जाती असून महाराष्ट्रात 59 जाती आहेत. जातीचे गट पाडणे राज्याला अधिकार आहे. केंद्रीय शासनात 15% टक्के जागा असून राज्यात 13% टक्के जागा आहे. विभागणी कशी होऊ शकते हा वादातीत विषय असल्यानेसमाजात तंटे व भांडणे होण्याची शक्यता नाकारता येत नाही. समाजा समाजात यामुळे दुहीही होऊ शकते. घटनेने दिलेले समता, स्वातंत्र्य, बंधूत्व व सामाजिक न्यायाचे अधिकारावर परिणाम होऊ शकतात. असे सांगून ते पुढे म्हणाले कि, हरियाणा, केंद्रिय सचिव व महाराष्ट्रातही याची अंमलबजावण्याची प्रक्रिया सुरू झाली आहे. भारत सरकारची एकुण वाटचाल पहाता सर्वोच्च न्यायालयाचा निकाल हा राजकिय आहे असा संशय येण्यास वाव आहे. जेष्ठ पत्रकार मधु कांबळे, यांनी चर्चेत भाग घेतला.

# विधानसभा निवडणुकीसाठी माकपची तयारी सुरु

## तलासरी आणि डहाणू तालुक्यांत कार्यकर्त्यांच्या सभा संपन्न

**प्रतिनिधी**
**■ डहाणू**

येत्या महाराष्ट्र विधानसभा निवडणुकीच्या तयारीसाठी मार्क्सवादी कम्युनिस्ट पक्षाने( माकप) ने तयारी सुरू केली आहे. १७-१८ ऑगस्ट रोजी तलासरी आणि डहाणू तालुक्यांतील १,००० हून अधिक पक्ष कार्यकर्त्यांच्या उपस्थितीत सर्वसाधारण सभा झाली. डहाणू (अज) - पूर्वी जव्हार (अज) - ही जागा १९७८ पासून झालेल्या १० विधानसभा निवडणुकांपैकी ९ निवडणुकांत माकपने जिंकली आहे, आणि तीही ५ वेगवेगळे विजयी उमेदवार देऊन. विद्यमान आमदार माकपचे राज्य सचिवमंडळ सदस्य विनोद निकोले हे २०१९च्या निवडणुकीत प्रथम निवडून आले.

या दोन्ही सभांना माकपचे पॉलिटब्युरो सदस्य डॉ. अशोक ढवळे, राज्य सचिव डॉ. उदय नारकर, जिल्हा सचिव किरण गहला, आमदार विनोद निकोले, तलासरी तालुका सचिव लक्ष्मण डोंबरे, डहाणू तालुका सचिव रडका कलांगडा, राज्य कमिटी सदस्य लहानी दौडा व प्राची हातिवलेकर इत्यादींनी संबोधित केले.

देशातील आणि राज्यातील सद्य राजकीय आव्हानांच्या पार्श्वभूमीवर महाविकास आघाडी (इंडिया) व माकपला विजयी करण्याचा आणि भाजप-रालोआला पराभूत करण्याचा निर्धार दोन्ही सभांनी केला. डहाणू विधानसभा मतदारसंघात येणाऱ्या तलासरी व डहाणू या दोन्ही तालुक्यांत संघर्षाचे आणि संघटनेचे ठोस कार्यक्रम निश्चित करण्यात आले.



*मुंबई: आगरी समाज विकास संघ (चुनाभट्टी) संघाच्या वतीने सालाबादप्रमाणे याही वर्षी नारळी पौर्णिमा उत्सव मोठ्या उत्साहात साजरा करण्यात आला. यावेळी युवा-नेतृत्व नदीम कप्तान मलिक यांनी नारळ फोड स्पर्धेत नारळ फोडून नारळी पौर्णिमेच्या चुनाभट्टीतील नागरिकांना शुभेच्छा दिल्या.*



*मुंबई: भारतीय जनता पार्टीचे नेते शिवाजीराव पाटील यांनी भायखळा राणीबाग येथे जनसंवाद मेळाव्याचे आयोजन केले होते. या मेळाव्यामध्ये मनसे नेते संजय नाईक यांचा जाहीर सत्कार करण्यात आला.*

**जाहीर सूचना**

याद्वारे सूचित करण्यात येत आहे की श्री. झिमाजी सोनू खवळे , "एकसर लक्ष्मी नारायण बिल्डिंग नं.3 CHSL" चे सदस्य आणि खालील उल्लेखित मालमत्तेचे मालक यांचे 06.10.2013 रोजी निधन झाले आणि त्यांच्या पत्नी श्रीमती सावित्री झिमाजी खवळे यांचे 16.03.2022 रोजी निधन (यापुढे एकत्रितपणे "मृत" असे उल्लेखित केले जाईल ).

दिनांक 29.02.2024 रोजी जारी केलेल्या डीड ऑफ रिलीझच्या अंतर्गत, अनुक्रमांक BRL-7-4332-2024 अन्वये सब-रजिस्ट्रार ऑफ ॲश्युरन्सच्या कार्यालयात, मृत व्यक्तीच्या कायदेशीर वारसांद्वारे आणि दरम्यान, (1) सौ नंदा अरुण नवगे (विवाहित मुलगी) उर्फ नंदा झिमाजी खवळे (२) सौ. मधुरा संजय गावकर (विवाहित मुलगी) उर्फ गया झिमाजी खवळे (३) सौ. अपर्णा भालचंद्र पराडकर (विवाहित मुलगी) उर्फ सरोजिनी झिमाजी खवळे (यापुढे "रिलीझर्स" Releasors म्हणून संबोधले जातील), यांनी स्व.श्री झिमाजी सोनू खवळे आणि त्यांच्या पत्नी मार्फत मिळविलेला त्यांचा प्रत्येकी 20% अविभाजित हिस्सा, हक्क, शीर्षक आणि स्वारस्य (१) श्री. आदित्य झिमाजी खवळे आणि (२) श्रीमती रेखा झिमाजी खवळे ( यापुढे ज्यांना "रेलिज्स" Releasees संबोधले जाईल ) यांच्या साठी रिलिज केला आहे त्याद्वारे रेलिज्स खालील शेड्यूल्ड मालमत्तेचे समान मालक बनतात.

त्यानुसार, (1) श्री. आदित्य झिमाजी खवळे, (2) श्रीमती रेखा झिमाजी खवळे आता खाली नमूद केलेल्या मालमत्तेचे मालक असल्याचा दावा करत आहेत.

कोणताही कायदेशीर वारस किंवा इतर दावेदार/आक्षेप घेणारे किंवा सोसायटीच्या भांडवल/मालमत्तेतील मृत सभासदाचे वरील शेअर्स आणि व्याज हस्तांतरित करण्यास आक्षेप घेणाऱ्यांना, अशा कागदपत्रांच्या प्रतींसह आणि इतर कागदपत्रांच्या प्रतींसह ते लेखी कळवावे अशी विनंती केली जाते. सोसायटीच्या भांडवल/मालमत्तेतील मृत सदस्याचे शेअर्स आणि व्याज हस्तांतरित करण्यासाठी त्याच्या/तिच्या/त्यांच्या/त्यांच्या दाव्यांच्या/आक्षेपांच्या समर्थनार्थ पुरावे, अधिवक्ता आशुतोष मौर्या, C/o येथे त्यांच्या कार्यालयात खाली स्वाक्षरी केलेल्यांना विजय सिंग अँड असोसिएट्स, गाला नं. 51, मास्टर इंडस्ट्रीज, मामलतदार वाडी रोड नं. 2, मालाड (पश्चिम), मुंबई – 400 064, या तारखेपासून 15 (पंधरा) दिवसांच्या आत आणि सहाय्यक कागदपत्रांच्या प्रमाणित प्रतींसह आणि/किंवा दस्तऐवज, नमूद केलेल्या जागेसाठी तपासात अयशस्वी झाल्यास असे दावे किंवा आक्षेप विचारात न घेता निष्कर्ष काढला जाईल जे माफ केले गेले आहेत आणि सोडले गेले आहेत आणि ज्यासाठी माझे क्लायंट किंवा मी जबाबदार असणार नाही. कृपया लक्षात घ्या की सार्वजनिक सूचनेद्वारे दिलेली उत्तरे/दावे विचारात घेतले जाणार नाहीत.

**: वर उल्लेखलेले शेड्युल:**

मालकीच्या आधारावर निवासी जागा फ्लॅट क्र. 102, बी विंग 450 चौ. फूट. बिल्ट-अप एरिया, पहिल्या मजल्यावर "एकसर लक्ष्मी नारायण बिल्डिंग क्र. 3 CHSL" एकसर रोड, बोरिवली पश्चिम, मुंबई – 400 103 पत्ता असलेला, सीटीएस क्रमांक 2262/ए/1, 2262/B एकसर, तालुका बोरिवली नोंदणी जिल्हा आणि मुंबई उप-शहरी उप-जिल्हा ह्या जमिनीच्या तुकड्यावर स्थित आहे,

सोबत- 5 (पांच ) पूर्ण पेड-अप शेअर्स 50/- (रुपये पन्नास) प्रत्येक विशिष्ट क्रमांकासह 026 ते 030 (दोन्ही समावेशी) नोंदणी क्रमांक Bom/WR/HSG(TC)/ 1761/1985-86 असलेले "एकसर लक्ष्मी नारायण बिल्डिंग नं.3 CHSL" द्वारे जारी केलेले शेअर प्रमाणपत्र क्रमांक 6 जोडलेले आहे

**2024 च्या या दिवशी दि. २० ऑगस्ट**

**सही/-**
**आशुतोष मौर्य अधिवक्ता, उच्च न्यायालय**

# मुंबई जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँकेतर्फे मुख्यमंत्री माझी लाडकी बहीण योजनेच्या लाभार्थींचे स्नेह संमेलन

**प्रतिनिधी**
**■ मुंबई**

मुंबई जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँकेने "रक्षाबंधनानिमित्त मुख्यमंत्री माझी लाडकी बहीण योजने अंतर्गत लाभार्थी बहीणीचे स्नेह संमेलन" सोमवार,१९ ऑगस्ट रोजी दुपारी २.०० वाजता बँकेच्या केंद्र कार्यालयातील पद्मश्री वसंतदादा पाटील सभागृह, फोर्ट, येथे आयोजित केले होत. सदर स्नेह संमलेनामध्ये बँकेचे अध्यक्ष आमदार प्रविण दरेकर, .कुमारी अदितीताई तटकरे, महिला व बालविकास मंत्री, महाराष्ट्र राज्य व आमदार अँड. आशिष शेलार, अध्यक्ष, भाजपा, मुंबई तसेच बँकेचे संचालक मंडळ सदस्य उपस्थित होते.



सदर कार्यक्रमाच्या वेळी उपस्थित या योजनेतील लाभार्थी महिला भगिनींनी बँकेचे अध्यक्ष आमदार प्रविण दरेकर व प्रमुख उपस्थित असलेले आमदार आशिष शेलार यांना राखी बांधून रक्षाबंधन साजरे केले .

कार्यक्रमास उपस्थिती लाभार्थी महिला भगिनींना संबोधित करताना आमदार प्रविण दरेकर यांनी सांगितले की, मुंबै बँकेने प्रथम झिरो बॅलेन्स बचत खाती उघडण्याचा निर्णय घेवून प्रत्यक्षात कार्यान्वित केला त्यास महिला भगिनींनी प्रचंड मोठया प्रमाणात प्रतिसाद दिला. त्यामुळे मुंबै बँकेच्या ५० शाखांमधून सोमवार १९/०८/२०२४ अखेर एकूण ४०००० बचत खाती उघडण्यात आलेली आहेत. त्यामध्ये दिवसेंदिवस वाढ होत असून या योजनेसाठी अर्ज भरण्याच्या अंतिम तारखेपर्यंत मुंबै बँकेमधून अंदाजे एक लाख गरजू महिलांची बचत खाती उघडण्याचा मानस आहे. त्यांनी पुढे सांगितले की, ज्या महिलांनी मुख्यमंत्री माझी लाडकी बहीण या योजनेत बचत खाती उघडली आहेत त्या लाभार्थी महिलांना शासनाच्या सहकार्याने रु.१ लाखांपर्यंतचे कर्ज शून्य टक्के व्याजदराने उपलब्ध करुन देण्याकरीता शासनाकडे बँकेच्यावतीने पाठपुरावा करण्यात येईल. त्याकरीता मुख्यमंत्री महोदय तसेच दोन्हीही उपमुख्यमंत्री महोदयांना याकरीता विनंती करण्यात येईल.या कार्यक्रमात बोलताना कुमारी अदिती तटकरे, महिला व बालविकास मंत्री, महाराष्ट्र राज्य यांनी प्रथम उपस्थितीत सर्वांना रक्षाबंधनाच्या शुभेच्छा दिल्या.संचालक नितीन बनकर यांनी उपस्थितांचे आभार मानल्यावर स्नेहसंमेलनाची राष्ट्रगीताने सांगता करण्यात आली.

**जाहीर सूचना**

सर्व जनतेला कळविण्यात येत आहे की माझ्या अशील श्रीमती डिम्पल किशोर जैन आणि श्री. किशोर पारसमल जैन ज्यांची सदनिका क्र. ३०२, ३ रा मजला, बलदेव भवन कॉ-ऑप हौ. सो. लि. नारायण नगर रोड, भाईंदर (पू), जिल्हा ठाणे येथे असून त्यांनी नमूद सदनिका श्री. गिरधारीभाई दुर्लभभाई राठोड आणि श्रीमती कमला गिरधारीभाई राठोड ह्यांच्याकडून खरेदी केली होती परंतु पहिला विक्री करार जो मे. भाग्योदय कंस्ट्रक्शन कं. बिल्डर आणि डेवलपर्स आणि श्री. जगदीश बाग आणि श्री. गोपाळ बेग ह्यांच्या दरम्यान करण्यात आलेला विक्री करार दिनांकित २७ जुलै १९८१ आणि श्री सावजीभाई एम. भलाला आणि श्री. गोर्धनभाई एल. संगानी ह्यांच्या दरम्यान करण्यात आलेला तिसरा करार दिनांकित २९ जून १९९० हरवला आहे.
असे की माझ्या अशिलांकडून उपरोक्त नमूद मूळ करार हरवले असून जर कोणत्याही त्रयस्थ पक्षकार/ रांना, बँक/ वित्तिय संस्थांचा नमूद सदनिकेवर हक्क, स्वारस्य आणि नामनिर्देश असल्यास आणि उपरोक्त नमूद हरवलेले करार कोणाला सापडल्यास खाली नमूद पत्त्यावर सदर सूचना प्रसिद्धीपासून १५ दिवसांच्या आत कळवावे आणि जर कोणताही प्रतिसाद प्राप्त न झाल्यास असे जाहीर करण्यात येईल की कोणत्याही व्यक्ती/ व्यक्तिंना, बँक/ वित्तिय संस्थाना उपरोक्त नमूद मूळ कागदपत्रे सापडलेली नाहीत आणि मूळ करार हरवले आहेत असे जाहीर करण्यात येईल.
दिनांक: १९/०८/२०२४

**सही/-**
**श्री. मुकेश एन. राठोड**
वकील, उच्च न्यायालय
दुकान क्र. १६, सॅनटॉक टॉवर,
स्टेशन रोड, भाईंदर (प), जिल्हा ठाणे

Printed and Published by **Bhushan B.Mhatre** for Owner **Marik Media And Communication Pvt .Ltd.** at S.R.Publicatiinns ,Mohan Arjun Compound ,Godown No. 8,9 And 10 , Near Ghartan Pada ,Vaishali Nagar ,Last Bus Stop ,Dahisar (E ) ,Mumbai -400068 and Published From Marik Media And Communication Pvt .Ltd.,102, Shyam Sunder Sadan ,Sitaram Jadhav Marg, Lower Parel ,Mumbai 400013. Editor - **Deepak B. Mhatre**, E-mail vruttmanas1@ gmail.com ,telephone 2498546,24985609. Resident Editor - **Sham Deulkar**

**As per PRB Act Editorial Responsibilities On Deepak B. Mhatre Nespaper Related Desputes Lies Under Jurisdiction of Mumbai Courts**

**Year - Twenty Nine**
**Issu - 61**
**R.N.I. Registration No. - 65609/96**

मुद्रक आणि प्रकाशक **भूषण भा. म्हात्रे** यांनी मालक **मरिक मीडिया अँड कम्युनिकेशन्स प्रा. लि.** साठी, एस. आर. पब्लिकेशन, मोहन अर्जुन कंपाऊंड, गोडाऊन नं. ८,९ आणि १०, घारटन पाडाजवळ, वैशालीनगर लास्ट बस स्टॉप, दहिसर (पूर्व), मुंबई - ४०० ०६८ येथे छापून मरिक मीडिया अँड कम्युनिकेशन्स प्रा. लि., १०२, श्याम सुंदर सदन, सीताराम जाधव मार्ग, लोअर परळ (पश्चिम), मुंबई - ४०० ०१३ येथून प्रकाशित केले. संपादक - **दीपक भा. म्हात्रे,** E-mail: vrittamanas1@gmail.com दूरध्वनी क्रमांक - २४९८५४६, २४९८५६०९ निवासी संपादक - **शाम देऊलकर**

**पी. आर. बी. कायद्यानुसार संपादकीय जबाबदारी दीपक भा. म्हात्रे यांच्यावर राहील. सदर वृत्तपत्रासंबंधीच्या विवादित बाबी मुंबई न्यायालय क्षेत्रात येतील.**

**वर्ष- एकोणतीसावे**
**अंक - ६१**
**आर.एन.आय. रजिस्ट्रेशन क्र.- ६५६०९/९६**

*मुंबई : अदाणी इलेक्ट्रिसिटी आणि अदाणी फाउंडेशनच्या सीएसआर प्रकल्प- -उत्थान अंतर्गत चेंबूर, घाटकोपर, कुर्ला, मालाड आणि कांदिवलीच्या बीएमसी शाळांसोबत पर्यावरणपूरक रक्षाबंधन साजरा केला. "कचऱ्यापासून काहीतरी चांगले बनवा" या थीमवर आधारित या कार्यक्रमाला १८०० हून अधिक विद्यार्थ्यांनी सहभाग घेतला. विद्यार्थ्यांनी आपल्या घरातून गोळा केलेल्या कचऱ्यापासून रक्षाबंधनाची सुंदर बांधणी केली आणि ती झाडांवर, बेंचवर, वर्गातल्या दरवाज्यावर आणि अगदी स्वच्छता कर्मचारी, मदतनीस आणि शिक्षकांच्या हातावरही कृतज्ञतेच्या चिन्ह म्हणून बांधली. या उपक्रमाने विद्यार्थ्यांचा सर्वांगीण विकास घडवून अनन्यात मदत झाली.*




# मध्यान्ह भोजनात साखरयुक्त पदार्थ नको, तज्ज्ञांचे सरकारला आवाहन

प्रतिनिधी
■ मुंबई

महाराष्ट्रातील बालरोगतज्ज्ञांच्या एका गटाने राज्य सरकारला पत्र लिहून शालेय मध्यान्ह भोजनातून साखरयुक्त पदार्थ काढून टाकण्याची विनंती केली आहे. महा अकादमी ऑफ पेडियाट्रिक्सने राज्याचे शिक्षणमंत्री दीपक केसरकर यांना यासंदर्भात पत्र लिहिले आहे. प्रधानमंत्री पोषण शक्ती निर्माण योजनेअंतर्गत मुलांना दिवसातून चार वेळा खीर दिली जाते. पण अतिरिक्त साखरयुक्त पदार्थांमुळे मुलांना मधुमेह आणि लठ्ठपणा होऊ शकतो, असे या तज्ज्ञांचे म्हणणे आहे.



इयत्ता पहिली ते पाचवीच्या विद्यार्थ्यांच्या जेवणात 25 ग्रॅम तर इयत्ता सहावी ते आठवीच्या विद्यार्थ्यांच्या जेवणात 45 ग्रॅम साखरेचा समावेश असेल, असे शासनाच्या जीआरमध्ये म्हटले आहे. वस्तुत: आपल्याला दररोज 25 ग्रॅम साखरेची गरज असते. साधारणपणे साखरेचे दोन प्रकार आहेत. एक जिचे सेवन केले आहे आणि दुसरे जे अन्नामध्ये आधीच असते, असे महा पेडियाट्रिक्स असोसिएशनचे अध्यक्ष डॉ. रामगोपाल चेजारा यांनी सांगितले.

विद्यार्थी दिवसभर इतर पदार्थही खातात, त्यामुळे त्यांच्या साखरेचे प्रमाण वाढते. त्यात साखरेचे प्रमाण आणखी 25 ग्रॅम ते 45 ग्रॅमपर्यंत वाढवल्यास मुलांना मधुमेह आणि लठ्ठपणा होऊ शकतो, असे सांगून डॉ. रामगोपाल चेजारा म्हणाले की, आमच्या पथकांनी शाळांना भेटी दिल्या असून असे गोड पदार्थ देणे बंद करावे, असे आवाहन आम्ही आता सरकारला केले आहे.

ठाकरे शिवसेनेचे नेते आणि विधान परिषदेतील विरोधी पक्षनेते अंबादास दानवे यांनी बालरोग तज्ज्ञांनी लिहिलेल्या पत्राचा संदर्भ देत, सरकारच्या धोरणावर नाराजी व्यक्त केली आहे. सरकार महाराष्ट्रातील शाळकरी मुलांना मधुमेहग्रस्त आणि स्थूल बनवू पाहत असल्याचा आरोप त्यांनी केला. राज्यात पहिली ते आठवीपर्यंतच्या विद्यार्थ्यांना आठवड्यातून चार वेळा जेवणात गोड पदार्थ आणि त्यातील साखरेचे प्रमाण 30-45 ग्रॅम एवढे भरमसाठ ठेवण्याचे तुघलकी निर्णय सरकारने घेतला आहे, ज्याला बालरोग तज्ज्ञांचा आक्षेप आहे.

# 'वर्षा'वर रंगले उमेद महिला बचतगटाचे रक्षाबंधन

## 40 हजार गावांतून शिंदेंना एक कोटी राख्या पाठविण्याचा संकल्प

प्रतिनिधी
■ मुंबई

माझ्या बहिणी राज्याच्या विकासात मोठं योगदान देतात. त्यांना आधार देण्यासाठी जे जे करता येईल ते करेन. आमची ताकद जसशी वाढत जाईल, तशी आर्थिक मदतही वाढवली जाईल, असे सांगत मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी आज येथे राज्यातील बहिणींना रक्षाबंधनाच्या शुभेच्छा दिल्या. तसेच रक्षाबंधनापुर्वी मुख्यमंत्री माझी लाडकी बहीण योजनेतील दोन हप्ते जमा करण्याचा निर्धारही पूर्ण केल्याचे मुख्यमंत्र्यांनी सांगितले.

राज्यातील उमेद अभियानातील महिलांनी मुख्यमंत्र्यांच्या वर्षा शासकीय निवासस्थानी पोहचून, मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांचे औक्षण करून, राख्या बांधल्या. शेकडो बहिणींच्या औक्षण आणि रक्षाबंधनामुळे वर्षा निवासस्थानी मंगल आणि रक्षाबंधनाचे आगळे उत्साही वातावरण होते. राज्यातील 40 हजार गावांतून मुख्यमंत्री शिंदे यांना एक कोटी राख्या पाठविण्यात येणार आहे. या संकल्पाची सुरवात आज वर्षा निवासस्थानी झाली.

या वेळी मुख्यमंत्री शिंदे म्हणाले की, ही केवळ रक्षाबंधनाची ओवाळणी नाही, तर माहेरचा कायमचा आहेर आहे. मुख्यमंत्री माझी बहीण लाडकी योजनेचे दोन हप्ते रक्षाबंधनापुर्वी माझ्या बहिणींच्या खात्यात जमा व्हावेत, असा आमचा प्रयत्न होता, तो शब्द आम्ही पाळला. राज्यातील 1 कोटी 4 लाख महिलांच्या खात्यात पैसे जमा झाले आहेत. अन्य महिलांच्या खात्यातही हळू हळू आधार सिंडींग आणि तांत्रिक बाबी पूर्ण होताच, पैसे जमा होतील. यातून माझ्या बहिणींच्या संसाराला थोडाफार आर्थिक हातभार लागेल, ही आमची भावना आहे, असेही ते म्हणाले.



**उमेदची सदस्यसंख्या १ कोटीवर न्यायचीय -मुख्यमंत्री**

*उमेद अभियानामुळे राज्यात 84 लाख महिला बचतगटांच्या चळवळीशी जोडल्या गेल्या आहेत. ही संख्या देखील 1 कोटीवर न्यायची आहे, सांगून मुख्यमंत्री शिंदे म्हणाले की, आपण सगळ्या बहिणी राज्याच्या विकासात मोठं योगदान देत आहात. तुमच्या उत्पादनांनाही चांगली बाजारपेठ मिळावी असे आमचे प्रयत्न आहेत. मोठमोठ्या मॉलमध्ये, अमेझॉन, फ्लिपकार्ट या प्लटफॉर्मवरही आपली उत्पादने विकली जावीत, यासाठी आमचे प्रयत्न सुरु आहेत. बसस्थानकावर आपल्या स्टॉल्स जागा मिळावेत, असे निर्देश दिलेच आहेत. विमानतळ आणि रेल्वे स्थानकाबाबत केंद्रांशी संपर्क साधून आहोत. उमेद अभियानातील महिला बचत गटांच्या चळवळीला बळकट करण्यासाठी विशेष बैठक बोलावून उपायोजना करण्यात येतील, असेही मुख्यमंत्र्यांनी सांगितले.*

बहिणींनी असेच आमच्या पाठिशी राहावं, सरकारची ताकद जसजशी वाढत जाईल, तसतसे या योजनेतील निधीही वाढवला जाईल. आपण बहिणींनीही आम्हाला ताकद द्यावी असे सांगून मुख्यमंत्र्यांनी या योजनेला बदनाम करणारे, फसवी योजना म्हणणाऱ्यांवर विश्वास ठेवू नये असे आवाहन केले. तसेच महिलांसाठी, मुलींसाठी राबवण्यात येणाऱ्या अन्नपूर्णा योजना, लेक लाडकी, लखपती दिदी या योजनांची माहितीही त्यांनी दिली.

यावेळी उपस्थित भगिनींनी औक्षण करून, मुख्यमंत्र्यांना राख्या बांधल्या. वर्षा शासकीय निवासस्थानी कार्यरत महिला पोलिस अधिकारी-कर्मचाऱ्यांनीही मुख्यमंत्र्यांना राख्या बांधल्या. याचवेळी एका महिला भगिनीने आपण परभणी येथून आले असल्याचे सांगून मुख्यमंत्री भाऊराया प्रमाणे आपल्या पाठीशी उभे राहिल्याचा आनंद झाल्याचे सांगितले. यावेळी मुख्यमंत्री शिंदे यांनीही या बहिणींचे फुलांच्या पाकळयांनी स्वागत केले. मुख्यमंत्र्यांचे वर्षा हे निवासस्थान आलेल्या या सर्व बहिणींचे असल्याची भावनाही व्यक्त केली. यावेळी खासदार डॉ. श्रीकांत शिंदे, आमदार दिलीप लांडे, संजय शिरसाट तसेच ज्योती वाघमारे आदी उपस्थित होते.

# महानगरपालिकेमध्ये कार्यकारी सहायक (लिपिक) पदाच्या 1 हजार 846 जागांसाठी भरती

## २० ऑगस्ट ते ९ सप्टेंबर २०२४ पर्यंत अर्ज करता येणार

प्रतिनिधी
■ मुंबई

बृहन्मुंबई महानगरपालिकेत 'कार्यकारी सहायक' (पूर्वीचे पदनाम: लिपिक) या संवर्गातील १ हजार ८४६ जागा सरळसेवेने भरण्यासाठी प्रक्रिया राबविण्यात येत आहे. या जागांसाठी अर्हताप्राप्त उमेदवारांकडून २० ऑगस्ट २०२४ पासून ऑनलाईन अर्ज मागविण्यात येत आहेत. ९ सप्टेंबर २०२४ रोजी रात्री ११.५९ मिनिटे ही अर्ज करण्याची अंतिम तारीख आणि वेळ आहे. बृहन्मुंबई महानगरपालिकेच्या संकेतस्थळावरीलhttps://www.mcgm.gov.in/irj/portal/anonymous/qlrn या लिंकवर या भरतीबाबत सविस्तर जाहिरात देण्यात आली आहे.

बृहन्मुंबईमहानगरपालिकेतील विविध खात्यांच्या आस्थापनेवरील गट 'क' मधील रु. २५,५००-८११०० (पे मॅट्रिक्स-एम १५) अधिक अनुज्ञेय भत्ते या सुधारित वेतनश्रेणीतील 'कार्यकारी सहायक' (पूर्वीचे पदनाम: लिपिक) या संवर्गातील १ हजार ८४६ रिक्त पदे सरळसेवेने भरण्यात येणार आहेत. यामध्ये अनुसूचित जाती (१४२), अनुसूचित जमाती (१५०), विमुक्त जाती-अ (४९), भटक्या जमाती-ब (५४), भटक्या जमाती-क (३९), भटक्या जमाती-ड (३८), विशेष मागास प्रवर्ग (४६), इतर मागासवर्ग (४५२), आर्थिकदृष्ट्या दुर्बल घटक (१८५), सामाजिक व शैक्षणिकदृष्ट्या मागासवर्ग (१८५), खुला प्रवर्ग (५०६ ) याप्रमाणे रिक्त पदांसाठी ही भरती प्रक्रिया राबवली जाईल. तसेच या पदांचे समांतर आरक्षणानुसार वर्गीकरण करण्यात आले असून त्याची सविस्तर माहिती जाहिरातीमध्ये समाविष्ट आहे.


बृहन्मुंबई महानगरपालिकेच्या संकेतस्थळावरील https://www.mcgm.gov.in/irj/portal/anonymous/qlrn या लिंकवर या पदासाठीची संपूर्ण जाहिरात, अटी व शर्तींसह प्रसिद्ध करण्यात येत आहे. या जाहिरातीमध्ये ऑनलाईन अर्जाची लिंक (यूआरएल) देण्यात आली असून त्यावर क्लिक केल्यानंतर इच्छुक उमेदवारांना अर्ज भरता येईल.

उमेदवारांनी जाहिरातीसोबत दिलेल्या सर्व मार्गदर्शक सुचनांचे काळजीपूर्वक वाचन करावे. तसेच त्यांचे काटेकोरपणे पालन करुन विहित नमुन्यातील ऑनलाईन अर्ज विहित वेळेत सादर करावा. तसेच भरलेल्या संपूर्ण अर्जाची प्रिंट काढून स्वत:जवळ ठेवावी, असे आवाहन बृहन्मुंबई महानगरपालिका प्रशासनाच्या वतीने करण्यात आले आहे. उमेदवारांच्या मार्गदर्शनासाठी ९५१३२५३२३३ हा मदतसेवा क्रमांकही जारी करण्यात आले आहे. सोमवार ते शनिवार सकाळी १० ते सायंकाळी ५ वाजेदरम्यान (दुपारी १.३० ते २.३० वाजेदरम्यानचा भोजन कालावधी वगळता) या क्रमांकावर उमेदवारांना संपर्क साधता येईल, असेही महानगरपालिका प्रशासनाच्या वतीने कळविण्यात आले आहे.

# रक्षाबंधनाच्या निमित्ताने सर्व भावांनी आपल्या बहिणींच्या रक्षणाची शपथ घ्यावी - सीमा सिंह

प्रतिनिधी
■ मुंबई

रक्षाबंधन हा भाऊ आणि बहिणीचे पवित्र नाते दृढ करणारा सण आहे, ज्यामध्ये भाऊ आपल्या बहिणीचे रक्षण करण्याचे वचन देतो. मेघश्री या महानगरातील प्रतिष्ठित सामाजिक संस्थेतर्फे आज वांद्रे पश्चिम येथील अल्मेडा पार्क येथे रक्षाबंधनाचा भव्य कार्यक्रम आयोजित करण्यात आला होता. कार्यक्रमात सहभागी शेकडो महिलांनी भावांच्या मनगटावर राखी बांधली. यावेळी बोलताना संघटनेच्या राष्ट्रीय अध्यक्षा सीमा सिंह म्हणाल्या की बंगालमध्ये महिला डॉक्टरांना ज्या प्रकारे क्रूर वागणूक दिली गेली त्यामुळे



संपूर्ण देशाला लाज वाटली आहे. रक्षाबंधनाच्या निमित्ताने देशातील सर्व बांधवांनी आपल्या बहिणींच्या रक्षणाची शपथ घेतली पाहिजे, असे ते म्हणाले. जेणेकरून देशातील सर्व बहिणी आणि मुली सुरक्षित राहू शकतील. बंगालमध्ये ज्यांनी अत्याचार केले आहेत त्यांना जाहीरपणे फाशीची शिक्षा दिली पाहिजे, असे ते म्हणाले. अशा घटना कोणत्याही परिस्थितीत थांबवायला हव्यात. श्रीमती सिंह म्हणाल्या की, देशातील निम्म्या लोकसंख्येला सुरक्षितपणे जगण्याचा अधिकार मिळायला हवा. यावेळी श्रेयस सिंह आणि डॉ. मेघना सिंह यांची विशेष उपस्थिती होती.

# दलित एकता धरण्याला वाढता पाठिंबा; 'एससी'चे वर्गीय अस्तित्व संपवण्याचा डाव हाणून पाडा!

प्रतिनिधी
■ मुंबई

अनुसुचित जातींना एक स्वतंत्र वर्ग म्हणून संविधानाने दिलेले अस्तित्व ' उप वर्गीकरण ' या गोंडस नावाखाली मोदी सरकार नष्ट करू पाहात आहे. हा डाव हाणून पाडण्यासाठी बुधवारी २१ ऑगस्ट रोजी राज्यभरात होणाऱ्या आंदोलनात दलित जनतेने मोठ्या संख्येने सहभागी व्हावे, असे आवाहन 'आंबेडकरवादी भारत मिशन ' तर्फे आज करण्यात आले.

दरम्यान, या संघटनेने बुधवारी दुपारी १ वाजता मुंबईतील आझाद मैदानात आयोजित केलेल्या ' दलित एकता धरणे ' आंदोलनाला वाढता पाठिंबा मिळू लागला आहे. दलित पँथरचे सह संस्थापक ज. वि. पवार यांच्यापाठोपाठ अनेक संघटना या आंदोलनात उतरणार आहेत.

ऑल इंडिया पँथर सेनेचे अध्यक्ष दीपक केदार, दलित युथ पँथरचे अध्यक्ष नीलेश मोहिते, स्वाभिमानी रिपब्लिकन पक्षाचे नेते सागर संसारे, रिपाइं ( राष्ट्रवादी) चे नेते नामदेवराव साबळे यांनी उद्याच्या आंदोलनात आपल्या संघटना सहभागी होत आहेत,असे जाहीर केले आहे.

तसेच दिवंगत रामविलास पासवान यांच्या दलित सेनेचे नेते रवी गरुड, पीपल्स रिपब्लिकन पार्टी महाराष्ट्राचे अध्यक्ष मिलिंद सुर्वे यांनी शनिवारी बैठकीला उपस्थित राहून आंबेडकरवादी भारत मिशनला पाठिंबा दिला आहे.

आझाद मैदानातील दलित एकता धरणे आंदोलनाचे नेतृत्व बहुजन रिपब्लिकन सोशालिस्ट पार्टीचे अध्यक्ष , संविधान तज्ज्ञ ॲड. डॉ. सुरेश माने, रिपाइं ( सेक्युलर) चे अध्यक्ष श्यामदादा गायकवाड, ज्येष्ठ नेते सयाजी वाघमारे, दलित पँथरचे नेते सुरेश केदारे, सुनील खोब्रागडे आदी करणार आहेत.

केंद्र सरकारच्या विभाजनवादी आणि दलितविरोधी नितीविरोधात आंदोलनासाठी आंबेडकरवादी भारत मिशनतर्फे ज्येष्ठ पत्रकार दिवाकर शेजवळ, सतीश डोंगरे, ॲड. जय धनराज, डॉ.जी.के. डोंगरगावकर , चर्मकार नेते अच्युत भोईटे यांनी पुढाकार घेतला आहे.

# म्हाडाची फेक वेबसाईट बनवणाऱ्या दोघांना अटक

प्रतिनिधी
■ मुंबई

म्हाडा मुंबई मंडळाने नुकतीच 2030 परवडणाऱ्या घरांची सोडत जाहीर केली आहे. 9 ऑगस्टपासून म्हाडा घरांच्या लॉटरीसाठी ऑनलाईन अर्ज भरायला सुरुवात झाली आहे. तुम्ही म्हाडाच्या घरासाठी अर्ज करणार असाल तर ही बातमी तुमच्यासाठी महत्वाची आहे. म्हाडा लॉटरीच्या नावाखाली लोकांची सायबर फसवणूक केली जात असल्याचे धक्कादायक प्रकार सध्या समोर येत आहे. सायबर चोरट्यांनी म्हाडाची हुबेहुब दिसणारी वेबसाईट तयार करुन लोकांची ऑनलाईन फसवणूक केली आहे.

म्हाडाने मुंबईमध्ये 2030 घरांची लॉटरी काढली असून अर्ज भरायला देखील सुरुवात झाली आहे. तसेच मुंबईतील घरांच्या जाहिरातीनंतर मुंबईकरांचाही मोठा प्रतिसाद म्हाडाला मिळत असल्याचे दिसून आले आहे. तसेच चौकशीसाठी विविध माध्यमातून म्हाडाशी संपर्क देखील साधला जात आहे. त्याचाच फायदा घेऊन म्हाडाच्या जाहिरातीचा आधार घेत म्हाडाच्या घरासाठी अर्ज करण्यास फेक वेबसाईट बनवून नागरिकांची लूट करण्यात येत असल्याचीही घटना समोर आता समोर आली आहे. त्यानंतर म्हाडाने सतर्क होऊन मुंबई पोलिसांच्या सायबर विभागाकडे तक्रार दाखल केल्यानंतर त्यामध्ये दोन जणांना अटक करण्यात आली आहे. तसेच शनिवारी रात्री उशिरा एकाला नालासोपारामधून तर दुसऱ्याला माहीममधून सायबर पोलिसांनी ताब्यात घेतले आहे.

**MAHAVITARAN**
Maharashtra State Electricity Distribution Co. Ltd.

**E-TENDER NOTICE**

Tenders are invited from eligible bidders for the work of reorientation of 22 kV lines on Monopole Tower under Vasai circle within Kalyan Zone on Full Turnkey basis as defined in the Bid Documents.
Tender No. **CE/KLNZ/Refloat/T-10R/23-24**
Estimated Amount 586.09 lakhs
Sale period of Tender (Online only):- 20.08.24 to 26.08.24
Submission due date (Online Only):- 26.08.2024 up to 14:00 hrs.
For detail please visit company's Website:- https://etender.mahadiscom.in/eatApp/

**HO PR NO 192/24 dt.19.08.24**
**Sd/-**
**Chief Engineer (O&M) MSEDCL, Kalyan Zone**

**पश्चिम रेल्वे विशेष गाड्यांचा ८ जोड्यांचा विस्तार करत आहे**

| गाडी क्र. | पासून | पर्यंत | प्रचालन दिवस | पासून विस्तारित | पर्यंत विस्तारित |
|---|---|---|---|---|---|
| ०९१४५ | मुंबई सेन्ट्रल | बरौनी | सोमवार | ०७.१०.२०२४ | ११.११.२०२४ |
| ०९१४६ | बरौनी | मुंबई सेन्ट्रल | गुरुवार | १०.१०.२०२४ | १४.११.२०२४ |
| ०९०४९ | दादर | भुसावळ | शुक्रवार | ०४.१०.२०२४ | २७.१२.२०२४ |
| ०९०५० | भुसावळ | दादर | शुक्रवार | ०४.१०.२०२४ | २७.१२.२०२४ |
| ०९०५१ | दादर | भुसावळ | सोम, बुध, शनि | ०१.१०.२०२४ | ३०.१२.२०२४ |
| ०९०५२ | भुसावळ | दादर | सोम, बुध, शनि | ०२.१०.२०२४ | ३०.१२.२०२४ |
| ०९०२५ | वलसाड | दानापूर | सोमवार | ०७.१०.२०२४ | ३०.१२.२०२४ |
| ०९०२६ | दानापूर | वलसाड | मंगळवार | ०८.१०.२०२४ | ३१.१२.२०२४ |
| ०९०४५ | उधना | पटना | शुक्रवार | ०४.१०.२०२४ | २७.१२.२०२४ |
| ०९०४६ | पटना | उधना | शनिवार | ०५.१०.२०२४ | २८.१२.२०२४ |
| ०९०५७ | उधना | मंगळूरू | बुध, रवि | ०३.११.२०२४ | ०८.०१.२०२५ |
| ०९०५८ | मंगळूरू | उधना | सोम, गुरु | ०४.११.२०२४ | ०९.०१.२०२५ |
| ०९५७५ | राजकोट | महबुबनगर | सोमवार | ०७.१०.२०२४ | ३०.१२.२०२४ |
| ०९५७६ | महबुबनगर | राजकोट | मंगळवार | ८.१०.२०२४ | ३१.१२.२०२४ |
| ०९०४१ | उधना | छप्रा | रविवार | ०१.०९.२०२४ | २९.१२.२०२४ |
| ०९०४२ | छप्रा | उधना | सोमवार | ०२.०९.२०२४ | ३०.१२.२०२४ |

वेळा, थांबे आणि रचनेच्या तपशिलवार माहितीसाठी प्रवाश्यांनी कृपया www.enquiry.indianrailways.gov.in संकेतस्थळाला भेट द्या.

गाडी क्र. ०९१४५, ०९०४९, ०९०५१, ०९०२५, ०९०४५, ०९०५७ आणि ०९५७५ करीता आरक्षण २०.०८.२०२४ पासून सर्व पीआरएस काउंटर्स आणि आयआरसीटीसी संकेतस्थळावर सुरु होईल. गाडी क्र. ०९०४१ अनारक्षित विशेष गाडी म्हणून चालविण्यात येईल. वरील सर्व गाड्या विशेष दरांनी विशेष गाड्या म्हणून चालविण्यात येतील.

पश्चिम रेल्वे
www.wr.indianrailways.gov.in
आम्हाला लाईक करा : facebook.com/WesternRly
आम्हाला फॉलो करा : twitter.com/WesternRly

सर्व आरक्षित तिकिटांसाठी मूळ आयडी पुरावा सोबत ठेवा

**कल्याण डोंबिवली महानगरपालिका, कल्याण**
**विद्युत विभाग**
**निविदा सुचना क्र. ०३ (२०२४ – २०२५)**
स्वातंत्र्याचा अमृत महोत्सव

कल्याण डोंबिवली महानगरपालिकेमार्फत ०३ विद्युत कामांकरीता ऑन लाईन निविदा मागविण्यात येत आहे. निविदा सुचना व निविदा प्रपत्र महापालिकेच्या संकेतस्थळ www.mahatenders.gov.in वर दिनांक २१/०८/२०२४ ते २८/०८/२०२४ पर्यंत सायं ०५.०० वाजेपर्यंत उपलब्ध आहे.

ऑन लाईन निविदा महापालिकेचे संकेतस्थळ येथे दि. २१/०८/२०२४ ते २८/०८/२०२४ रोजी साय ०५.०० वाजेपर्यंत स्विकारण्यात येतील. प्राप्त निविदा शक्य झाल्यास दि. ३०/०८/२०२४ रोजी सकाळी ११.०० वाजता निविदाकार अथवा त्यांचे प्रतिनिधीसमोर उघडण्यात येतील.

**जाक्र. - कडोंमपा/ जसंवि/मुका /१५४९**
**दिनांक- १९/०८/२०२४.**

**सही/-**
**शहर अभियंता**
**कल्याण डोंबिवली महानगरपालिका, कल्याण.**

**मिरा भाईंदर महानगरपालिका**
स्व. इंदिरा गांधी भवन, छत्रपती शिवाजी महाराज मार्ग, भाईंदर (प.)
ता.जि.ठाणे - ४०१ २०१ ई-मेल : save, environs@mbmc.gov.in
स्वातंत्र्याचा अमृत महोत्सव

**पर्यावरण विभाग**

**// जाहिर आवाहन //**

सन २०२४ या वर्षी सर्वोत्कृष्ट सार्वजनिक गणेशोत्सव मंडळांना शासनाकडून पुरस्कार देण्यात येणार असून यासंबंधी शासन निर्णय क्र. पुलदे-२०२४/प्र.क्र.१११ /सां. का. २ दि. ३१ जुलै २०२४ अन्वये निकष जारी करण्यात आलेले आहेत. तसेच याकरिता जिल्हास्तरीय निवड समिती गठीत करण्यात आलेली आहे. सदर स्पर्धेत धर्मादाय आयुक्त यांच्याकडे नोंदणी केलेल्या किंवा स्थानिक पोलीसांकडे परवानगी घेतलेल्या किंवा स्थानिक स्वराज्य संस्था यांची परवानगी घेतलेल्या सार्वजनिक गणेशोत्सव मंडळांना सहभाग घेता येणार आहे. सार्वजनिक गणेशोत्सव मंडळाने पु.ल. देशपांडे महाराष्ट्र कला अकादमी, मुंबई यांच्या mahotsav.plda@gmail.com या ई-मेलवर सदर स्पर्धेचे परिपूर्ण अर्ज दि.०१/०८/२०२४ ते दि. ३१/०८/२०२४ पूर्वी सादर करायचे आहेत.

सदर स्पर्धेतील पुरस्कारामध्ये प्रथम क्रमांकासाठी ५.०० लक्ष, व्दितीय क्रमांकासाठी २.५ लक्ष व तृतीय क्रमांकासाठी १.०० लक्ष पुरस्कार रक्कम जाहिर करण्यात आलेली आहे. तसेच राज्यस्तरीय निवड समितीकडे जिल्हास्तरीय निवड समितीकडून निवड करण्यात येणाऱ्या ४४ सार्वजनिक गणेशोत्सव मंडळांपैकी वरीलप्रमाणे ३ विजेत्या गणेशोत्सव मंडळांना वगळून उर्वरित ४१ सार्वजनिक गणेशोत्सव मंडळांना राज्य शासनाकडून प्रत्येकी रु.२५,०००/- चे पारितोषिक व प्रमाणपत्र देऊन गौरविण्यात येणार आहे.

मिरा-भाईंदर महानगरपालिका कार्यक्षेत्रातील नागरिक तसेच सार्वजनिक गणेशोत्सव मंडळांना जाहिर आवाहन करण्यात येते की, त्यांनी सदर स्पर्धेमध्ये जास्तीत जास्त संख्येने सहभाग नोंदवावा.

अधिक तपशिल मिरा भाईंदर महानगरपालिकेच्या https://www.mbmc.gov.in या संकेतस्थळावर प्रसिद्ध करण्यात आलेला आहे.

जा.क्र. मनपा/ मावज/ ई२६२१०४५ /२०२४-२५
दि. १९/८/२०२४

**सही/-**
**(कल्पिता पिंपळे)**
**उपायुक्त (पर्यावरण)**
**मिरा-भाईंदर महानगरपालिका**

केनरा बैंक Canara Bank
A Govt. of India Undertaking
सिंडिकेट Syndicate

**मुंबई बोरीवली पूर्व [०३१६६] शाखा**
I मजला, थावर अपार्टमेंट, हीना बिल्डींग समोर, मेन कार्टर रोड, बोरीवली पूर्व, बोरीवली पूर्व एस. ओ मुंबई - ४०००६६.
ई – मेल: cb3166@canarabank.com दूरध्वनी: ८६५५९६३३१७

**मागणी सूचना [कलम १३(२)]**

ज्याअर्थी,
१) **श्रीमती रुबिना लियाकतअली खान** (कर्जदार) १२२ १२४, शिरनीबाई इमा., ३ रा मजला, खोली क्र. ३०, एम ई सारंग मार्ग, मेमनवाडा डोंगरी, मुंबई महाराष्ट्र ४००००३ राहणार येथे देखील: ६८२, किस्मत बिल्डींग, २ रा मजला, सदनिका क्र. ३, एल जे रोड, पॅरेडाईज सिनेमासमोर, माहीम, मुंबई शहर, महाराष्ट्र – ४०००१६ राहणार येथे देखील: सदनिका क्र. ३०३, ३ रा मजला, इमारत क्र. सी, "कन्हैया मेडोज", एस. क्र. १३, हिस्सा क्र. ६, गाव: पालघर, न्यू लाईफ केअर हॉस्पिटल खानपाडा, माहीम पालघर रोड तालुका आणि जिल्हा: पालघर, महाराष्ट्र ४०१४०४, येथे देखील राहणार : सदनिका क्र. ३०४, ३ रा मजला, इमारत क्र. सी, "कन्हैया मेडोज", एस. क्र. १३, हिस्सा क्र. ६, गाव: पालघर, न्यू लाईफ केअर हॉस्पिटल खानपाडा, माहीम पालघर रोड तालुका आणि जिल्हा: पालघर, महाराष्ट्र ४०१४०४
२) **श्री. स्वप्नील मधुकर किणी** (हमीदार): एस ओ मधुकर किणी बहाडोली, पालघर, महाराष्ट्र ४०१४०१.
प्रती महोदय
**विषय: दि सिक्युरीटायझेशन अँड रिकंस्ट्रक्शन ऑफ फायनॅन्शियल ॲसेटस अँड एनफोर्समेंट ऑफ सिक्युरिटी इंटरेस्ट ॲक्ट, २००२ च्या कलम १३ (२) अंतर्गत मागणी सूचना.**
असे की **श्रीमती रुबिना लियाकतअली खान** (कर्जदार) ह्यांनी वेळोवेळी आमच्या **मुंबई बोरीवली पूर्व [०३१६६] शाखेकडून** खालील कर्ज/ क्रेडीट सुविधा घेतल्या आहेत.

| अनु. क्र. | कर्ज क्र. | कर्जाचे स्वरूप/ मर्यादा | कर्ज रक्कम | ०८.०८.२०२४ अनुसार व्याजासह दायित्व | व्याजाचा दर |
|---|---|---|---|---|---|
| १ | १६०००१७६७२३७ | ६१९-गृह कर्ज | रु. २५,००,०००.०० | रु. २५,८८,३७६.०० | १३.५६% (११.२०% करारानुसार + २.३६% दंड) |
| २ | १६०००१७६७३३९ | ६१९-गृह कर्ज | रु. २२,५०,०००.०० | रु. २३,२९,३१५.०० | १३.५६% (११.२०% करारानुसार + २.३६% दंड) |

उपरोक्त कर्ज / क्रेडीट सुविधा येथे खाली विशेषत्वाने वर्णन करण्यात आलेल्या संपत्तीच्या गहाणद्वारे पूर्णपणे सुरक्षित जे आमच्या नावे तुमच्या द्वारे करण्यात आलेल्या संबंधित कागदपत्रांच्या आधारे करण्यात आले आहेत. विहित करण्यात आलेल्या अटी आणि शर्तीच्या आधारे तुमच्या दायित्वाचे पालन करण्यास असमर्थ ठरले असल्याने ०६.०८.२०२४ अनुसार तुमच्या कर्जाची एनपीए अशी वर्गवारी करण्यात आली आहे. म्हणून आम्ही ह्याद्वारे विषयांकीत कायद्याच्या कलम १३ (२) अंतर्गत तुम्हाला रु. ४९,१७,६९१/- (रुपये एकूण पन्नास लक्ष सतरा हजार सहाशे एक्क्याणव मात्र) अधिक त्यावरील आकारण्यात आलेले आणि आजच्या दिनांकापर्यंतचे व्याज आणि अन्य खर्चाचा भरणा सदर सूचना दिनांकापासून ६० दिवसांच्या आत भरणा करण्यासाठी जारी करण्यात आली होती. आणि जर असे न झाल्यास विषयांकीत कायद्याच्या कलम १३ (४) अंतर्गत देण्यात आलेल्या सर्व किंवा कोणत्याही अधिकाराचा वापर करून कारवाई करण्यात येईल.
त्याशिवाय, आमच्या पूर्व संमतीशिवाय, शेड्यूलमध्ये नमूद केलेल्या कोणत्याही सुरक्षित मालमत्तेशी कोणत्याही प्रकारे व्यवहार करण्यापासून तुम्हाला याद्वारे प्रतिबंधित केले आहे. हे विषय कायदा आणि/किंवा अंमलात असलेल्या इतर कोणत्याही कायद्यांतर्गत आमच्यासाठी उपलब्ध असलेल्या इतर कोणत्याही अधिकारांवर पूर्वग्रह न ठेवता आहे. सुरक्षित मालमत्तेची पूर्तता करण्यासाठी उपलब्ध वेळेनुसार, सरफेसी कायद्याच्या कलम १३ च्या पोट कलम (८) च्या तरतुदींकडे तुमचे लक्ष वेधण्यात आले आहे.
शाखेच्या रेकॉर्डमध्ये तुमच्या शेवटच्या ज्ञात पत्त्यावर तुम्हाला नोंदणीकृत पोस्ट एकनॉलेजमेंटद्वारे मागणी सूचना देखील जारी करण्यात आली होती.

**परिशिष्ट**

| बाब गहाण/ तारण- गहाण मत्ता | देण्यात आलेले मालमत्तेचे वर्णन |
|---|---|
| १. | ए) गाव पालघर, तालुका आणि जिल्हा पालघर न्यू लाईफ केअर हॉस्पिटल खानपाडा माहीम पालघर रोड महाराष्ट्र ४०१४०४ येथे वसलेल्या ८१० चौ. मी. मोजमाप असलेल्या धारण केलेला सर्वे क्र. १३, हिस्सा क्र. ६, च्या सर्व खंड आणि भूखंडावर बांधण्यात आलेल्या कन्हैया मेडोज म्हणून ज्ञात असलेल्या इमारतीच्या सी इमारतीच्या ३ ऱ्या मजल्यावरील ५४.०२ चौ. मी. (बिल्टअप) मोजमाप असलेल्या सदनिक क्र. ३०३ चे ईएमटी. सेरसाई व्याज आयडी :४०००७३११४१२६, सेरसाई व्याज आयडी २०००७४५२४३७३ |
| २. | बी) गाव पालघर, तालुका आणि जिल्हा पालघर न्यू लाईफ केअर हॉस्पिटल खानपाडा माहीम पालघर रोड महाराष्ट्र ४०१४०४ येथे वसलेल्या ८१० चौ. मी. मोजमाप असलेल्या धारण केलेला सर्वे क्र. १३, हिस्सा क्र. ६, च्या सर्व खंड आणि भूखंडावर बांधण्यात आलेल्या कन्हैया मेडोज म्हणून ज्ञात असलेल्या इमारतीच्या सी इमारतीच्या ३ ऱ्या मजल्यावरील ५४.०२ चौ. मी. (बिल्टअप) मोजमाप असलेल्या सदनिक क्र. ३०४ चे ईएमटी. |

**दिनांक: १२.०८.२०२४**
**ठिकाण: मुंबई**

**सही/-**
**प्राधिकृत अधिकारी/ विभागिय व्यवस्थापक**
**कॅनरा बँक**

मला धावायचं आहे, उडायचं आहे, पडायचं सुद्धा आहे. पण थांबायचं नाहीय.



- मिल्खा सिंग
प्रसिद्ध धावपटू

वृत्तमानस

मुंबई, मंगळवार, २० ऑगस्ट २०२४

# जम्मू काश्मीरच्या विकासाच्या वाटा मोकळ्या

भारताच्या पृथ्वीवर असलेला काश्मीर हा जगातील सर्वात सुंदर प्रदेश आहे. या प्रदेशाला भारताचा स्वर्ग म्हणून ओळखले जाते. हाच स्वर्ग आता केंद्रशासित झाला आहे. केंद्रातील भाजप सरकारने या प्रदेशातील 370 कलम हरवल्यानंतर त्याला केंद्र शासित प्रदेशाच दर्जा मिळाला आहे. त्यामुळे आता या प्रदेशाला आपले स्वतःचे सरकार निवडता येणार आहे. केंद्रीय निवडणूक आयोगाने गेल्या आठवड्यात जम्मू आणि काश्मीर केंद्रशासित प्रदेशाची विधानसभा निवडणूक जाहीर केली. 2019 मध्ये कलम 370 हटवल्यानंतर जम्मू- काश्मीर राज्याचे विभाजन करून जम्मू काश्मीर आणि लडाख असे दोन स्वतंत्र केंद्रशासित प्रदेश निर्माण केल्यानंतर प्रथमच निवडणूक होत आहे. यापूर्वी 2014 मध्ये जम्मू आणि काश्मीरमध्ये विधानसभा निवडणूक झाली होती. तेव्हा जम्मू-काश्मीरला राज्याचा दर्जा होता; पण आता केंद्रशासित प्रदेशाचा दर्जा असताना विधानसभा निवडणूक होणार आहे. अर्थात, गेल्या वर्षी जेव्हा जम्मू-काश्मीरसाठी लागू असलेले कलम 370 हटवल्यानंतर त्याला आव्हान देणाऱ्या याचिका सर्वोच्च न्यायालयात दाखल झाल्या होत्या तेव्हा त्या याचिका फेटाळताना सर्वोच्च न्यायालयाने 30 सप्टेंबरपूर्वी जम्मू आणि काश्मीरमध्ये निवडणुका घ्याव्यात, असा आदेश दिला होता. त्या आदेशाचे पालन करणे बंधनकारक असल्यानेच आता केंद्र सरकारने जम्मू आणि काश्मीरमध्ये विधानसभा निवडणूक जाहीर केली आहे. 2014 मध्ये जेव्हा जम्मू आणि काश्मीर राज्य असताना निवडणूक झाली होती तेव्हा निवडणुकीच्या निकालानंतर मुफ्ती मोहम्मद सईद यांच्या नेतृत्वाखालील पिपल्स डेमोक्रॅटिक पार्टीबरोबर युती करून भाजपने प्रथमच जम्मू आणि काश्मीरमध्ये सत्ताधारी होण्याचा मान मिळवला होता. पण काही कालावधीमध्ये भाजपने सरकारचा पाठिंबा काढून घेतला होता. त्यानंतर लगेचच वेगाने घडामोडी होऊन काश्मीरला लागू असलेले कलम 370 मागे घेण्याचा निर्णय मोदी सरकारने घेतला होता. गेल्या पाच वर्षांच्या कालावधीमध्ये जम्मू आणि काश्मीरमध्ये राष्ट्रपती राजवट आहे. आता पुन्हा एकदा मतदारांना आपल्या आवडीचे सरकार निवडून देण्याची संधी आली आहे. अर्थात, काश्मीरमध्ये सातत्याने कार्यरत असलेल्या दहशतवादी संघटनांनी जर अडथळा आणला नाही, तर ही लोकशाही निवडणुकीची प्रक्रिया व्यवस्थित पार पडेल यात शंका नाही. काश्मीरच्या राजकारणात पूर्वीपासून काँग्रेस नॅशनल कॉन्फरन्स आणि पीपल्स डेमोक्रॅटिक पार्टी हे तीन प्रमुख पक्ष कार्यरत होते. त्यानंतरच्या कालावधीमध्ये भाजपनेसुद्धा या राज्यामध्ये आपली मुळे पसरली. पीडीपीबरोबर युती करून भाजपने या राज्यातील सत्ताही उपभोगली. नुकत्याच झालेल्या लोकसभा निवडणुकीतील मतदानाचा विचार करता 90 पैकी 46 मतदार संघांमध्ये नॅशनल कॉन्फरन्सने मतांची आघाडी घेतली आहे. पीडीपी फक्त 5 ठिकाणी आघाडीवर आहे, तर भाजप 30 मतदारसंघात आघाडीवर असल्याची आकडेवारी सांगते. याव्यतिरिक्त काश्मीरमधील नवी राजकीय ताकद म्हणून पुढे येत असलेला इंजिनिअर राशिद यांचा अवामी इत्तेहाद पार्टी हा पक्षसुद्धा लोकसभा निवडणुकीमधील विजयानंतर अधिक सक्रिय झाला आहे. लोकसभा निवडणुकीमध्ये इंजिनिअर राशिद यांनी नॅशनल कॉन्फरन्सच्या उमर अब्दुल्ला यांचा पराभव करून खळबळ माजवली होती. खरे तर दहशतवादी संघटनांना मदत करण्याच्या आरोपाखाली इंजिनिअर राशिद दिल्लीतील तुरुंगात आहेत. तरीसुद्धा आपल्या भावाच्या मदतीने या विधानसभा निवडणूक लढवण्याचा त्यांचा मनसुबा आहे. काश्मीरचा भौगोलिक विचार करता जम्मू हा प्रांत प्रामुख्याने हिंदूबहुल प्रांत आहे, तर काश्मीर हा प्रामुख्याने मुस्लीमबहुल प्रांत आहे. साहजिकच गेल्या विधानसभा निवडणुकीमध्ये भाजपाला ज्या 25 जागा मिळाल्या होत्या त्या सर्व जम्मूमधील होत्या. काश्मीरमध्ये या पक्षाला एकही जागा मिळाली नव्हती. धार्मिक पायावर येथील मतदारांची अशी विभागणी झाली असल्यानेच ही निवडणूक चुरशीची होण्याचे संकेत मिळत आहेत. जो पक्ष जम्मू आणि काश्मीर या दोन्ही प्रांतांमध्ये चांगले यश मिळवेल त्याच पक्षाला सत्तेवर बसता येणार आहे. पण मुस्लीमबहुल काश्मीर भागामध्ये नॅशनल कॉन्फरन्स पिपल्स डेमोक्रॅटिक पार्टी आणि इंजिनिअर राशिद यांची पार्टी यांच्यामध्ये सरळ सरळ लढत झाली तर मत विभागणीचा फायदा कोणाला होणार हे पाहणेसुद्धा महत्त्वाचे ठरणार आहे. या व्यतिरिक्त काँग्रेस आणि भाजप हे राष्ट्रीय पक्ष या निवडणुकीसाठी कोणती रणनीती आखतात हेसुद्धा महत्त्वाचे आहे. कोणतीही युती न होता सर्वच पक्ष स्वबळावर मैदानात उतरले, तर मत विभागणी अटळ ठरून विधानसभा निवडणुकीचा निकाल अधांतरी लागण्याचीही शक्यता आहे. अर्थात, केंद्र सरकारने जम्मू-काश्मीरचे विभाजन करून या प्रांताला केंद्रशासित प्रदेशाचा दर्जा दिल्याचे तेथील जनतेला आवडलेले नाही. विधानसभा निवडणुकीपूर्वी केंद्र सरकारने पुन्हा एकदा जम्मू काश्मीरला राज्याचा दर्जा बहाल करावा, अशी मागणी सातत्याने करण्यात येत आहे. जरी केंद्रशासित प्रदेश असलेल्या जम्मू आणि काश्मीरमध्ये विधानसभा निवडणूक होऊन तेथे नवे सरकार सत्तेवर आले तरी तो केंद्रशासित प्रदेश असल्यामुळे नायब राज्यपालांना जास्त अधिकार असतात. सध्या दिल्लीमध्ये नायब राज्यपाल आणि मुख्यमंत्री यांच्यामध्ये जो संघर्ष सुरू आहे तशाच प्रकारचा संघर्ष जम्मू आणि काश्मीरमध्येसुद्धा सुरू होण्याची शक्यता नाकारता येत नाही. केंद्र सरकारलासुद्धा याची जाणीव आहे. नजीकच्या कालावधीमध्ये योग्य वेळी पुन्हा एकदा जम्मू आणि काश्मीरला राज्याचा दर्जा बहाल केला जाईल, असे संकेतही मिळत आहेत. सध्या तरी काश्मीरमध्ये जाहीर झालेली विधानसभा निवडणूक शांततेने पार पाडून तेथे लोकनियुक्त सरकार सत्तेवर येईल आणि निवडणुकीची लोकशाही प्रक्रिया सुरळीतपणे पार पडेल, अशी आशा करावी लागणार आहे. अर्थात ही निवडणूक होऊ नये यासाठी दहशतवादी संघटनांकडून नक्कीच प्रयत्न केले जातील यात दुमत नाही. ही निवडणूक व्हावी, येथील जनतेने त्यांचे सरकार निवडून आणावे असे दहशतवादी संघटनांना वाटत नाहीच. त्यामुळे त्यांच्याकडून निवडणूक उधळून लावण्याचा नक्कीच प्रयत्न होणार आहे यात शंका नाही. काय करता आपला संरक्षण यंत्रणा देखील सज्ज झाल्या आहेत. अतिरेक्याच्या कोणत्याही हल्ल्याचा सामना करण्यासाठी त्या खंबीर आहेत. स्वर्गासारखा हा प्रदेश अतिरेकी कारवायांमुळे नरकमय झाला आहे. या ठिकाणी भयमुक्त पर्यटन करणे धोक्याचे बनले आहे. मात्र आता या ठिकाणी सुरू होणाऱ्या स्वतंत्र निवडणूक पद्धतीने आता हा प्रदेश पुन्हा एकदा नव्याने उभा राहणार आहे. येथे त्यांच्या सौंदर्या प्रमाणे आनंद आणि सुख शांती पसरणार आहे. राज्यकर्त्यांनी या स्वर्गाला लागलेले अतिरेक्यांचे ग्रहण दूर करायला पाहिजे. येथील नागरिकांना आता ही संधी मिळाली असून त्यांनी निडरपणे लोकशाहीचा सन्मान करायला हवाय. त्यांना जी संधी उपलब्ध करून दिली आहे, त्या समाधीचे सोने करायला पाहिजे. अतिरेक्यांच्या कारवायांना न घाबरता त्यांचा खंबीरपणे मुकाबला करायला पाहिजे. हा प्रदेश भारताचा अविभाज्य अंग आहे आणि त्याचा विकास झाला पाहिजे, येथील प्रत्येक नागरिक भयमुक्त राहायला पाहिजे. ही जबाबदारी सरकारची आहे आणि सरकार निवडण्याचा अधिकार लोकांचा आहे. म्हणूनच या ठिकाणी स्वर्ग नंदावा असे लोकांना वाटत असेल तर लोकांनी सरकारच्या बाजूने उभे राहायला हवे, इथली अतिरेकी घाण साफ करायला हवी. त्यासाठी सरकारने दोन पाऊले पुढे टाकले आहेत, लोकांनी एक पाऊल पुढे यावे हीच अपेक्षा सरकारला आहे.

# डॉ. दाभोलकरांची हत्या आणि सनातनची बदनामी!

२० ऑगस्ट २०१३ या दिवशी एक विज्ञानवादी विचारवंत महाराष्ट्राने गमावला. महाराष्ट्र अंधश्रद्धा निर्मूलन समितीचे अध्यक्ष डॉ. नरेंद्र दाभोलकर यांची पुणे येथे गोळ्या झाडून निर्घृण हत्या करण्यात आली. या घटनेने त्यावेळी सारा महाराष्ट्र हादरला . या बहुचर्चित प्रकरणाचा तब्बल ११ वर्षानंतर निकाल लागला ज्यामध्ये २ आरोपींना जन्मठेपेसह ५ लाख रुपये दंडाची शिक्षा झाली तर सनातन संस्थेच्या एका साधकासह दोन हिंदुत्ववाद्यांची न्यायालयाने पुराव्याअभावी निर्दोष मुक्तता केली. डॉ. दाभोलकर नास्तिक विचारसरणीचे तर सनातन संस्था ही अध्यात्माचा वैज्ञानिक परिभाषेत प्रसार करणारी संस्था. या दोघांची विचारसरणी परस्परविरोधी असल्याने या दोघांमध्ये वैचारिक मतभेद होते. डॉ. दाभोलकर ज्या क्षेत्रात काम करत होते त्यामध्ये त्यांचे अनेकांशी मतभेद होते; मात्र त्यांच्या खुनानंतर तपासाची संपूर्ण दिशा सनातन संस्थेकडे वळवण्यात आली. तत्कालीन मुख्यमंत्र्यांनी कोल्हापुरात समस्त माध्यमांसमोर या खुनामागे गोडसेवादी विचारसरणीचा हात असल्याचे विधान करून तपास कोणत्या दिशेने करायला हवा याचा मार्गच तपासयंत्रणांना जणू दाखवून दिला. मुख्यमंत्र्यांच्या विधानानंतर दाभोलकर परिवारानेही यावर री ओढली. दाभोलकरांच्या हत्या प्रकरणात तपास एकांगी झाल्यानेच सत्य समोर येऊन सनातनच्या एका साधकांसह अन्य दोन हिंदुत्ववाद्यांची मुक्तता झाली आणि खरे मारेकरी तपास यंत्रणांपासून दूरच राहिले. या निकालानंतर माजी मुख्यमंत्र्यांना त्यांनी केलेल्या वक्तव्याबाबत माध्यमांनी विचारणा केली असता त्यांनी आजही आपल्या वक्तव्यावर ठाम असल्याचे सांगितले याचे खरेतर आश्चर्य वाटते. त्यांच्या विधानामुळे एका महत्वाच्या गुन्ह्यातील तपासाची दिशा भरकटली.

या सर्व प्रकरणात सनातन संस्थेच्या १६०० हुन अधिक परिवारांची पोलीस चौकशी करण्यात आली, सनातनच्या आश्रमांवर धाडी टाकण्यात आल्या. सनातनचे आर्थिक व्यवहार तपासण्यात आले. प्रत्येक वेळी सनातनने तपासयंत्रणांना सर्वतोपरी सहकार्य केले. जगाच्या पातळीवर सनातन संस्था ही एकमेव संस्था आहे जिने अध्यात्मातील सिद्धांत वैज्ञानिक परिभाषेत जगासमोर मांडले. सनातनचे संस्थापक डॉ. जयंत आठवले हे स्वतः आंतरराष्ट्रीय कीर्तीचे संमोहन उपचार तज्ञ आहेत. प्रत्येक गोष्ट विज्ञानाच्या पातळीवर सिद्ध करून साध्या सोप्या सरळ पद्धतीने मांडायची हा त्यांचा मुळातच स्वभाव असल्याने त्यांनी अध्यत्मातील प्रत्येक सिद्धांतावर संशोधन केले आणि आपल्या व्याख्यानांतून, अभ्यासवर्गातून आणि ग्रंथांतून ते वैज्ञानिक भाषेत मांडले. त्याला अध्यात्मातील अधिकारी, संत, ऋषी, मुनी यांच्या लेखनाची जोड दिली. डॉ. आठवले यांच्या मार्गदर्शनाखाली सनातन संस्थेने अध्यात्म, साधना आणि धर्म या विषयांवर वैज्ञानिक भाषेत लिहिलेल्या साडेतीनशेहून अधिक ग्रंथांच्या आजवर एक कोटींहून अधिक प्रतींचे प्रकाशन केले आहे. प्रकाशनाच्या संदर्भात सनातन ही भारतातील चौथी मोठी प्रकाशन संस्था आहे. सनातन संस्था अध्यात्म वैज्ञानिक परिभाषेत मांडत असल्याने नामांकित डॉक्टर, शास्त्रज्ञ, वकील, पत्रकार सनातन संस्थेच्या मार्गदर्शनाखाली आज साधना करत आहेत. सनातन संस्थेच्या संकेतस्थळावर या सर्वांबाबत विस्तृत माहिती मिळते. अध्यात्मप्रसार हा जरी संस्थेचा केंद्रबिंदू असला तरी सनातन संस्था तिच्या संलग्न संस्थान्सह आरोग्य शिबीरे, ताण तणाव मुक्तीवर व्याख्याने , बालसंस्कार, व्यक्तिमत्व विकास, गोरगरिबांना जीवनावश्यक साहित्याचे वाटप, वृक्षारोपण आदी सामाजिक उपक्रमही नित्यनेमाने राबवते. असे असतानाही डॉ. दाभोलकर हत्या प्रकरणात सनातन संस्थेचे नाव गोवले गेल्याने संस्थेची प्रचंड हानी झाली. सनातनच्या साधकांच्या मागे पोलीस चौकशीचा ससेमिरा लागल्याने सामान्य लोक सनातनच्या साधकांकडे आणि आश्रमाकडे संशयाच्या दृष्टीने पाहू लागले. सनातनच्या उत्पन्नाचे साधन असलेल्या ग्रंथ आणि सात्विक उत्पादनांच्या विक्रीवरही मोठा परिणाम झाला. दरम्यानच्या काळात काही तथाकथित बुद्धिप्रामाण्यवादी आणि नास्तिक विचारसरणीच्या मंडळींनी सनातनवर खोटेनाटे आरोप करणारे लेख वृत्तपत्रांतून प्रसिद्ध करून सनातनला आणखी बदनाम करण्याचे काम केले.

एका सामाजिक विचारवंताचा दिवसा ढवळ्या खून होतो ही सामाजिक सुरक्षेच्या दृष्टीने अत्यंत गंभीर बाब आहे; मात्र त्या घटनेचे भांडवल करून प्रत्यक्ष मुख्यमंत्र्यांकडून राजकीय स्वार्थासाठी तपासाची दिशा भरकटवली जाणे, अध्यात्मिक संघटनानांना टार्गेट करणे, त्यांची बदनामी करणे, चौकशीच्या नावाने संस्थेच्या साधकांचा मानसिक छळ करणे, त्यांच्यावर दहशतवादाचे आरोप करणे, या सर्व बाबी अत्यंत गंभीर आहेत. एखादी संस्था नावारूपाला येण्यासाठी त्या संस्थेतील सक्रिय कार्यकर्त्यांना भरपूर परिश्रम घ्यावे लागतात; मात्र अशा काही प्रकरणामध्ये जेव्हा त्या संस्थेचे नाव घेतले जाते तेव्हा हे सारे परिश्रम मातीमोल ठरतात. कालांतराने तिचे निर्दोषत्व जरी सिद्ध झाले तरी झालेली बदनामी ही कधीच भरून काढता येत नाही. डॉ. दाभोलकर हत्याप्रकरणातही हेच झाले आहे. न्यायालयाच्या निकालानंतर सनातन संस्थेचे निर्दोषत्व जरी सिद्ध झाले असले तरी या संपूर्ण प्रकरणात संस्थेची झालेली बदनामी कशी आणि कोण भरून काढणार ?

- जगन घाणेकर,
घाटकोपर, मुंबई

# निवृत्ती नंतरची तरतूद ... एक महत्वाचा विचार

आज जीवन धकाधकीचे झाले आहे . सरकारी नोकऱ्या सुद्धा कमी प्रमाणात आहेत व त्या प्रत्येकाला मिळतील असे नाही . खाजगी क्षेत्रात नोकऱ्या आहेत पण तेथे नोकरी करून पेन्शन आदी फायदे अगदीच कमी प्रमाणात असतात . पूर्वीच्या काळी प्रयेक कुटुंबाला काही तरी जमीन होती . आज अशी परिस्थिती नाही . व जमीन जरी असली तरीही त्यातून उत्पन्न किती निघेल व त्यासाठी खर्च किती होईल अशा चक्रात अनेकजण सापडले आहेत अनेक वेळा निसर्गाची संकटे येतात . दिवसेंदिवस शिक्षणाचा खर्च बेसुमार वाढलेला आहे .शिवाय मुला मुलींना शिक्षणासंगठी बाहेर गावी पाठवावे लागते . त्यासाठी सुद्धा मोठा खर्च लागतो . मुलांचे शिक्षण व त्यासाठी येणारा खर्च हल्लीच्या काळात मोठा आहे . या शिवाय मुलींची लग्ने यासाठी सुद्धा मोठ्या प्रमाणात पैसा खर्च करावा लागतो .

दिवसेंदिवस महागाई व आरोग्य विषयक खर्च वाढतच आहेत . हे सर्व करून निवृत्तीच्या काळात आपणा जवळ काही पैसे असणे जरुरीचे आहे . आपणास जो पैसा मिळतो तो काही प्रमाणात खर्च करून त्यातली काही हिस्सा गुंतवणूक करणे फायदेशीर आहे , सर्वसाधारण पणे असे म्हटले जाते कि आपल्या मिळगतीच्या ५० पैसा दैनंदिन खर्चासाठी वापरावा राहिलेल्या मध्ये १५ टक्के रक्कम शिक्षणासाठी व राहिलेली २०टक्के रक्कम आरोग्य तसेच घराचे हप्ते इत्यादी साठी वापरावी. राहिलेली १५ टक्के रक्कम पुढील आयुष्याच्या तरतुदीसाठी ठेवावी तसेच रक्कम साठविताना सर्व पर्यायांचा विचार करावा . काही रक्कम पोस्टाच्या एन एस एस मध्ये काही रक्कम बँकेत ठेवीच्या स्वरूपात, काही रक्कम पोस्टाच्या रिकरिंग खात्यात तर काही रक्कम शेअर्स मध्ये गुंतवणूक करण्यास हरकत नाही .केवळ एकाच ठिकाणी गुंतवणूक करू नये . सर्व ठिकाणी मिळणारे फायदे विचारात घ्यावेत बचतीचा काही विचार न केल्यास सेवानिवृत्ती नंतर कुटुंबाची परिस्थिती अवघड होण्याची शक्यता नाकारता येत नाही . हल्ली निवृत्ती नंतर सुद्धा नोकरीचे अनेक पर्याय उपलबध आहेत . पण ते सर्वानाच जमेल असे नाही . ज्यांना प्रकृती चांगली आहे , तसेच काही करण्याची इचछा आहे त्यांनी नोकरी किंवा जमेल तर काही व्यवसाय करण्यास हरकत नाही . बचती बाबत आणखी एक गोष्ट विचारात घेणे जरुरीचे आहे आणि ती म्हणजे थेंबे ठेंवे तळे साचे ही उक्ती सतत लक्षात ठेवणे जरुरीचे आहे एकूणच ज्याला ऐन उमेदीच्या काळात बचतीचे महत्व कळते व जो त्या दृष्टीने काही पाऊले उचलतो तो आपले सेवानिवृत्ती नानंतरचे आयुष्य समाधानात घालवितो असे दिसते हल्ली अनेकांची मुले परदेशात स्थायिक होतात व आई वडील गावी अथवा नोकरीच्या ठिकाणी असतात.

त्यामुळे वेगळेच प्रश्न निर्माण झाले आहेत . वृद्धपकाळात औषधे व अयोग्य यासाठी नेहमीच पैसा लागतो . तो मुले देतील असे गृहीत धरले आहे . पण कित्येकांची अशी परिस्थिती नसते . त्यासाठी मेडिकल स्कीम आदी मध्ये सुद्धा पैसा ठेवणे जरुरीचे आहे . एकूणच नोकरीत असताना आरोग्य , मुलांचे शिक्षण, मुला मुलींची लग्ने ,सेवानिवृत्ती नंतरचे आयुष्य व गरजा याचा विचार आवश्यक आहे

- शांताराम वाघ.
पुणे

## पत्र मानस

### सीएनजी गॅस व इलेक्ट्रिक चार्जिंगवर वाहने चालवणाऱ्यांची सोय करा

सीएनजी गॅसवर तसेच इलेक्ट्रिकवर चालणाऱ्या गाड्या हा प्रदूषण निवारण्यासाठी चांगला पर्याय आहे. सरकारही सीएनजी गॅसवर चालणाऱ्या तसेच इलेक्ट्रिकवर चालणाऱ्या वाहनांचा पुरस्कार करत नागरिकांनी सीएनजी गॅसवर चालणारे तसेच इलेक्ट्रिक वाहनांची खरेदी करावी असे आव्हान करत आहे. सरकारच्या आव्हानाला प्रतिसाद देत नागरिकही आता सीएनजी गॅसवर चालणारे तसेच इलेक्ट्रिकवर चालणारे वाहन खरेदी करीत आहेत पण अनेक ठिकाणी सीएनजी गॅस विविध जागी पेट्रोल पंपावर बऱ्याचदा उपलब्ध नसतो. असलाच तर प्रेशर नसतो, त्यामुळे मर्यादित आउटलेटवरून तो भरला जात असल्याने तेथे वाहनांच्या रांगा लागतात. इलेक्ट्रिक चार्जिंगवरील वाहनांसाठी बॅटरी संपली की चार्ज करण्यासाठी चार्जिंग स्टेशन अत्यंत तुटपुंजी आहेत. ग्रामीण भागात तर ती जवळपास नाहीतच. या साऱ्याचा फटका पुन्हा वाहन धारकांना व प्रवाशांनाच बसतो. ज्यांनी सीएनजी गॅसवर चालणारे वाहन तसेच इलेक्ट्रिक वाहन खरेदी केली आहेत त्यांना याचा मनस्ताप सहन करावा लागत आहे. महाशक्ती बनायला चाललेल्या देशात लोकांना असे तासंतास जिकडे तिकडे रांगा लावायला लावून त्यांचा बहुमोल वेळ वाया घालवणे योग्य आहे का? याचा विचार सरकारने करावा. वास्तविक सीएनजी गॅसवर चालणारे तसेच एकेक्ट्रिकवर चालणारे वाहन हा प्रदूषण मुक्तीचा चांगला मार्ग आहे. मात्र तो प्रशस्त आणि सुखकारक नसल्याने नागरिक पुन्हा पेट्रोल डिझेलवर चालणाऱ्या वाहनांकडे वळू शकतात तसे झाले तर प्रदूषणमुक्त भारत हे सरकारचे स्वप्न स्वप्नच राहील तसे होऊ द्यायचे नसेल तर सरकारने शहरांसह ग्रामीण भागातही सीएनजी गॅस सर्व पेट्रोल पंपावर उपलब्ध करून द्यावा तसेच ठराविक अंतरावर चार्जिंग स्टेशन्स उभारावीत. जर सीएनजी गॅस आणि चार्जिंग स्टेशन उपलब्ध करून दिली तरच नागरिक डिझेल पेट्रोल वरील वाहनांपासून दूर राहतील आणि प्रदूषण निवारण्याचा सरकारचा प्रयत्न यशस्वी होईल.

**- श्याम ठाणेदार, पुणे**

### आपला दवाखाना, कर्मचाऱ्यांची मनमानी

एफ दक्षिण विभाग शिवडी बस डेपो जवळ असलेला महाराष्ट्र शासन आरोग्य विभागाच्या योजने अंतर्गत मुंबई महानगर पालिकेचा असलेला " आपला दवाखाना , मनमानी कर्मचाऱ्यांची " आलेला अनुभव दि. १७ ऑगस्ट २४ रोजी सकाळी ११. २७ ते ११. ४२ वाजता १५ मिनिटे पेपर देणारा खिडकी क्र. १कर्मचारी गायब , इतर कर्मचारी यांना विचारणा केली तर अनपेक्षित पणे पाठराखण आहेत इकडेच , येतील लगेच, अशी उत्तर देण्यात आली. महाशय आल्यावर मला केस पेपर दिला आणि डायरेक्ट ४ नं खिडकी वरुन औषध घ्या असे सांगितले गेले. मुळात केस पेपर काढल्या वर सर्व साधारण वैद्यकीय अधिकारी उपस्थित असणे अपेक्षित होते. वैद्यकीय अधिकारी यांनी तपासणी करून मला फार्माशिस्ट यांनी औषध देणे नियम असताना. वैद्यकीय अधिकारी अनुपस्थित असताना मला औषध दिले गेले त्या वरुन मला देण्यात आलेले औषध म्हणजे महाराष्ट्र शासन अंतर्गत मुंबई महानगर पालिके च्या वतीने सुरु असलेला " आपला दवाखाना आणि कर्मचाऱ्यांची मनमानी " असं म्हटलं तर वावगं ठरणार नाही. . तरी महाराष्ट्र शासन आरोग्य विभाग यांनी या बाबत योग्य दखल घ्यावी. अन्यथा आपल्या दवाखान्यात उपचारार्थ आलेल्या रुग्णा ला विशिष्ट परिस्थितीला सामोरे जावे लागेल. त्याला जवाबदार कोण हा प्रश्न अनुतरित राहील.

**- नितीन कदम दादर मुंबई**

### कोकणातील गणेशोत्सवात मुंबईकरांची मोठी आर्थिक उलाढाल

यंदा गणेश चतुर्थी शनिवार, ७ सप्टेंबर २०२४ रोजी आहे.कोकणातील मुंबई स्थित लोक गौरी - गणपतीच्या सणानिमित्त आवर्जून आपल्या मूळ गावात येतात. गणपती येण्याच्या आधी चार महिने कोकण रेल्वेचे तिकीट आरक्षण सुरु होवून काही तासात फूल होते.हे झाले नेहमी सुटणार्या गाड्यांचे .मध्य रेल्वेने यावर्षी २० गणपती स्पेशल गाड्या सोडणार आहे शिवाय काही राजकीय पक्ष आपल्या गणेश भक्तांसाठी विशेष ट्रेन सोडतात. आधीच सिंगल ट्रॅक आहे त्यात अधिकच्या गाड्यांची भर पडणार. अधिक दररोज सुटणार्या गाड्या आहेत. महाराष्ट्र राज्य मार्ग परिवहन महामंडळाने ४३०० जादा गाड्या सोडण्यात येणार असल्याचे जाहीर केले आहे.त्यात १३०१ एस.टी.बसचे गट आरक्षणसह २०३१ जादा बस आरक्षित झाल्या आहेत. महामंडळाने २ सप्टेंबर ते ७ सप्टेंबर २०२४ दरम्यान ४३०० जादा एस.टी.बस सोडणार आहे.शिवाय राजकीय पक्ष बस गाड्या सोडणार आहेत, लक्झरी ट्रॅव्हल्सच्या गाड्या,खाजगी गाड्या ,कार ही सर्व वाहने मुंबई- गोवा राष्ट्रीय महामार्ग क्रमांक ६६ वरून येणार आहेत काही वाहने मुंबई- बंगलोर एक्स्प्रेस हायवेवरून कोल्हापूर मार्गे कोकणात येतील. मुंबई- गोवा राष्ट्रीय महामार्गावरून जी वाहने येतील त्यांना जेवणासाठी कोणत्या ठिकाणी थांबवण्यात येणार आहे. याचा आराखडा तयार करणे आवश्यक आहे.मार्गावरील हॉटेल आहेत त्यांच्याकडे मुतारी - शौचालय नामधारी आहेत. त्यांच्या हॉटेल मधील जेवण एका वेळी किती प्रवाशांना देता येईल याची माहीती शासनाने घेणे आवश्यक आहे.एकाच हॉटेल मध्ये पंचवीस- तीस गाड्या जेवणासाठी थांबल्या तर किती प्रवाशांना जेवण मिळेल. गाड्या उभ्या करण्यासाठी जागा नसते.महाराष्ट्र शासनाच्या सार्वजनिक आरोग्य विभागाने प्रत्येक तालुक्यातील हॉटेलची तपासणी करणे आवश्यक आहे.वाहतूक पोलीस मोक्याच्या ठिकाणी असायला हवेत. गणपतीच्या दिवसात लक्झरीवाले आपले प्रवास भाडे वाढवतात .लक्झरी नादुरुस्त असलेल्या गाड्या संधीचा फायदा घेऊन रस्त्यावर धावतात काही किलोमीटर अंतरावर बंद पडतात. प्रवासी नाहक अडकून पडतो अशा प्रसंगात शासकीय यंत्रणेतील तंत्रज्ञ उपलब्ध होतील अशी व्यवस्था असावी.तेव्हाच खर्या अर्थाने कोकणातील गणेश भक्तांची दखल शासनाने घेतली असे प्रवाशी म्हणतील. मुंबई-गोवा राष्ट्रीय महामार्ग क्रमांक ६६ वरील खड्डे बुजवून सहकार्य करा.प्रवास सुखकर होईल असा विश्वास प्रवाशांना वाटेल तो सुदिन. कोकणातील एकमेव महामार्ग १७ वर्षे पूर्ण होतो आहे.हाच आमच्या कोकणचा विकास आहे.

**- महादेव गोळवसकर, कुर्ला मुंबई**

### तरच पदकांचा दुहेरी आकडा गाठता येईल.

यंदाच्या पॅरिस ऑलिम्पिकमध्ये भारताच्या खात्यात एक रौप्य आणि पाच कांस्य अशी एकूण सहाच पदके जमा झाली. एक सुवर्ण पदक मिळता मिळता हुकले. १४० कोटी लोकसंख्येच्या भारताच्या पदरी फक्त सहा पदकांची भर पडत असताना भारतातील एखाद्या राज्याच्या लोकसंख्येपेक्षाही कमी लोकसंख्या असलेले देश भारतापेक्षाही जास्त पदकांची कमाई करुन गेले. असे यावर्षीच घडले असे नाही. तर ऑलिम्पिकच्या इतिहासात हे वारंवार घडत आलेले आहे. भारतात प्रचंड लोकप्रिय असलेल्या क्रिकेट खेळातील खेळाडूंची कमाई करोडो रुपयांत होत असताना इतर खेळातील खेळाडू मात्र कमनशिबी ठरत आलेले आहेत. खेळांच्या महत्त्वाच्या संस्थांवर खेळाडूंपेक्षा राजकारण्यांचाच भरणा असल्यामुळे खेळातही राजकारण येते. या राजकारणातूनच गुणी खेळाडूंची उपेक्षा होते. कुस्ती महासंघाच्या माध्यमातून झालेले राजकारण जगजाहीर आहेच. असे असले तरी बराच काळ हॉकीतील सुवर्णपदकावर भिस्त असलेला भारत हाताच्या बोटावर पदके मागच्या काही ऑलिम्पिकमध्ये मिळवू लागला आहे. हे ही नसे थोडके. 'खेलो इंडिया' सारख्या उपक्रमातून गुणवान खेळाडू हेरुन त्यांना योग्य ते मार्गदर्शन व प्रशिक्षण देऊन पुढच्या ऑलिम्पिकसाठी आतापासूनच तयार करायला हवे. म्हणजे पदकांचा निदान दुहेरी आकडा तरी गाठता येईल.

**- दीपक काशिराम गुंडये, वरळी.**

### लालपरी नफ्याच्या उंबरठ्यावर!

सातत्याने आर्थिक संकटाशी सामना करीत गावा, घरा पर्यंत पोहचविणारी एसटी महामंडळाची लाल परी आपल्या ३१ विभागा पैकी सुमारे अठरा विभागातून नफ्याच्या उंबरठ्यावर पोचली ही बातमी सुखद समाधान देणारी आहे. एसटी जगली पाहिजे, कायम धावती रहावयास हवी कारण सध्या सर्वसामान्यांना आर्थिक दृष्ट्या तीच परवडणारी सोय होय. ज्या ज्या प्रयत्नातून, तडफेने लाल परी नफ्याकडे प्रवास करतेय त्याच उमेदीने एसटी आगारातील स्वच्छतेकडे, प्रसन्नतेकडे, उपहारगृहांच्या व्यवस्थितपणाकडे आणि मुख्यता गाड्यांच्या वेळापत्रकांकडे असेच जातीने लक्ष दिले गेले, अग्रक्रमाने पाहिले गेले तर एसटी मंडळाचे सारे विभाग, आगार नफ्याचा उंबरठा जलद गतीने पार करतील यात शंका नाही मात्र प्रशासनाची इच्छाशक्ती जबरदस्त हवी आणि प्रवाशांची साथ सोबत, सहकार्य सुद्धा.

**- विश्वनाथ पंडित, ठाणे**

५ वृत्तमानस
ठाणे-रायगड
मुंबई, मंगळवार, २० ऑगस्ट २०२४

## सनातन संस्थेच्यावतीने 'महिला सबलीकरण' विषयावर मार्गदर्शन

**पनवेल :** आजच्या सद्यस्थितीत वाढते महीलावर होणारे अत्याचार, मानवतेला काळीमा फासणारी हत्या, आत्महत्या असे अनेक प्रसंग पाहता त्याला सामोरे जाण्यासाठी त्यांचे शारीरिक, मानसिक तसेच आध्यात्मिक बळ वाढणे आवश्यक आहे. हा उद्देश लक्षात घेऊन सनातन संस्थेच्या वतीने १६ ऑगस्ट या दिवशी भोकरपाडा, पनवेल येथे महिलांसाठी महिला सबलीकरण या विषयावर मार्गदर्शन आयोजित करण्यात आले. सनातन संस्थेच्या वंदना आपटे यांनी उपस्थित महिलांना मार्गदर्शन केले. उपस्थितांना मार्गदर्शन करताना , महिलांवरील होणारे अत्याचार रोखण्यासाठी शरीराने तसेच मनाने कणखर होण्यासाठी प्रत्येक महिलेने काय प्रयत्न करावेत, प्रत्येक मुलीने स्वतःचे रक्षण करण्यासाठी स्वसंरक्षण प्रशिक्षण घेणे गरजेचे आहे. त्याचप्रमाणे तसेच मनाची ताकद वाढवण्यासाठी नियमित प्राणायाम व व्यायाम करणे आवश्यक आहे. आपल्या आजूबाजूला घडणाऱ्या घटना याबद्दल आपल्या घरातील वडीलधाऱ्या माणसांना सांगणे आवश्यक आहे.



### म ह त्त्वा चे

## को. ए.सो. विद्या संकुल मध्ये रक्षाबंधन उत्साहात

**महाड :** कोकण एज्युकेशन सोसायटीच्या महाड येथील पार्वती बाई महादेव थरवळ कन्या विद्यालय, विनायक हरी परांजपे विद्या मंदिर महाड यांच्या संयुक्त विद्यमाने, स्काऊट व गाईड पथकाच्या वतीने रक्षाबंधन साजरा करण्यात आले. या प्रसंगी व्यासपीठावर परांजपे विद्या मंदिराचे मुख्याध्यापक अनंता चिनके व कन्या शाळेच्या मुख्याध्यापिका प्रतिभा गावंड आदी उपस्थित होत्या. चिनके यांनी यावेळी विद्यार्थ्यांना मार्गदर्शन करताना भारतीय संस्कृतीमध्ये असणारे सणांचे महत्त्व विशद केले तसेच शालेय विद्यार्थ्यांना सर्वधर्मसमभावाचे, स्त्रियांप्रति आदर राखणारे सण आपण साजरे केले पाहिजे, असे प्रतिपादन केले. विद्यालयातील गाईड पथकातील मुलींनी परांजपे विद्यामंदिराच्या स्काऊट पथकातील विद्यार्थ्यांना राखी बांधून हा सण साजरा केला. याप्रसंगी स्काऊटर ज्ञानदेव साळवे, महेश वळवी, गाईडर वंदना पवार, निशा पोशिरकर, सांस्कृतिक प्रमुख अंजली सुतार, आकाश खडसे, महेश वळवी, गणेश कदम उपस्थित होते.

## ऑनलाईन जुगारामुळे कर्ज; वृद्धेची हत्या

**भिवंडी :** भिवंडी येथील झाटेपाडा भागात वृद्धेची गळा चिरून हत्या करत तिच्या घरातील दागिने चोरी केल्याचा प्रकार उघडकीस आला आहे. याप्रकरणी भिवंडी तालुका पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला असून पोलिसांनी अभिमन्यू गुप्ता याला अटक केली आहे. वृद्धेची हत्या केल्यानंतर पुरावा नष्ट करण्यासाठी तिचे घर जाळण्याचाही प्रयत्न गुप्ता याने केला होता. अभिमन्यू याला ऑनलाईन जुगाराचे व्यसन होते. त्यामुळे कर्ज झाल्याने त्याने हे कृत्य केल्याचे तपासात समोर आले आहे. झाटेपाडा येथील गावात सेल्वाममेरी नाडर या वयोवृद्ध महिला एकट्या राहात होत्या. १४ ऑगस्टला त्यांचा मृतदेह पोलिसांना आढळून आला होता. तसेच, त्यांच्या घरातील दागिन्यांची चोरी झाली होती. याप्रकरणी भिवंडी तालुका पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला होता. दरम्यान, यापकरणातील आरोपी हा ठाण्यातील कापूरबावडी येथे असल्याची माहिती पोलिसांना मिळाली.

## भोंगा वाजविल्याने रिक्षा चालकाच्या डोक्यात दगड मारला

**ठाकुर्ली :** रस्त्यामधून चालणाऱ्या पादचाऱ्यांना दूर करण्यासाठी शनिवारी रात्री साडे बारा वाजता ठाकुर्ली भागात राहत असलेल्या एका रिक्षा चालकाने ठाकुर्ली पूर्व रेल्वे स्थानकाच्या भागातील रस्त्यावरून जात असताना भोंगा वाजविला. त्याचा राग एका पादचाऱ्याला आला. त्याने रिक्षा चालकाला भोंगा का वाजविला, असा प्रश्न करून बाजूला पडलेला एक मोठा दगड रिक्षा चाकाच्या डोक्यात मारून त्याला गंभीर जखमी केले.पादचाऱ्याने अचानक हल्ला केल्याने रिक्षा चालक गंभीर जखमी झाला. त्याच्या डोक्यात दगडाचा वर्मी घाव बसला. त्यामुळे तो रक्तबंबाळ झाला. इतर प्रवाशांनी मध्यस्थी करून पादचाऱ्याला दूर केले, अन्यथा पादचाऱ्याने रिक्षा चालकाला आणखी मारहाण केली असती, असे प्रत्यक्षदर्शीने सांगितले. लक्ष्मण चौधरी असे रिक्षा चालकाचे नाव आहे.

# मुलींवरील अत्याचाराप्रकरणी मुख्याध्यापिकेसह चौघांचे निलंबन

**प्रतिनिधी**
■ **बदलापूर**

बदलापूर पूर्व येथील एका नामांकित शाळेत दोन चिमूरड्यांवर झालेल्या लैंगिक अत्याचार प्रकरणावरून स्थानिक पोलीस आणि शाळा प्रशासनावर टीकेची झोड उठवली जात असतानाच आता शाळेने माफीनामा जाहीर केला आहे. याप्रकरणी शाळेतील संबंधित मुख्याध्यापिकेला निलंबित करण्यात आले असून मुलांची जबाबदारी असलेल्या दोन सेविकांना सेवेतून कमी करण्यात आले आहे.

नागरिकांनी शाळेविरुद्ध आंदोलनाचा निर्णय घेतला आहे. स्थानिक आमदार किसन कथोरे यांनी याप्रकरणी देवेंद्र फडणवीस यांना हा खटला फास्टट्रॅकवर चालवण्याची मागणी केली आहे. तर शिक्षक आमदार ज्ञानेश्वर म्हात्रे यांनी याप्रकरणी कठोर पावले उचलण्याचे निर्देश दिले आहेत. तर यात हलगर्जीपणा करणाऱ्या वरिष्ठ पोलीस निरीक्षक शुभदा शितोळे यांची उचलबांगडी करण्यात आली आहे.

### शाळेचा माफीनामा



सबंधित संस्थेने जाहीर केलेल्या माफिनाम्यात या प्रकाराला तो दुर्दैवी, घृणास्पद आणि निंदनीय म्हटले आहे. या प्रकारानंतर सबंधित आरोपी विरुद्ध कारवाई करण्यासाठी पूर्ण क्षमतेने संस्थेने पोलिसांना सहकार्य केले. या घटनेनंतर सबंधित कर्मचाऱ्यावर कठोर शिक्षा व्हावी यासाठी संस्थेचा आग्रह आहे, असे शाळेने निवेदनात म्हटले आहे. आरोपीची हकालपट्टी करण्यात आली असून ज्या खासगी कंत्राटदाराच्या माध्यमातून हा कर्मचारी कंत्राटी पद्धतीने संस्थेच्या सेवेत आला होता. त्या कंत्राटदार कंपनीला कायमस्वरूपी काळ्या यादीत टाकून त्याचा करार रद्द केला आहे. तसेच हा प्रकार ज्या ठिकाणी घडला त्या ठिकाणी विद्यार्थ्यांच्या सुरक्षेची जबाबदारी असलेल्या मुख्याध्यापिका यांना निलंबित करण्यात आल्याचेही संस्थेने सांगितले आहे. तसेच त्या वर्गाच्या वर्गशिक्षका, मुलांची ने आण सुरक्षितरित्या करण्याची जबाबदारी असणाऱ्या सेविका यांनाही सेवेमधून कमी करण्यात आले आहे. पूर्व प्राथमिक आणि शिशु वर्गाच्या विद्यार्थ्यांच्या सुरक्षेच्या आणि सांभाळ करण्याच्या दृष्टीने फक्त महिलांचीच नेमणूक केली जाणार आहे. या प्रकरणात पालकांना झालेल्या मनस्तापाबद्दल संस्थेने त्यांची जाहीर माफी मागितली असून त्यांना कायदेशीर मदत देऊ केली आहे. तसेच विद्यार्थ्यांच्या शिक्षणात कोणताही अडथळा येऊ नये यासाठी सर्व पालक, विद्यार्थी आणि शहरातील सजग नागरिकांना संस्थेने शांततेचे आवाहन केले आहे. कोणत्याही प्रकारच्या चर्चेसाठी संस्था तयार असल्याचेही संस्थेचे अध्यक्ष उदय कोतवाल यांनी सांगितले आहे. शहरातील विविध सामाजिक संघटना आणि राजकीय पक्ष या प्रकरणात आक्रमक झाले असून त्यांनी मंगळवारी शाळा प्रशासनाविरुद्ध आंदोलन करण्याचा इशारा दिला आहे. या प्रकरणावर मुरबाड विधानसभा मतदारसंघाचे आमदार किसन कथोरे यांनी पत्रकार परिषद घेत या प्रकाराचा निषेध केला आहे.

# टिटवाळ्यातील बेकायदा चाळी भुईसपाट

### जनतेच्या तक्रारींमुळे पालिकेचा हातोडा

**प्रतिनिधी**
■ **कल्याण**

टिटवाळा पूर्व भागातील गणेशनगर, आर. के. नगर परिसरात भूमाफियांनी उभारलेल्या ४० हून अधिक बेकायदा चाळी, चाळींचे जोते अ प्रभागाच्या तोडकाम पथकाने साहाय्यक आयुक्तांच्या उपस्थितीत भुईसपाट केले. टिटवाळा, मांडा परिसरातील बेकायदा चाळींच्या बाबतीत पालिकेत तक्रारी वाढल्याने या बेकायदा चाळी जमीनदोस्त करण्याची मोहीम सुरू करण्यात आली आहे.

टिटवाळा पूर्व भागातील गणेशनगर, आर. के. नगर भागात सर्वाधिक बेकायदा चाळी, या भागात चाळी उभारणीसाठी नवीन जोती बांधण्याची कामे मोठ्या प्रमाणात सुरू असल्याची माहिती अ प्रभागाचे साहाय्यक आयुक्त संदीप रोकडे यांना मिळाली होती. या बेकायदा चाळींची प्रत्यक्ष पाहणी करून झाल्यानंतर आयुक्त डॉ.



इंदुराणी जाखड यांच्या आदेशावरून अतिक्रमण नियंत्रण उपायुक्त अवधूत तावडे यांच्या मार्गदर्शनाखाली साहाय्यक आयुक्त रोकडे, अधीक्षक नंदकिशोर वाणी यांच्या तोडकाम पथकाने गणेशनगर, आर. के. नगर भागात जाऊन तेथील बेकायदा चाळी जेसीबीच्या साहाय्याने भुईसपाट केल्या. यामध्ये ४० हून अधिक चाळी आणि जोत्यांची बांधकामे तोडण्यात आली. टिटवाळा भागातील बनेली, बल्याणी भागात गेल्या दहा वर्षांच्या काळात याभागातील टेकड्या, डोंगर खोदून भूमाफियांनी बेकायदा चाळी उभारल्या आहेत. टिटवाळा भागात बेकायदा बांधकामांच्या विरोधात जोरदार तोडकाम मोहीम सुरू झाल्याने भूमाफियांमध्ये अस्वस्थता पसरली आहे. टिटवाळा, मांडा परिसरात उभारण्यात आलेल्या बेकायदा चाळी तोडण्याची मोहीम सुरू करण्यात आली आहे. टप्प्याटप्प्याने ही बेकायदा चाळी, गाळ्यांची बेकायदा बांधकामे जमीनदोस्त केली जातील.

# नागरीकांसाठी किटकजन्य रोग व साथरोगांच्या विशेष शिबीरांचे आयोजन

**प्रतिनिधी**
■ **नवी मुंबई**

नवी मुंबई महानगरपालिका कार्यक्षेत्रा मध्ये हिवताप / डेंगी, जलजन्यथ व साथरोग आजारांबाबत जनजागृती होणे करीता जाहिर विशेष शिबिरांचे आयोजन करण्यात येत आहे. सदर शिबिरांकरीता नागरीकांचा चांगला प्रतिसाद मिळाला आहे.

त्याअनुषंगाने कार्यक्षेत्रात जास्तीच जास्त नागरीकांपर्यंत पोहोचुन जनजागृती करणेकरीता दि. 20 ऑगस्ट 2024 रोजी खालील प्रमाणे विशेष जाहीर शिबिरांचे



आयोजन करण्यात येत आहे.

उपरोक्त तक्त्यामध्ये नमुद ठिकाणी सर्व तापाच्या रुग्णांचे रक्तनमुने घेण्यात येणार आहेत तसेच हिवताप / डेंग्यु, जलजन्य व साथरोग या आजारांबाबत माहिती देण्यात येणार आहे. शिबिरांची वेळ सकाळी 10:00 ते दुपारी 2:00 वाजे पर्यंत आहे.

हिवताप / डेंग्यु, जलजन्य व साथरोग आजारावर नियंत्रण मिळविण्यासाठी नागरीकांच्या प्रत्यक्ष सहभागाची आवश्यकता असुन, नमुंमपा कार्यक्षेत्रातील नागरीकांनी शिबिरांचा लाभ घ्यावा व ताप असल्यास रक्ताची तपासणी करुन घ्यावी तसेच हिवताप / डेंग्यु, जलजन्य व साथरोग आजाराबाबत माहिती घ्यावी असे आवाहन मा. आयुक्त, डॉ. कैलास शिंदे, यांनी केले आहे.

# 'मुख्यमंत्री युवा कार्य प्रशिक्षण' योजनेचा लाभ उपलब्धतेसाठी 20 ऑगस्टला पालिका मुख्यालयात शिबिर

### 21 व 22 ऑगस्ट रोजी परिवहन उपक्रमाच्या घणसोली आगारात विशेष कार्यक्रम

**प्रतिनिधी**
■ **नवी मुंबई**

महाराष्ट्र शासनाच्या कौशल्य रोजगार उद्योजकता व नाविन्यता विभागाच्या वतीने राबविण्यात येणा-या 'मुख्यमंत्री युवा कार्य प्रशिक्षण' योजनेंतर्गत नवी मुंबई महानगरपालिकेत 6 महिन्यांच्या कालावधीकरिता शिकाऊ उमेदवार म्हणून प्रशिक्षण देणेकामी 30 संवर्गातील एकूण 194 पदांसाठी दि.14 व 20 ऑगस्ट 2024 रोजी विशेष शिबीराचे आयोजन करण्यात आले होते.

यामध्ये पात्र 144 उमेदवारांची 6 महिन्यांच्या कार्य प्रशिक्षणाकरिता (इंटर्नशिप) निवड करण्यात आली आहे. उर्वरित 50 पदांकरिता यापूर्वीच जाहीर केल्याप्रमाणे मंगळवार दि.20 ऑगस्ट रोजी विशेष शिबीर महानगरपालिका मुख्यालयात संपन्न होत आहे.

तरी पात्र उमेदवारांनी 21 ऑगस्ट व 22 ऑगस्ट रोजी सकाळी 10.30 ते सायं. 5.30 पर्यंत नवी मुंबई महानगरपालिका परिवहन उपक्रमाचे घणसोली आगार, से-15, घणसोली येथे आवश्यक कागदपत्रांसह उपस्थित राहावे असे आवाहन करण्यात येत आहे.

सदर नियुक्तीच्या अनुषंगाने शासनाकडील दि.09.07.2024 रोजीच्या शासन निर्णयामधील सर्व अटी व शर्ती उमेदवारावर बंधनकारक राहतील याची नोंद घ्यावी असे सूचित करण्यात आले आहे.

तरी पात्र युवकांनी 'मुख्यमंत्री युवा कार्य प्रशिक्षण योजने'चा लाभ घेण्यासाठी दि. 20 ऑगस्ट 2024 रोजी महापालिका मुख्यालयात तसेच दि. 21 व 22 ऑगस्ट रोजी नमुंमपा परिवहन उपक्रमाच्या घणसोली आगार येथे उपस्थित रहावे असे आवाहन नवी मुंबई महानगरपालिकेच्या वतीने करण्यात येत आहे.

# मनसे तर्फे 'खेळी नारळ फोडी 2024' जुईनगर मध्ये उत्साहात साजरा



**प्रतिनिधी**
■ **नवी मुंबई**

श्रावण महिना हा हिंदू धर्मियांसाठी पवित्र महिना असल्याने या श्रावण महिन्यात अनेक पवित्र सण मोठ्या श्रध्देने साजरे केले जातात. याच श्रावणमहिन्यात कोकणात विशेषतः समुद्र किनाऱ्यालगत असलेल्या तालुक्यात नारळ फोडी स्पर्धा मोठया प्रमाणात आयोजित केल्या जातात.

त्याच उद्देशाने मनसे शहर अध्यक्ष गजानन काळे यांच्या मार्गदर्शनाखाली तसेच त्यांच्या प्रमुख उपस्थितीत नवी मुंबईकरांसाठी, आगरी-कोळी परंपरा जपण्यासाठी "महाराष्ट्र नवनिर्माण सेना" जुईनगर - नेरुळ विभाग विभाग अध्यक्ष अक्षय भोसले यांनी नवी मुंबईत प्रथमच म्हणजे जुईनगर मध्ये "खेळी नारळी फोडी स्पर्धा" आयोजित केली. ह्या पारंपरिक खेळाला जुईनगरकरांनी मोठ्या संख्येने आपली उपस्थिती दाखवली. ह्या मध्ये प्रथम पारितोषिक चांदीच्या नारळाचे मानकरी ठरले हणमंत जाधव द्वितीय पारितोषिक जालिंदर पाटील व तृतीय पारितोषिक हर्षल दिग्रस्कर यांनी पटकावले. तसेच महिलांमध्ये सूनया गावडे यांना मिळाली मानाची पैठणी. त्याचबरोबर जुईनगरमधील ३ गोविंदा पथकांनी ५ थर लाऊन सलामी दिली आणि कार्यक्रमाची शोभा वाढवली. या कार्यक्रमास विभाग सचिव मंगेश जाधव, उपविभाग अध्यक्ष अर्जुन पाटील, शाखा अध्यक्ष मयुर कारंडे, संकेत बोडके, प्रवीण शिंदे व इतर पदाधिकारी आणि महाराष्ट्र सैनिक उपस्थित होते.

# 'वाहतूक कोंडी' संदर्भात शिवसेनेच्या पदाधिकाऱ्यांनी घेतली उरणच्या वरिष्ठ पोलीस निरीक्षकांची भेट

**प्रतिनिधी**
■ **उरण**

उरण तालुक्यातील खोपटा ते कोप्रोली आणि दास्तान ते दिघोडे तसेच उरणमधील वाहतूक कोंडी मुळे सामान्य जनतेस होणाऱ्या त्रासामुळे शिवसेना(उद्धव बाळासाहेब ठाकरे) पक्ष्याच्या वतीने आयोजित केलेल्या ८ ऑगस्ट २०२४ रोजी तहसील कार्यालयावरील मोर्चामध्ये दिल्या गेलेल्या आश्वासनाबद्दल काय उपाय योजना केल्या ? त्याबद्दल चौकशी



करण्यासाठीकार्यसम्राट माजी आमदार तथा जिल्हाप्रमुख मनोहरशेठ भोईर यांच्या आदेशानुसार शिवसेना उरण तालुका प्रमुख संतोष ठाकूर यांच्या नेतृत्वाखाली उरण वाहतूक पोलिस निरीक्षक अतुल दहिफळे यांची भेट घेण्यात आली.

जवळपास आता सणवार सुरु झाले असून उरण परिसरातील नागरिक हे जास्ती संख्येने बाहेर पडत आहेत शिवाय शाळेतील मुले, आजारी पेशंट आणि कामगार वर्ग यांना देखील वाहतूक कोंडीचा नाहक फटका बसत आहे, त्यासाठी ८ ऑगस्ट २०२४ रोजी यासंदर्भात उरण तहसिल कार्यालयावर शिवसेना(उद्धव बाळासाहेब ठाकरे) पक्ष्याच्या वतीने भव्य मोर्चा काढण्यात आला होता.

# प्लास्टिक प्रतिबंधाकडे विशेष लक्ष देण्याचे पालिका आयुक्तांचे निर्देश



**प्रतिनिधी**
■ **नवी मुंबई**

यावर्षीचा गणेशोत्सव 'प्लास्टिकमुक्त' असावा ही संकल्पना नागरिकांपर्यंत प्रभावीपणे पोहोचविण्यासाठी व्यापक प्रयत्न करावेत व त्या अनुषंगाने गणेशोत्सवाच्या सजावटीत प्लास्टिक, थर्माकोल व फोमचा वापर न करता कागद, कापड व पुनर्वापरयोग्य साहित्याचा वापर करण्यासाठी नागरिकांना प्रोत्साहित करावे आणि त्यादृष्टीने जनजागृती करावी असे निर्देश नमुंमपा आयुक्त डॉ.कैलास शिंदे यांनी विभागप्रमुखांच्या आढावा बैठकीप्रसंगी दिले. याप्रसंगी अतिरिक्त आयुक्त सुनिल पवार, अतिरिक्त आयुक्त तथा शहर अभियंता श्री. शिरीष आरदवाड व इतर विभागप्रमुख उपस्थित होते.

गणेशोत्सव मंडळांना सुलभ रितीने मंडप परवानगी प्राप्त व्हावी याकरिता महानगरपालिकेच्या वतीने "इ-सेवा संगणक प्रणाली" सुरु करण्यात आली असून https:// app.nmmconline.in या संकेतस्थळावर मंडळांनी अर्ज करून सहजपणे परवानगी प्राप्त करून घ्यावी याची व्यापक प्रसिध्दी करावी. यादृष्टीने गणेशोत्सव मंडळांच्या विभाग कार्यालय स्तरावर बैठका घ्याव्यात असे आयुक्तांमार्फत निर्देशित करण्यात आले.

# वडिलांच्या मित्राकडून अल्पवयीन तरुणीवर बलात्कार

### 75 वर्षीय आरोपी अटकेत

■ **अंबरनाथ**

अंबरनाथ शहरात एका १७ वर्षीय अल्पवयीन तरुणीवर तिच्या दिवंगत वडिलांच्या मित्रानेच बलात्कार केल्याचा धक्कादायक प्रकार उघडकीस आला आहे. याप्रकरणी ७५ वर्षीय निसार ठाणगे या आरोपीला पोलिसांनी बेड्या ठोकल्या आहेत. अंबरनाथ पोलीस ठाण्यात याप्रकरणी गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

अंबरनाथ शहरातील पश्चिम भागात हा धक्कादायक प्रकार समोर आला आहे. ही तरुणी तिच्या आईसोबत राहते. आरोपी निसार ठाणगे याची पीडित मुलीच्या वडिलांशी मैत्री होती. पीडित मुलीच्या वडिलांच्या निधनानंतरही ठाणगे याने कौटुंबिक संबंध ठेवले होते. त्यामुळे त्याचे घरी येणे जाणे होते. गेल्या आठवड्यात ९ ऑगस्ट रोजी काही साहित्य घेण्याच्या बहाण्याने ठाणगे याने घरात प्रवेश केला. ही तरुणी घरात एकटी असताना निसार ठाणगे याने संधी साधत अल्पवयीन मुलीवर बलात्कार केला.

# कारला ट्रकची पाठीमागून धडक, महिलेचा मृत्यू

■ **पनवेल**

19 ऑगस्ट रोजी पहाटे 4.10 च्या सुमारास मुंबई- पुणे द्रुतगती महामार्गावर मुंबई लेनवर किमी 2/650 खांदेश्वर पोलीस ठाणे हद्दीत आदई गाव ब्रिजजवळ अपघात झाला असून यात कारमधील महिलेचा मृत्यू झाला. निर्मला शिंदे असे मृत महिलेचे नाव आहे. यातील रिट्झ कार क्रमांक एम एच 12 एचएफ 1789 वरील



चालक दिनेश जनार्दन शिंदे (वय 45 वर्ष रा नेरुळ,नवी मुंबई) हे मुंबई पुणे महामार्गावरुन मुंबई बाजूकडे जात असताना किमी 2/650 या ठिकाणी आले. यावेळी त्यांनी लघुशंका करण्यासाठी कार शोल्डर लेनला घेत असताना कारचा वेग कमी केल्याने पाठीमागून येणारा ट्रक क्र. टी एन 4 झेड 8974 वरील चालक वेडी वेल (वय 36 वर्ष रा. मदुराई तामिळनाडू) याला ट्रक नियंत्रित न झाल्याने पुढे असणाऱ्या कारला पाठीमागून ठोकर मारून अपघात केला.

# नगरकर ज्वेलर्सच्या भव्य दालनाचे ठाण्यात उद्घाटन

**प्रतिनिधी**
■ **ठाणे**

गेल्या सात दशकांपासून वैशिष्ट्यपूर्ण आणि डिझाईनर दागिन्यांसाठी प्रसिद्ध असलेल्या पुण्यातील श्रीपाद शंकर नगरकर ज्वेलर्स रविवारपासून ठाणेकरांच्या सेवेत रुजू झाले आहे. ठाण्यातील राम मारुती रोड येथे नगरकर ज्वेलर्सच्या भव्य दालनाचे उद्घाटन रविवारी झाले. अद्वितीय, कलाकुसरीचे आणि दुर्मिळ डिझाईन्सच्या दागिन्यांनी हौशी ठाणेकरांचे लक्ष वेधून घेतल्याचे संचालक पुष्कर नगरकर यांनी सांगितले.

७२ वर्षांची परंपरा, ग्राहकांचे

### दुर्मिळ डिझाईनच्या 'क्षितिजा'ने वेधले लक्ष



समाधान आणि विश्वासार्हता कायम राखणाऱ्या नगरकर ज्वेलर्सचे संचालक वसंत नगरकर, वासंती नगरकर आणि स्वाती नगरकर या प्रमुख मंडळींच्या हस्ते या दालनाचे उद्घाटन झाले. प्रसंगी संचालक प्रसाद नगरकर, पुष्कर नगरकर, पूजा नगरकर-कुलकर्णी, रोहन कुलकर्णी, प्रियांका नगरकर आदी उपस्थित होते.

वसंत नगरकर म्हणाले, "पुण्यातील तुळशीबाग, लक्ष्मी रोड येथे गेल्या ७२ वर्षांच्या ग्राहकाभिमुख सेवेनंतर ठाणेकरांना नाविन्यपूर्ण दागिन्यांची पर्वणी उपलब्ध करून देताना आम्हाला आनंद होत आहे. सोने, चांदी, हिरे यातील पारंपरिक आणि फ्युजन दागिन्यांचे असंख्य प्रकार आपल्याकडे आहेत. कमी वजनापासून ते जास्त वजनापर्यंतचे सर्व दागिने येथे मिळणार आहेत. मंगळसूत्र, नेकलेस, कानातले सर्व प्रकारचे दागिने तयार, तसेच कस्टमाइज डिझाईनमध्ये करून मिळणार आहेत. त्यामुळे ठाणेकरांनी आवर्जून या दालनाला भेट द्यावी."

# रामदास आठवलेंनी घेतली दिवंगत यशश्री यांच्या कुटुंबियांची सांत्वनपर भेट



**प्रतिनिधी**
■ **उरण**

बौद्ध विद्यार्थिनी यशश्री शिंदे या युवतीची निर्घून हत्या झाल्याची मानवतेला कलंक लावणारी घटना उरण मध्ये नुकतीच घडली.त्या दिवंगत यशश्री शिंदेच्या घरी आज उरणमध्ये रिपब्लिकन पक्षाचे राष्ट्रीय अध्यक्ष केंद्रीय सामाजिक न्याय राज्यमंत्री रामदास आठवले यांनी भेट देऊन शोकाकुल शिंदे कुटुंबियांची सांत्वन्पर भेट घेतली. सामाजिक न्याय विभागातर्फे दिवंगत यशश्री शिंदे कुटुंबीयांना आठ लाख 25 हजाराची सांत्वनपर मदत आणि रिपब्लिकन पक्षातर्फे एक लाखाची मदत लवकरच देण्याचे आश्वासन ना .रामदास आठवले यांनी दिले.

दिवंगत यशश्री शिंदे यांचे वडील कंत्राटी कामगार असून तिला दोन बहिणी आहेत.त्यातील मोठ्या बहिणीला समाज कल्याण विभागा तर्फे तातडीने चांगली नोकरी मिळवून देण्याची सूचना ना.रामदास आठवले यांनी रायगड जिल्हा समाज कल्याण अधिकाऱ्यांना यावेळी दिले.यशश्री शिंदे यांच्या मारेकऱ्याला फाशीची शिक्षा दिली पाहिजे अशी मागणी ना.रामदास आठवले यांनी केली. महिला अत्याचार बलात्कार आणि हत्या रोखण्यासाठी सरकार ने शक्ती कायदा करून फाशीची शिक्षा करण्याचा कठोर कायदा केला आहे तरी असे निर्घृण प्रकार घडत आहेत. फाशीची शिक्षा असणारा कठोर कायदा असताना लव्ह जिहाद साठी नवीन कायद्याची गरज नाही आणि लव्ह जिहाद हा प्रकार आपण मानत नाही असे आठवले यावेळी म्हणाले.

## आदिवासी मुलींनी झाडांना बांधल्या राख्या

■ **अलिबाग**

जागतिक तापमानवाढीच्या बाबतीत जनजागरण व्हावे, या उद्देशातून अंकुर ट्रस्टच्या मुलांनी झाडा-झुडुपांना राख्या बांधून पर्यावरणासंदर्भात असलेली आपुलकी दाखवून दिली. राखीपौर्णिमेनिमित्त स्नेह व नातेसंबंधातील प्रेम वृद्धिंगत करण्याची प्रथा अस्तित्वात आली आहे. अंकुर संस्थेच्या मुलांनी पर्यावरणाप्रती बांधिलकी जपत झाडांना प्रतीकात्मक राखी बांधली. ज्येष्ठ सामाजिक कार्यकर्त्या डॉ. वैशाली पाटील संस्थापक असलेल्या अंकुर ट्रस्ट या स्वयंसेवी संस्थेत एकूण ७० कातकरी व स्थलांतरित मजुरांची मुले शिक्षण घेत आहेत. या आगळ्या वेगळ्या कार्यक्रमात नसरीन मणियार, दीपाली व संदीप फडणीस, विलास पाटील व संस्थेचे विश्वस्त ए. राज हे उपस्थित होते. या वेळेस आदिवासी बालकांनी उपस्थित महिला पाहुण्यांना राखी बांधून झाडांना राख्या बांधून पर्यावरण पूरक रक्षा बंधनास सुरुवात केली.आदिवासी बालकांना अंकुरच्या कार्यकर्त्या श्रुती तिमाने यांनी इको फ्रेंडली राख्या बनवायला शिकवल्या.

## प्रभात युवा फेडरेशनतर्फे शैक्षणिक वस्तूंचे वाटप

**सांगली :** 17 ऑगस्ट रोजी मौजे वाळीखिंडी, तालुका जत, जिल्हा सांगली येथे प्रभात युवा फेडरेशन (मुंबई), संस्थापक अध्यक्ष दिलीप उबाळे यांच्यातर्फे जिल्हा परिषद मराठी मुलांची शाळा वाळेखिंडी आणि श्री सिद्धीनाथ हायस्कूल वाळेखिंडी या शाळेतील विध्यार्थी यांना स्कूल बॅग आणि नोटबुक इत्यादी शैक्षणिक वस्तूंचे वाटप करण्यात आले. यावेळी सर्व मान्यवरांनी उपस्थिती राहून कार्यक्रम संपन्न झाला. गरजू विद्यार्थी व निराधार आणि होतकरू या विद्यार्थ्यांना शैक्षणिक साहित्य वाटप करण्यात आले. सदर कार्यक्रम हा ग्रामसेवक, सरपंच, उपसरपंच, वाळेखिंडीचे सदस्य आणि मान्यवर यांच्या हस्ते विद्यार्थ्यांना वाटप करण्यात आले. तसेच मुख्याध्यापक, हेडमास्तर व शिक्षक वर्ग यांच्या विनंतीनुसार कार्यक्रम राबवण्यात आला. या कार्यक्रमाला प्रभात युवा फाउंडेशनचे जत तालुका सचिव प्रशांत चव्हाण व सदस्यांनी या कार्यक्रमात मोलाचे सहकार्य केले.



### महत्त्वाचे

## गोठ्यात शिरून बिबट्याने केली शेळ्यांची शिकार

**नागपूर :** जंगलातून भटकून गावात शिरलेल्या बिबट्याने सलग दोन दिवस एकाच घरातील गोठ्यात बांधलेल्या शेळ्यांवर मध्यरात्रीच्या सुमारास हल्ला करून फस्त केल्याची घटना उघडकीस आली आहे. ही घटना तालुक्यातील मडेघाट येथे 18 ऑगस्ट रोजी मध्यरात्रीच्या सुमारास घडली असून, सोमवार 19 ऑगस्ट रोजी सकाळी उघडकीस आली. सूर्यकांत रामकृष्ण गदरे (40) व रामकृष्ण सदाशिव गदरे असे पीडित पशुपालकांचे नाव आहे. या दोन्ही शेळ्या गाभण होत्या. पीडित पशुपालक शेतकरी असून शेतीला जोड व्यवसाय म्हणून गत काही वर्षापासून पशुपालनाचा व्यवसाय करीत आहेत. पशुपालना अंतर्गत गाई, म्हशी, वासरु, मेंढ्यांचे व शेळ्यांचे पालन केले जाते. भक्ष्याच्या शोधात गावात प्रवेश केलेल्या वाघ वा बिबट्याच्या हल्ल्यात पाळीव प्राणी ठार होतात. घटनेच्या आदल्या दिवशी पशुपालकाने गाई, म्हशी, व शेळ्या चारुन आणून रात्रीच्या सुमारास घरालगत असलेल्या गोठ्यात बांधून ठेवल्या. मात्र, रात्रीच्या सुमारास बिबट्याने सतत दोन दिवस हल्ला करून दोन गाभण शेळ्या फस्त केल्या. ह्या दुर्घटनेत पीडित पशुमालकाचे जवळपास 27 हजार रुपयाचे नुकसान झाले असून, नुकसानभरपाई मिळण्याची मागणी पशुपालकाने केली आहे.

## बहिणीकडे निघालेल्या भावाचा दुर्दैवी मृत्यू

**सातारा :** रक्षाबंधनासाठी दुचाकीवरून साताराला येत असलेल्या युवकावर शनिवारी रात्री मेढा येथे काळाने घाला घातला. रत्नागिरी जिल्ह्यातील खेड येथून महाबळेश्वरमार्गे सातारला येत असताना मेढा बसस्थानकाजवळ अचानक आडव्या आलेल्या एसटीला दुचाकी धडकून दुघटना घडली. आदित्य संजय साळुंखे (वय 23, रा. सिद्धिविनायक रेसिडेन्सी, बसाप्पा पेठ, करंजे, सातारा) असे दुर्दैवी भावाचे नाव आहे. आदित्य हा रत्नागिरी जिल्ह्यातील खेड येथील योगिता डेंटल कॉलेजला बीडीएसच्या चौथ्या वर्षात शिकायला होता. रक्षाबंधनानिमित्त तो पल्सर मोटरसायकलवरून पोलादपूर, महाबळेश्वरमार्गे सातारला यायला निघाला होता. इतका लांबचा प्रवास सुरक्षितपणे पार पडला असताना आणि सातारा अवघ्या 24 किलोमीटर अंतरावर आला असताना त्याच्यावर काळाने घाला घातला.

## कोथरूड भागात भरदिवसा घरफोडी

**पुणे :** पुणे शहरात घरफोडीचे सत्र सुरूच असून चोरटयांनी कोथरूड भागातील एका सदनिकेत भर दिवसा चोरी करत 1 लाख 2 हजार 500 रुपयांचा मुद्देमाल चोरून नेल्याची घटना घडली. मागच्या काही दिवसात चोरटे भर दिवसा घरफोडी करत असल्याने त्यांच्यावर कोणाचा धाक राहिला नसल्याची चर्चा आहे. कोथरूड गव्हाण भागातील एक सदनिकेचे कुलूप तोडून चोरटयांनी सोन्या चांदीच्या दागिन्यांसह रोख रक्कम असा 1 लाख 2 हजार 500 रुपयांचा मुद्देमाल लंपास केला. याप्रकरणी हितेश प्रभाकर दळवी (वय-32, रा. कोथरूड गावठाण,पुणे) यांनी कोथरूड पोलीस ठाण्यात फिर्याद दाखल केली आहे. त्यानुसार अज्ञात चोरटीविरुद्ध गुन्हा दाखल करण्यात आला आहे.


# संभाजी भिडे कॉमेंट्स करायच्या लायकीचे आहेत का?

### भिडेंबद्दलचा प्रश्न पवारांनी झुरळ झटकावे तसा झटकला

प्रतिनिधी
■ पुणे

मराठा आरक्षणाचा विषय विधानसभा निवडणुकीच्या पार्श्वभुमीवर ऐरणीवर आला आहे. मराठा आरक्षणासाठी मनोज जरांगे पाटील आक्रमक भूमिका घेताना दिसत आहेत. वेळ आली तर 288 मतदारसंघात उमेदवार उभे करण्याची तयारी असल्याचे ते म्हणाले आहेत. तर शिवप्रतिष्ठान हिंदूस्थान संस्थेचे अध्यक्ष संभाजी भिडे यांनी मराठा आरक्षणावर रोखठोक भूमिका मांडली. यावर राष्ट्रवादी काँग्रेस शरदचंद्र पवार पक्षाचे प्रमुख शरद पवारांना पत्रकारांनी प्रश्न विचारला असता, त्यांनी संभाजी भिडे यांच्या वक्तव्यावर प्रतिक्रिया देण्यास स्पष्टपणे नकार दिला.





राष्ट्रवादी काँग्रेसचे (शरद पवार गट) सर्वेसर्वा शरद पवार आज पुण्यात माध्यमांशी बोलत होते. यावेळी त्यांना संभाजी भिंडेंच्या भूमिकेबाबत विचारले असता त्यांनी त्यावर बोलण्यास नकार दिला. पत्रकरांचा प्रश्न पूर्ण होण्याआधीच ते म्हणाले की, संभाजी भिडे वगैरे कॉमेंट्स करायच्या लायकीची माणसे आहेत का? तुम्ही काहीही प्रश्न विचारता का? म्हणूनच तुम्हाला भेटायला नाही म्हणत होतो. सध्या कसलेही प्रश्न विचारले जातात. आपल्या लोकांचा दर्जा फार उतरलेला आहे. संभाजी भिडे आणि अमूक, तमूक असे म्हणत शरद पवारांनी पत्रकार परिषद आटोपती घेतली.

त्याआधी शरद पवारांना अजित पवारांनी बारामती लढण्यात रस नसल्याचे म्हटले, या बाबत विचारणा करण्यात आली. त्यावर शरद पवार म्हणाले की, प्रत्येकाला निर्णय घेण्याचा अधिकार आहे, पण त्यांच्या मनात काय आहे माहित नाही, असे म्हणत पवारांनी अजित पवारांची बारामतीसंदर्भातील भूमिका संदिग्ध असल्याची सूचक प्रतिक्रिया दिली.

संभाजी भिडे यांनी मराठा आरक्षणावर मत व्यक्त केले होते. मराठ्यांना आरक्षणाची गरज नाही, अशी भूमिका त्यांनी घेतली आहे. ते म्हणले की, मराठ्यांनी देश चालवावा, आपले जंगल चालववे. आरक्षण कुठले घेऊन बसले? मुख्यमंत्री एकनाथ शिंदे राज्याचा गाडा हाकत आहेत.

# मालवणच्या समुद्रात बोट उलटली; तिघे बुडाले

प्रतिनिधी
■ मालवण

नारळी पौर्णिमा आणि रक्षाबंधन सण राज्यभरामध्ये मोठ्या उत्साहात आणि आनंदात साजरा केला जात आहे. अशातच सिंधुदुर्गमध्ये नारळी पौर्णिमा सणाला गालबोट लागल्याची घटना घडली आहे. मालवणमध्ये मासेमारी बोट बुडून ३ जणांचा मृत्यू झाला आहे. तिघांचे देखील मृतदेह सापडले असून हे सर्व खलाशी आचराचे असल्याची माहिती समोर आली आहे.

मिळालेल्या माहितीनुसार, आचरा येथील चार खलाशी मासेमारीसाठी रविवारी रात्री सर्जेकोट समुद्रात गेले होते. समुद्रामध्ये निर्माण झालेल्या धुक्यांमुळे बोट दगडाला आपटली. त्यानंतर ही बोट समुद्रात पलटी झाली आणि बोटीवरील चारही खलाशी समुद्रात बुडाले. यामधील ३ खालाश्यांचा समुद्रात बुडून मृत्यू झाला.

या खलाशांपैकी एक खलाशी पोहत पोहत समुद्रकिनारी पोहचला. त्याने घडलेल्या घटनेची



माहिती दिली. त्यानंतर समुद्रात बुडालेल्या तिन्ही खलाशांचा शोध घेण्यात आला. या तिन्ही खलाशांचे मृतेदह सापडले असून शवविच्छेदनासाठी रुग्णालयामध्ये पाठवण्यात आले आहेत. रुग्णालयाबाहेर खलाश्यांच्या नातेवाईकांनी मोठी गर्दी केली आहे.

या दुर्घटनेमध्ये सर्जेकोट सोसायटीचे चेअरमन गंगाराम आडकर यांचा मृत्यू झाला. अपघातग्रस्त बोट गंगाराम आडकर यांचीच होती. आडकर हे चौके विद्यालयातून सेवानिवृत्त झाले होते. या घटनेमुळे आडकर कुटुंबीयांना मोठा धक्का बसला असून नारळी पौर्णिमेच्या दिवशी सर्जेकोट गावावर शोककळा परसरली आहे.

# म्हाडा सोडतीचे अर्ज करण्याकरिता म्हाडाचे अधिकृत संकेतस्थळ व ॲपचाच वापर करावा !

### म्हाडा सोडत ऑनलाईन अर्ज प्रक्रियेबाबत माहिती देण्यासाठी आयोजित लाईव्ह वेबिनारद्वारे मुंबई मंडळाचे आवाहन

प्रतिनिधी
■ मुंबई

म्हाडा मुंबई मंडळाच्या २०३० सदनिकांच्या विक्रीसाठी आयोजित ऑनलाइन संगणकीय सोडतीकरिता अर्ज करण्यासाठी https://housing.mhada.gov.in या अधिकृत संकेतस्थळाचा व MHADA HOUSING LOTTERY SYSTEM या ॲपचाच वापर करावा, असे आवाहन मुंबई मंडळातर्फे आज आयोजित लाईव्ह वेबिनारमध्ये करण्यात आले.

मुंबईतील विविध गृहनिर्माण प्रकल्पांतील २०३० सदनिकांच्या विक्रीसाठी दि. ०९ ऑगस्ट २०२४




पासून म्हाडाचे संकेतस्थळ https://housing.mhada.gov.in व मोबाइल ॲपद्वारे ऑनलाईन अर्ज नोंदणी व अर्ज स्वीकृती प्रक्रियेला प्रारंभ झाला आहे. म्हाडाच्या ऑनलाईन संगणकीय सोडतीसाठी अर्जदारांना अधिक सुलभतेने अर्ज सादर करता यावा, याबाबत मार्गदर्शनासाठी व इच्छुक अर्जदारांच्या शंका निरसनासाठी म्हाडा मुंबई मंडळातर्फे आज आयोजित ऑनलाइन वेबिनार उत्साहात पार पडला. या वेबिनारमध्ये 'म्हाडा'चे उपमुख्य कार्यकारी अधिकारी श्री. अनिल वानखडे, मुंबई मंडळाचे उपमुख्य अधिकारी (पणन) श्री. राजेंद्र गायकवाड, मुख्य माहिती व संचार तंत्रज्ञान अधिकारी सविता बोडके, माहिती व संचार तंत्रज्ञान अधिकारी श्री. संदीप बोदेले यांनी सोडत अर्ज प्रक्रियेविषयी माहिती दिली व इच्छुक अर्जदारांच्या प्रश्नांना उत्तरे दिली.

यावेळी श्रीमती बोडके म्हणाल्या की, म्हाडाच्या राज्यातील गृहनिर्माण प्रकल्पातील सदनिकांच्या विक्रीकरिता IHLMS 2.0 (Integrated Housing Lottery Management System) ही नूतन संगणकीय सोडत प्रणाली तयार करण्यात आली आहे. सदनिकेसाठी अर्ज करण्यापासून ते ताबा मिळेपर्यंतची संपूर्ण प्रक्रिया ऑनलाईन आहे. अत्याधुनिक तंत्रज्ञानानेयुक्त ही सोडत प्रक्रिया मानवी हस्तक्षेपविरहीत असून सोडत आज्ञावली अधिक पारदर्शक, सुलभ आणि सुरक्षित आहे. यावेळी श्रीमती बोडके यांनी अर्ज नोंदणी, अर्ज स्वीकृती, अनामत रकमेचा भरणा करणे या प्रक्रियेबाबत सादरीकरणासह माहिती दिली. अर्ज नोंदणी करताना इच्छुक अर्जदाराचा मोबाइल नंबर आधारशी लिंक असणे गरजेचे आहे. नोंदणी करतेवेळी अर्जदाराला digilocker या ॲपमध्ये स्वतःसह पती/पत्नीचे आधार व पॅन कार्ड अपलोड करून ते लिंक करणे आवश्यक आहे. यामुळे म्हाडाला पडताळणी केलेली कागदपत्रे मिळणार आहेत. अर्जदाराने दि. ०१ जानेवारी २०१८ रोजी नंतर जारी केलेले व बार कोड असलेले महाराष्ट्र राज्याचे अधिवास प्रमाणपत्र (Domicile Certificate) अपलोड करणे आवश्यक असल्याचे श्रीमती बोडके यांनी सांगितले.

# रत्नागिरीची शिवानी दोन हजार तासांच्या विमान उड्डाणासाठी सज्ज

प्रतिनिधी
■ रत्नागिरी

बालपणी पायलट होण्याचे पाहिलेले स्वप्न जिद्द, प्रयत्न व कठोर परिश्रमाने रत्नकन्या शिवानी सुबोध नागवेकर हिने सत्यात उतरवले आहे. सध्या हरयाणा गुडगाव येथे पायलट प्रशिक्षण घेणारी शिवानी २००० तासांचे विमान उड्डाण प्रवास झाल्यावर लवकरच ती मुख्य पायलट म्हणून सेवेत रुजू होणार आहे. शिवानीने घेतलेल्या या भरारीने जिल्ह्याच्या शिरपेचात मानाचा तुरा रोवला आहे.

रत्नागिरीत जन्मलेली शिवानी रत्नागिरीतील ज्येष्ठ व्यायामपटू भाई



विलणकर यांची नात व श्रद्धा आणि सुबोध नागवेकर यांची कन्या आहे. शिवानीला बालपणापासून विमानाची आवड होती. मात्र, केवळ हवाई सफर न करता आपण स्वत: ते उडवायचे अशी जिद्द तिने मनाशी बाळगली होती. त्यामुळेच मेकॅनिकल इंजिनिअरिंगचे शिक्षण घेत असतानाच अचानक तिने हे शिक्षण थांबवून थेट मुंबई गाठली.

# दाभोलकर खून खटल्यामध्ये हायकोर्टात अपील दाखल करण्यात सीबीआयची अक्षम्य दिरंगाई अंनिसचा आरोप

प्रतिनिधी
■ पुणे

10 मे 2024 रोजी पुणे येथील सत्र न्यायालयात डॉ. नरेंद्र दाभोलकरांच्या खुनाच्या खटल्याचा निकाल लागला. त्यामध्ये तीन आरोपींना पुरेशा पुराव्यांआभावी दोषमुक्त करण्यात आले. त्यानंतर शंभर दिवसांचा कालावधी उलटून गेला तरी सीबीआयने आरोपींच्या निर्दोष सुटकेच्या विरोधात उच्च न्यायालयात अपील दाखल केलेले नाही. 'या आरोपींच्या गुन्ह्यातील सहभागाचा वाजवी संशय आहे, परंतु विश्वासार्ह पुराव्यांद्वारा त्यांचा गुन्ह्यातील सहभाग सिद्ध करण्यात तपास यंत्रणा अयशस्वी ठरलेली आहे' असे कठोर शब्द सत्र न्यायालयाने निकालपत्रात वापरल्यानंतर देखील सी. बी. आय. कडून अजूनही अपील दाखल करण्यात आलेले नाही.

सत्र न्यायालयाच्या निकालाकडे सी. बी. आय. चे लक्ष वेधण्यासाठी दाभोलकर कुटुंबियांनी सीबीआय च्या मुख्य संचालकांच्या विचारार्थ निवेदन पाठवले आहे. त्याला सीबीआय कडून अजून प्रतिसाद देण्यात आलेला नाही. या खटल्यातील तीन आरोपींच्या निर्दोष सुटकेच्या विरोधात दाभोलकर कुटुंबियांनी पीडित व्यक्तीचे कुटुंब या भूमिकेतून मुंबई उच्च न्यायालयात अपील दाखल केले आहे. परंतु सीबीआय कडून मात्र ह्या मध्ये अक्षम्य दिरंगाई होत असून अपील दाखल करणे टाळले जात आहे अशी माहिती महाराष्ट्र अंधश्रद्धा निर्मूलन समितीच्या वतीने पुणे येथे घेण्यात आलेल्या पत्रकार परिषदेत डॉ. हमीद दाभोलकर, मिलिंद देशमुख, नंदिनी जाधव, राहुल थोरात, श्रीपाल ललवाणी यांनी दिली. तसेच सीबीआय ने तातडीने हे अपील दाखल करावे अशी देखील मागणी यावेळी करण्यात आली.

आज स्मृतिदिन डॉ. नरेंद्र दाभोलकर यांच्या अकराव्या स्मृतिदिनानिमित्त आज महाराष्ट्र अंधश्रद्धा निर्मूलन समितीच्या वतीने विविध कार्यक्रम आयोजित करण्यात आले आहेत.

### आज दाभोलकर स्मृतीदिनी शिवाजी पार्कवर निर्भय मॉर्निंग वॉक

*शहीद डॉ. नरेंद्र दाभोलकर यांच्या निर्घृण खूनाला 11 वर्षे पूर्ण झाली. त्यांच्या मारेकऱ्यांना शिक्षा सुनावली गेली, पण खूनाचा सूत्रधार मात्र अजूनही मोकाट आहे. या गोष्टीचा निषेध करत, खूनाचा सूत्रधार लवकर पकडला जावा अशी मागणी करत आणि अशा प्रकारे गोळ्या झाडून विचारांना थांबवता येत नाही हे सांगण्यासाठी महाराष्ट्र अंधश्रद्धा निर्मूलन समिती, मुंबई जिल्हा तर्फे आज सकाळी ७.३० वाजता शिवाजी पार्कवर, मीनाताई ठाकरे पुतळ्याजवळनिर्भय मॉर्निंग वॉकचे आयोजन करण्यात आले आहे. सर्व समविचारी संस्था, संघटना आणि परिवर्तनशील व अहिंसक विचारांचे नागरिक, कार्यकर्ते व हितचिंतक या निर्भय मॉर्निंग वॉक मध्ये सहभागी होणार आहेत.*

# सासरच्या त्रासामुळे तरुणाची आत्महत्या

### सासू, सासऱ्यांसह सहाजणांविरुद्ध गुन्हा

प्रतिनिधी
■ पुणे

सासरच्या त्रासामुळे तरुणाने गळफास घेऊन आत्महत्या केल्याची घटना वाघोली भागात घडली. याप्रकरणी लोणीकंद पोलिसांनी सासू, सासऱ्यांसह सहाजणांविरुद्ध गुन्हा दाखल केला.

रियाज मुल्ला (वय २६, रा. एस. टी. कॉलनी, बाजारतळाजवळ, वाघोली) असे आत्महत्या केलेल्या तरुणाचे नाव आहे. याबाबत त्याची आई शमीन मोहम्मद मुल्ला (वय ५४) यांनी लोणीकंद पोलीस ठाण्यात फिर्याद दिली आहे. त्यांनी दिलेल्या फिर्यादीनुसार, रियाजचे सासरे मुजीब बाबू शेख, सासू शाहीन, आजे सासरे चाँद मौला शेख, पत्नी सुफी, मेहुणी सना उस्मान शेख, मेहरुन शेख यांच्याविरुद्ध गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

रियाज याचा सुफी शेखशी विवाह झाला. विवाहानंतर किरकोळ कारणावरुन रियाजला अपमानास्पद वागणूक देऊन त्याला त्रास देण्यात आला. सासरकडील नातेवाईकांच्या त्रासामुळे रियाज नैराश्यात होता. नैराश्यातून त्याने राहत्या घरात गळफास घेऊन नुकतीच आत्महत्या केली. वरिष्ठ पोलीस निरीक्षक पंडीत रेजितवाड यांच्या मार्गदर्शनाखाली उपनिरीक्षक केदार तपास करत आहेत.

## महामुंबई बँकेचा एकाला 9 लाखांचा गंडा

■ राजापूर

राजापुरात महामुंबई निधी अर्बन बँकेने चारजणांना साडेआठ लाखांचा गंडा घातल्याचा प्रकार काही दिवसांपूर्वी उघड झाला होता. या बँकेने तालुक्यातील आणखी एकाला नऊ लाख दहा हजाराला गंडा घातल्याचे समोर आले आहे. राजापूर पोलिस ठाण्यात मुंबईतील तिघांवर गुन्हा दाखल करण्यात आला आहे. या फसवणूकप्रकरणी मनेश सखाराम कांबळे यांनी फिर्याद दिली आहे. त्यानुसार महामुंबई निधी अर्बन बँकेच्या राजापूर शाखेतील मंगेश महादेव जाधव, सागर रिकामे, मयूर पाटील यांच्यावर गुन्हा दाखल केला आहे.

# रामगिरी महाराजांवरील गुन्हा रद्द करा, भाविक आक्रमक

प्रतिनिधी
■ संभाजीनगर

सराला बेटाचे मठाधिपती रामगिरी महाराज यांच्यावर राज्यात वेगवेगळ्या पोलिस ठाण्यात दाखल झालेले गुन्हे तत्काळ रद्द करावेत, यापुढे गुन्हे दाखल करू नये, या मागणीसाठी महालगाव येथे रविवारी मोर्चा काढण्यात आला होता.

आंदोलकांचे निवेदन वीरगाव पोलिस ठाण्याचे सहायक पोलिस निरीक्षक शंकर वाघमोडे यांनी स्वीकारले. तसेच महाराजांवरील दाखल गुन्हे मागे घेतले नाही तर आंदोलन



तीव्र करण्यात येणार असल्याचा इशारा आंदोलकांनी या वेळी दिला. पांचाळे (ता. सिन्नर) येथे अखंड हरिनाम सप्ताहाच्या प्रवचनामध्ये विशिष्ट समाजाच्या भावना दुखावल्याचा आरोप महाराजांवर करण्यात आलेला आहे. यामुळे रामगिरी महाराजांवर राज्यातील अनेक पोलिस स्टेशनला गुन्हे दाखल झालेले आहेत. आता यापुढे पुन्हा गुन्हे दाखल होऊ नये व जे गुन्हे दाखल झालेले आहे ते शासनाने तत्काळ रद्द करावेत असे शासनाला देण्यात आलेल्या निवेदनात म्हटले आहे. या आंदोलनाला सकाळी ११ वाजता येथील श्रीराम मंदिरापासून टाळ, मृदंग वाजत सुरुवात झाली होती. गावातील सर्व महापुरुषांच्या पुतळ्यांना पुष्पहार घालून अभिवादन करून डॉ. बाबासाहेब आंबेडकर पुतळयासमोर मोर्चाचा समारोप झाला. यात अनेक गावांतील भाविक सहभागी झाले होते.

### महालगावात ग्रामस्थांनी वाजत-गाजत काढला मोर्चा

# विरोधकांकडून केवळ स्वार्थी राजकारणासाठी धारावीकरांची दिशाभूल आणि तथ्यहीन आरोप

प्रतिनिधी
■ मुंबई

आगामी विधानसभा निवडणुका डोळयासमोर ठेवून केवळ मतांच्या राजकारणासाठी विरोधकांच्या वतीने धारावीकरांच्या मनात संभ्रमाचे वातावरण तयार केले जात आहे. याचाच प्रत्यय रविवारी विरोधकांनी धारावीत आयोजित केलेल्या सभेतून धारावीकरांना आला. कोणतीही माहिती न घेता उबाठाच्या युवराजांनी 500 स्क्वेअर फुटांचे घर, संक्रमण शिबिर, माहीम निसर्ग उद्यान, कांदळवन आणि पात्र - अपात्र या नेहमीच्या मुद्द्यांवर पुन्हा एकदा धारावीकरांची दिशाभूल करण्याचा प्रयत्न केला. तसेच पुनर्विकास प्रक्रियेचा संबंध धार्मिक भावनांशी लावून धारावीतील सलोख्याचे वातावरण गढूळ करण्याचा देखील प्रयत्न या सभेतून करण्यात आला. या सभेतून ज्या मुद्द्यांच्या आधारे धारावीकरांच्या मनात संभ्रम निर्माण करण्याचा प्रयत्न करण्यात आला, त्याबाबतची वस्तूस्थिती पुढील प्रमाणे आहे.

**1. संक्रमण शिबिर :** वास्तविक, धारावी पुनर्विकास प्रकल्पात कोणतेच संक्रमण शिबीर उभारले जाणार नसून लाभार्थ्यांना थेट नव्या घरात प्रवेश करता येणार आहे. त्यामुळे वांद्रे रेक्लेमेशन येथे संक्रमण शिबिर उभारण्याचा प्रश्नच येत नाही.

**2. 500 स्क्वेअर फुटांचे घर:** धारावी पुनर्विकास प्रकल्पाची व्याप्ती आणि मर्यादा लक्षात घेता धारावीकरांना 350 स्क्वेअर फुटांचे मोफत घर देण्याचा निर्णय या आधीच्याच सरकारने घेतला होता. त्यामुळे आता केवळ या प्रकल्पात खोडा घालण्यासाठी 500 स्क्वेअर फुटांच्या घराचा मुद्दा वारंवार विरोधकांकडून चर्चेला आणला जात आहे.

**3. माहीम निसर्ग उद्यान आणि कांदळवन :** धारावीचा पुनर्विकास करताना माहीम निसर्ग उद्यान आणि धारावीच्या आजूबाजूच्या परिसरातील कांदळवन संरक्षित ठेवले जाईल, याची तरतूद या आधीच करण्यात आली आहे. मात्र,निसर्ग उद्यान आणि कांदळवन नष्ट केले जाईल, असा अपप्रचार विरोधकांकडून सुरू आहे.

**4. पात्र आणि अपात्र :** धारावी पुनर्विकास हा राज्य शासनाचा विशेष दर्जा प्राप्त झालेला प्रकल्प असून, हा एकमेव असा प्रकल्प आहे ज्यामध्ये पात्र आणि अपात्र या दोघांनाही हक्काचे घर दिले जाणार आहे. पात्र रहिवाशांना धारावीतच 350 स्क्वेअर फुटांचे मोफत घर दिले जाणार असून अपात्र रहिवाशांना प्रधानमंत्री आवास योजनेतून मुंबई मध्येच हक्काचे घर मिळणार आहे. हा निकष अंतिम करताना कोणत्याही प्रकारचा आक्षेप विरोधकांनी घेतला नव्हता किंबहुना आधीच्या सरकारच्या काळातच हा निर्णय घेण्यात आला होता. तरीही, आता केवळ मतांच्या राजकारणासाठी धारावीकरांमध्ये संभ्रमाचे वातावरण निर्माण केले जात आहे.

**5. धारावी पुनर्विकास प्रकल्प आणि धार्मिक संवेदना:** धारावी पुनर्विकास प्रकल्प हा माननीय मुख्यमंत्री श्री एकनाथजी शिंदे यांच्या नेतृत्वातील राज्य सरकारचा एक महत्त्वकांक्षी प्रकल्प आहे. या प्रकल्पातून धारावीचा पुनर्विकास करतानाच, धारावीकरांच्या आर्थिक-सामाजिक प्रगतीतून त्यांचे जीवनमान उंचावण्याचा प्रयत्न करण्यात येणार आहे. हा विकास करताना राज्य सरकारकडून कोणताही भेदभाव करण्यात येत नसून 'मिनी इंडिया म्हणून ओळखल्या जाणाऱ्या धारावीतील सामाजिक वातावरण बिघडवण्याचा प्रयत्न विरोधकांनी करू नये, ही विनंती करतो.



"वास्तविक, गेल्या अनेक दशकांपासून रखडलेल्या धारावी पुनर्विकास प्रकल्पाला महायुतीचे सरकार आल्यानंतर गती मिळाली आहे. स्थानिक जनतेला पुनर्विकासाची प्रतीक्षा असताना धारावी बाहेरील लोकांकडून पुनर्विकास प्रक्रियेत खोडा घालून धारावीकरांच्या भविष्याशी खेळ सुरू आहे. त्यामुळे धारावी पुनर्विकास प्रकल्पाच्या शासकीय सर्वेक्षणात बाधा आणणाऱ्या धारावी बाहेरील लोकांवर कायद्यानुसार कठोर कारवाई करावी, अशी विनंती मी माननीय मुख्यमंत्री श्री एकनाथजी शिंदे यांच्याकडे करणार आहे.

**-राहुल रमेश शेवाळे,**
**शिवसेना उपनेते, माजी खासदार**

## लंडन स्पिरीट संघाने जिंकले विमेन्स हंड्रेडचे विजेतपद

**लंडन :** विमेन्स हंड्रेडला नवा चॅम्पियन मिळाला आहे. लंडन स्पिरीट संघाने प्रथमच स्पर्धेच्या ट्रॉफीवर कब्जा केला आहे. लॉर्ड्सवर खेळल्या गेलेल्या अंतिम सामन्यात लंडन स्पिरीट संघाने वेल्श फायरचा 4 गडी राखून पराभव केला. स्पिरिटच्या या विजेतेपदात भारताची अष्टपैलू खेळाडू दीप्ती शर्माने महत्त्वाची भूमिका बजावली. दीप्तीने प्रथम २३ धावांत एक विकेट घेतली. यानंतर तिने १६ चेंडूत १६ धावांची नाबाद खेळी खेळली. स्पिरिट संघाला शेवटच्या ३ चेंडूत ४ धावांची गरज होती. दीप्तीने हेली मॅथ्यूजच्या चेंडूवर शानदार षटकार ठोकून प्रथमच आपल्या संघाला चॅम्पियन बनवले.लंडन स्पिरिट संघाने प्रथमच विमेन्स द हंड्रेडचे विजेतेपद पटकावले आहे. या स्पर्धेच्या 4 हंगामात संघ प्रथमच अंतिम फेरीत पोहोचला. याआधी दक्षिणेकडील ब्रेव्ह संघाने स्पर्धेच्या पहिल्या दोन मोसमात विजेतेपद पटकावले होते. तर गेल्या मोसमात नॉर्दर्न सुपरचार्जर्स संघाने ट्रॉफी जिंकली होती.




## विनेश फोगटला गावातील सत्कार समारंभादरम्यान आली चक्कर

वृत्तसंस्था
■ हिसार

पॅरिस ऑलिम्पिक २०२४ मधील धक्कादायक अनुभवानंतर भारतीय कुस्तीपटू विनेश फोगट १८ ऑगस्टला मायदेशी परतली. भारतात आल्यावर विनेशचे भव्य स्वागत करण्यात आले. दिल्ली विमानतळापासून ते तिच्या गावी बलाली येथे पोहोचेपर्यंत चाहत्यांनी विनेशला भरभरून प्रेम दिले. गावात पोहोचल्यानंतरही विनेशचा मोठा मान सन्मान करण्यात आला आणि याच दरम्यान तिची प्रकृती खालावली. तिला चक्कर येत असल्याचेही दिसले.

विनेशला चक्कर येत असल्याचा व्हिडिओही समोर आला होता, विनेशला तिच्या हरियाणातील बलाली गावात सन्मानित करण्यात आले होते. विनेशला तिचे समर्थक आणि गावातील खाप पंचायत सदस्यांनी



सुवर्णपदक देऊन गौरविले. या सोहळ्यादरम्यान विनेशने सर्वांशी संवादही साधला पण एकूणच प्रवास आणि रॅलीनंतर ती थकलेली असल्याने तिला चक्कर येत होती. २० तासांच्या प्रवासानंतर विनेश दिल्ली विमानतळावर पोहोचली आणि त्यानंतर दिल्ली ते तिचं गाव बलालीपर्यंत तिची विजयीयात्रा काढण्यात आली होती. या मोठ्या प्रवासानंतर तिच्या सत्कार समारंभात विनेश थकलेली दिसली.

## मोहम्मद शमी रणजी ट्रॉफी खेळू शकतो; ऑक्टोबरमध्ये पुनरागमन करणार

वृत्तसंस्था
■ कोलकाता

भारताचा अनुभवी वेगवान गोलंदाज मोहम्मद शमी ऑक्टोबरमध्ये रणजी ट्रॉफीमध्ये क्रिकेटच्या मैदानात पुनरागमन करू शकतो. तो बंगालकडून रणजी ट्रॉफीचे सुरुवातीचे सामने खेळण्याची शक्यता आहे. नोव्हेंबरमध्ये सुरू होणाऱ्या ऑस्ट्रेलिया दौऱ्यापूर्वी त्याने पूर्णपणे तंदुरुस्त होण्याचे लक्ष्य ठेवले आहे. निवडकर्त्यांनाही त्याच्या पुनरागमनाची घाई नाही.

रणजी ट्रॉफीचा नवा हंगाम ११ ऑक्टोबरपासून सुरू होणार आहे, त्याच दिवशी शमीचा होम टीम बंगालचा पहिला सामना उत्तर प्रदेशशी होणार आहे. सामना संपल्यानंतर अवघ्या ३ दिवसांनी १८ ऑक्टोबरपासून संघाचा सामना

नेटमध्ये गोलंदाजीचा सराव सुरु




बिहारशी होणार आहे. वृत्तानुसार, शमी यूपी किंवा बिहारच्या संघाविरुद्ध खेळू शकतो. दोन्ही सामन्यांमध्ये फक्त ३ दिवसांचे अंतर आहे, कारण ते दोन्ही सामने खेळण्याची शक्यता कमी आहे.

मोहम्मद शमीने १९ नोव्हेंबर २०२३ रोजी ऑस्ट्रेलियाविरुद्ध एकदिवसीय विश्वचषक फायनलमध्ये शेवटचा आंतरराष्ट्रीय सामना खेळला. यानंतर त्याला ब्रेक देण्यात आला, ज्यामध्ये त्याच्यावर शस्त्रक्रिया करण्यात आली. जर त्याने न्यूझीलंडविरुद्ध पुनरागमन केले तर तो सुमारे ११ महिन्यांनंतर आंतरराष्ट्रीय क्रिकेट खेळताना दिसेल.

***न्यूझीलंडविरुद्ध कसोटी खेळू शकतो***

*भारत आणि न्यूझीलंड यांच्यातील ३ कसोटी सामन्यांची मालिकाही १६ ऑक्टोबरपासून सुरू होणार आहे. न्यूझीलंडविरुद्धची पहिली कसोटी १६ ऑक्टोबरपासून बंगळुरूमध्ये, दुसरी कसोटी २४ ऑक्टोबरपासून पुण्यात आणि तिसरी कसोटी १ नोव्हेंबरपासून मुंबईत खेळवली जाईल. जर शमी आपला मॅच फिटनेस सिद्ध करण्यात यशस्वी ठरला तर त्याला न्यूझीलंडविरुद्धच्या मालिकेतील उर्वरित २ कसोटी सामने खेळण्याचीही संधी मिळू शकते.*

५८वी राज्य अजिंक्यपद कॅरम स्पर्धा २०२४

## काजल, अनिल, मीनल, बाबुलाल राज्य कॅरम विजेते




प्रतिनिधी
■ मुंबई

सेंट्रल रेल्वे इन्स्टिटयूट दादर यांच्या सहयोगाने व महाराष्ट्र कॅरम असोसिएशनने आयोजित केलेल्या ५८ व्या सिनियर राज्य अजिंक्यपद कॅरम स्पर्धेत पुण्याच्या अनिल मुंढेने मुंबईच्या योगेश धोंगडेवर अंतिम सामन्यात सरळ दोन सेटमध्ये २५-१७, २४-११ अशी मात करत विजेतेपद पटकाविले. तिसऱ्या क्रमांकासाठी झालेल्या लढतीत मुंबईच्या फहिम काझीने मुंबई उपनगरच्या रिझवान शेखवर २०-१४, १६-१८ व २४-२१ असा निसटता विजय मिळविला. महिला एकेरीच्या अंतिम सामन्यात मुंबईची काजल कुमारी विजेती ठरली. तिने ठाण्याच्या नवोदित मधुरा देवळेवर २५-०, २२-१७ असा एकतर्फी विजय मिळविला. तर महिलांच्या तिसऱ्या क्रमांकासाठी झालेल्या लढतीत ठाण्याच्या समृद्धी घाडीगावकरने सिंधुदुर्गच्या दिक्षा चव्हाणवर २०-२१, २५-६, २५-० असा विजय मिळविला.

पुरुष वयस्कर गटातील अंतिम सामन्यात मुंबईच्या बाबुलाल श्रीमलने विजेतेपद पटकविताना मुंबई उपनगरच्या शब्बीर खानवर ६-२५, २०-५ व २५-१३ असा विजय प्राप्त केला. या गटात तिसऱ्या क्रमांकासाठी झालेल्या लढतीत मुंबईच्या सत्यनारायण दोंतुलने मुंबई उपनगरच्या गिरीधर भोजवर ९-२५, ११-१० व २५-२१ अशी मात केली. महिला वयस्कर गटात अंतिम फेरीत ठाण्याच्या मीनल लेले - खरेने मुंबई उपनगरच्या माधुरी तायशेटेवर २५-०, २०-१६ अशी मात केली. तर तिसरा क्रमांक प्राप्त करताना कोल्हापूरच्या शोभा कामतने मुंबई उपनगरच्या जयमाला परबवर १७-१३, २५-९ असा विजय मिळविला.

महाराष्ट्र कॅरम असोसिएशनचे कार्याध्यक्ष भारत देसडला, मुंबई डिस्ट्रिक्ट कॅरम असोसिएशनचे कार्याध्यक्ष धनंजय पवार तसेच सेंट्रल रेल्वे इन्स्टिटयूट दादरचे उपाध्यक्ष विजय सावंत यांच्या हस्ते विजेत्यांना रोख पारितोषिके व चषक देऊन सन्मानित करण्यात आले. या प्रसंगी महाराष्ट्र कॅरम असोसिएशनचे उपाध्यक्ष यतीन ठाकूर, मानद सचिव अरुण केदार, खजिनदार अजित सावंत, सहसचिव केतन चिखले, योगेश फणसळकर, मुंबई डिस्ट्रिक्ट कॅरम असोसिएशनचे खजिनदार संजय देसाई व सहसचिव संजय बर्वे उपस्थित होते.

## मोबाईलवर व्हिडियो; शिक्षकाविरोधात पालिका आयुक्तांकडे तक्रार

**मुंबई:** घाटकोपर, पंतनगर महानगरपालिका हिंदी माध्यमाच्या शाळेतील एका शिक्षकाविरोधात पालकांनी पालिका आयुक्त, अतिरिक्त पालिका आयुक्त व शिक्षणाधिकारी यांच्या कडे लेखी तक्रार केली आहे. हे शिक्षक वर्गात जास्त वेळ थांबत नाहीत आणि विद्यार्थ्यांना शिकवणे सोडून मोबाईलवर व्हिडियो बनवत असतात त्यामुळे आमच्या मुलांचे नुकसान होत आहे. असे या तक्रारीत म्हटले आहे. या तक्रार पत्रावर १० पालकांनी सह्या केल्या आहेत. त्यांची तक्रार कुणाकडे केली तर ते भांडण करतात. व तुमच्या मुलांना नापास करीन असे सांगतात. या सरांचे नाव विकास घुगे असे आहे.

## राष्ट्रीय पॉवरलिफ्टिंग स्पर्धेसाठी महाराष्ट्राचा संघ जाहीर

प्रतिनिधी
■ मुंबई

येत्या 20 ते 25 ऑगस्ट या कालावधीत वरिष्ठ पॉवरलिफ्टिंग राष्ट्रीय अजिंक्य स्पर्धा -२०२४,कोलकत्ता-पश्चिम बंगाल या ठिकाणीं होणार आहे. या स्पर्धेत सहभागी होणारा महाराष्ट्राचा संघ खालील प्रमाणे

महिला गट - ४७ किलो- काजल भाकरे ठाणे. ,४७ किलो -हर्षदा घोले ,मुंबई उपनगर, )६३ किलो सेजल मकवाना मुंबई उपनगर. ६३ किलो अदिती सांगळे, ठाणे.)६९ किलो अक्षया शेडगे नवी मुंबई. ६९ किलो प्रेरणा साळवी ,ठाणे. )८४ किलो आश्लेषा गुडेकर मुंबई उपनगर. ८४ किलो वरील, मृणाली भोग,पुणे

पुरुष गट- ५९ किलो धर्मेंद्र यादव मुंबई ,५९ किलो नीरजकुमार यादव मुंबई उपनगर ,६६ किलो वेंकटेश कोणार,मुंबई उपनगर ,)६६ किलो साहिल उतेकर मुंबई ,)१०५ किलो ऋतुराज पाटील कोल्हापूर ,)१०५ किलो अश्विन सोळंकी मुंबई ,)१२० किलो जितेंद्र राणे,मुंबई उपनगर ,१२० किलो वरील, अजिंक्य पडवणकर, मुंबई. संघप्रमुख-संजय सरदेसाई ,मुंबई संघ व्यवस्थापक- विजय पाटील पुणे प्रशिक्षक- सूर्यकांत गर्दे व अनंत चाळके, मुंबई

## मध्य रेल्वे महाव्यवस्थापकांनी स्वातंत्र्यदिनी अर्पण केल्या भायखळा येथील रुग्णालयात अत्याधुनिक सुविधा

प्रतिनिधी
■ मुंबई

मध्य रेल्वेने ७८व्या स्वातंत्र्यदिनानिमित्त भायखळा येथील विभागीय रुग्णालयामध्ये अनेक अत्याधुनिक सुविधा अर्पण करून आरोग्य सेवेतील महत्त्वाचा टप्पा गाठला.

राम करन यादव, महाव्यवस्थापक, मध्य रेल्वे यांनी चित्रा यादव, अध्यक्ष, मध्य रेल्वे महिला कल्याण संस्था (सीआरडब्लुडब्लुओ) यांच्यासमवेत नवीन G+6 सुपर स्पेशालिटी इमारतीच्या तळमजल्यावर नव्याने स्थापन केलेला आपत्कालीन विभाग (अपघात) समर्पित केला. हे अत्याधुनिक आणीबाणी युनिट नॅशनल ॲक्रेडिटेशन बोर्ड फॉर रुग्णालय अँड हेल्थकेअर प्रोव्हायडर्स (एनएबीएच) मार्गदर्शक तत्त्वांचे पूर्णपणे पालन करते, ज्यामुळे रुग्णांच्या सेवेच्या सर्वोच्च मानकांची खात्री होते.

सहा हाय-एंड व्हेंटिलेटरने सुसज्ज असलेला एक नव्याने नूतनीकरण केलेला आणि पूर्णपणे वातानुकूलित महिला वैद्यकीय वॉर्ड देखील समर्पित करण्यात आला.

राम करन यादव यांनी भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर स्मृति रुग्णालय, भायखळा येथे विशेषत: रेल्वे कर्मचारी आणि त्यांच्या कुटुंबीयांच्या फायद्यासाठी वैद्यकीय सुविधांमध्ये प्रगती करण्याच्या अनुकरणीय कार्याचे कौतुक केले. व नवीन G+6 इमारतीचे बांधकाम या वर्षाच्या अखेरीस पूर्ण होईल अशी आशा त्यांनी व्यक्त केली

या वेळी डॉ. शोभा जगन्नाथ, प्रधान मुख्य वैद्यकीय संचालक (पीसीएमडी) आणि इतर प्रधान विभाग प्रमुख (पीएचओडी); रजनीश गोयल, विभागीय रेल्वे व्यवस्थापक (डीआरएम) मुंबई विभाग, सीआरडब्लुडब्लुओ सदस्य, डॉ. सुषमा माटे, वैद्यकीय संचालक, क्षेत्रिय रुग्णालय आणि इतर वरिष्ठ अधिकारी उपस्थित होते.

## धारावी रोजगार मेळाव्याला स्थानिकांचा उदंड प्रतिसाद

१८०० उमेदवारांची हजेरी, १५० उमेदवारांना मिळाली थेट नोकरी

प्रतिनिधी
■ मुंबई

धारावीकरांना रोजगाराची संधी उपलब्ध करून देणाऱ्या पहिल्याच 'धारावी रोजगार मेळाव्या'ला धारावीकर तरुण-तरुणींचा उदंड प्रतिसाद लाभला. रविवार, ११ ऑगस्ट रोजी धारावीतील श्रीगणेश विद्यामंदिरात आयोजित करण्यात आलेल्या या मेळाव्यात 57 कंपन्यांनी सहभाग घेतला होता. या मेळाव्याला 1800 उमेदवारांनी हजेरी लावली, तर 150 उमेदवारांना थेट रोजगार मिळाला.

कौशल्य विकास क्षेत्रात काम करणारी सॅपिओ ॲनालिटिक्स आणि धारावी रिडेव्हलपमेंट प्रोजेक्ट प्रायव्हेट लिमिटेड (डी आर पी पी एल) यांच्या वतीने धारावीत आयोजित करण्यात आलेल्या या एकदिवसीय भव्य रोजगार मिळाव्याला सुमारे १८०० इच्छुकांनी भेट दिली. यातील १५० उमेदवारांना मुलाखतीनंतर थेट नियुक्तीपत्र देण्यात आले, तर ३५० उमेदवारांनी निवड प्रक्रियेचा पुढचा टप्पा गाठला आहे. या मे ळाव्यात उमेदवारांना १० ,००० ते ४० ,००० रुपये मासिक पगाराच्या नोकऱ्या देण्यात आल्या.

"या रोजगार मेळाव्यासाठी सुमारे ४००० उमेदवारांनी रजिस्ट्रेशन केले होते. त्यापैकी सुमारे १८०० इ च्छुकांनी प्रत्यक्ष निवड प्रक्रियेत सहभाग नोंदवला. नोंदणी केलेल्या इतर उमेदवारांना देखील लवकरच अपेक्षित नोकरी मिळेल, याबाबत आम्हाला खात्री आहे. धारावीतील तरुणांना आर्थिक स्थैर्य देण्याच्या या उपक्रमात सहभागी झाल्याबद्दल भारती एअरटेल प्रायव्हेट लिमिटेड, टाटा एआयए लाइफ इन्शुरन्स, टीमलीज सर्विसेस, एबिक्सकॅश ग्लोबल सर्विस, सिक्युअरडेब मॅनेजमेंट कन्सल्टंट आणि इतर कंपन्यांचे आम्ही आभारी आहोत." अशी प्रतिक्रिया डीआरपीपीएलच्या प्रवक्त्याने दिली.

"वास्तविक टाटा एआयए, आयसीआयसीआय लोम्बार्ड यांसारख्या मोठ्या कंपन्यांनी पहिल्यांदाच धारा वीतील तरुणांना रोजगार देण्यासाठी पुढाकार घेतला आहे. हा रोजगार मेळावा म्हणजे, कॉर्पोरेट कंप न्यांना लागणारे मनुष्यबळ आणि धारावीतील सुशिक्षित उमेदवार यांना जोडणारा दुवा ठरला" असेही त्यां नी स्पष्ट केले.

"मला रिलायन्स जिओ मध्ये टेली कॉलर म्हणून कायमस्वरूपी नोकरी मिळाली, ही माझ्यासाठी खूप आ नंदाची बाब आहे. या नोकरीने माझ्या व्यावसायिक आयुष्याला सुरुवात होईलच, तसेच माझ्या कुटुंबाला आर्थिक स्थैर्य मिळण्यासाठी देखील ही नोकरी महत्त्वाची ठरेल." अशी प्रतिक्रिया या रो जगार मेळाव्यात नियुक्तीपत्र मिळालेल्या जहाना शेख यांनी दिली.धारावीतील सुशिक्षित आणि कौशल्यपूर्ण तरुणाईला या रोजगार मेळाव्याच्या माध्यमातून एक हक्काचे व्यासपीठ मिळाले. तसेच कॉर्पोरेट कंपन्यांना देखील धारावीतील टॅलेंट ची नव्याने ओळख झाली. त्यामु ळे अशाच रीतीने भविष्यात देखील रोजगार मिळावे आयोजित करण्यात येतील असा विश्वास आयोजकां नी व्यक्त केला.

***डीआरपीपीएल विषयी:***

*धारावी रीडेव्हलपमेंट प्रोजेक्ट प्रायव्हेट लिमिटेड हा उपक्रम महाराष्ट्र राज्य शासन आणि अडाणी समूह यांच्या भागीदारीतून संयुक्त उपक्रम असून त्याला राज्य सरकारच्या विशेष प्रकल्पाचा दर्जा देण्यात आ ला आहे. धारावीकरांचे अद्ययावत घरांचे स्वप्न पूर्ण करतानाच त्यांच्या राहणीमानाचा दर्जा वाढवण्यासा ठी डीआरपीपीएलच्या माध्यमातून प्रयत्न सुरू आहेत. दळणवळणाची अत्याधुनिक साधने, अखंडित वी - पाणीपुरवठा, प्रदूषणमुक्त आणि स्वच्छ परिसर यांसह जागतिक दर्जाच्या पायाभूत सुविधा धारावीक रांना या प्रकल्पातून दिल्या जाणार आहेत.अधिक माहितीसाठी संपर्क:मकरंद गाडगीळ : Makarand. Gadgil1@adani.com | DRPPLराखी कनकनै: rakhi.kankane@adani.com | DRPPL पंकज मुधोळकर pankaj@aakritipromedia.com | Aakriti Promotions and Media Limitedमकरंद गाडगीळ : Makarand. Gadgil1@ adani.com | DRPPL,राखी कनकनै: rakhi.kankane@adani. com,DRPPLपंकज मुधोळकर pankaj@aakritipromedia.com ,Aakriti Promotions and Media Limited*

## चांदिवलीतील घटनेविरोधात भाजपा अनुसूचित जाती मोर्चातर्फे निषेध मोर्चा

पालकमंत्री मंगलप्रभात लोढा यांनी पीडितांच्या कुटुंबाची घेतली भेट

प्रतिनिधी
■ मुंबई

चांदिवलीतील संघर्ष नगर परिसरात 16 वर्षाच्या कट्टरपंथीय युवकाने 3 वर्षाच्या दलित कन्येवर अत्याचार केल्याची घटना घडली आहे. या घटनेची दखल घेत मुंबई उपनगर जिल्ह्याचे पालकमंत्री मंगलप्रभात लोढ़ा यांनी पीडितेच्या कुटुंबाची भेट घेतली व त्यांचे सांत्वन केले. पालक मंत्र्यानी चांदिवली बुद्ध विहारास भेट देऊन घटनेबाबत स्थानिकांच्या भावना समजून घेतल्या आणि स्थानिक प्रतिनिधींशी त्यांच्या समस्यांबाबत चर्चा केली.

पीडितेच्या आईने अत्याचार करणाऱ्या कट्टरपंथीय युवकाला त्याच्या कृत्याची त्वरित शिक्षा



मिळावी अशी मागणी केली आहे. या मागणीला अनुसरून प्रशासनाला त्वरित कायदेशीर कारवाई करण्याचे निर्देश पालकमंत्र्यानी दिले आहेत.

या प्रसंगी माजी नगरसेवक शरद कांबळे, माजी नगरसेवक प्रकाश मोरे यांच्यासह सकल बहुजन समाजातील अनेक मान्यवर कार्यकर्ते, भाजपा अनुसूचित जाती मोर्चा मुंबई प्रदेशचे पदाधिकारी उपस्थित होते. या दरम्यान भाजपा अनुसूचित जाती मोर्चा मुंबई प्रदेशच्या पदाधिकाऱ्यांनी निषेध मोर्चा काढला.

## चेंबूर येथे स्व.अभिनेत्री शांताबाई जोग राज्यस्तरीय एकांकिका स्पर्धा

भाग घेण्यासाठी संस्थांना आवाहन

प्रतिनिधी
■ मुंबई

महाराष्ट्र ऐक्यवर्धक मंडळातर्फे अभिनेत्री शांताबाई जोग राज्यस्तरीय एकांकिका स्पर्धेचे आयोजन करण्यात आले आहे. व्यावसायिक रंगभूमीवर दर्जेदार आणि प्रभावी नाटकाची निर्मिती करणारी सोनल प्रोडक्शनच्या सहकार्याने ही स्पर्धा घेतली जात आहे. यंदा ९ ते १२ सप्टेंबर दरम्यान ही स्पर्धा चेंबूर, टिळकनगर, श्री गणेश नाट्य मंदिर, इमारत क्रमांक ४० च्या समोर, मंडळाच्या हॉलमध्ये रोज सायंकाळी ६ ते रात्री ११ वाजेपर्यंत होणार आहे. रोज ४ याप्रमाणे प्रथम नाव नोंदवणाऱ्या १६ एकांकिकांना यात प्रवेश दिला जाणार आहे. या स्पर्धेचे यंदा ४२ वे वर्ष आहे.

१३ सप्टेंबरला सायंकाळी ७.३० वाजता या स्पर्धेचा बक्षीस समारंभ सोहळा होणार आहे. सर्वोत्कृष्ट एकांकिका, दिग्दर्शक, स्त्री-पुरुष अभिनय यासाठी प्रत्येक गटात प्रथम, व्दितीय, तृतीय रोख रक्कम आणि प्रशस्तीपत्रक दिले जाणार आहे. शिवाय सर्वोत्कृष्ट अभिनय करणाऱ्या कलाकाराला पत्रकार नाट्य समीक्षक दिवंगत अनंत घोगळे यांच्या नावाचे रोख रक्कम दिली जाणार आहे. सर्वोत्कृष्ट एकांकिकेला दिवंगत शांताबाई जोग फिरता चषक देऊन सन्मानित केले जाणार आहे. ज्या संस्थांना या स्पर्धेत भाग घ्यायचा आहे. त्यांना टिळकनगर येथे असलेल्या मंडळाच्या कार्यालयात सायंकाळी ७ ते ९ या दरम्यान संपर्क साधता येईल किंवा स्पर्धा संयोजक स्वप्निल सकपाळ - ९२२१०००३५५, समन्वय - आकाश वरळीकर - ८८२८१०८५८८, विशाल बिलये -९६१९२५१५७५ यांच्याशी संपर्क साधता येईल. प्रवेश मिळवण्याची अंतिम तारीख ३० ऑगस्ट आहे. अधिक माहितीसाठी email : aikyavardhak@gmail.com या ईमेलवर उपलब्ध होईल.

## जखमी गोविंदावर नानावटीत उपचार

प्रतिनिधी
■ मुंबई

सांताक्रूझ पश्चिम गझदरबांध येथे सराव शिबिरा दरम्यान जखमी झालेल्या गोविंदावर नानावटी रुग्णालयात उपचार करण्यात येत आहेत. स्थानिक आमदार अँड. आशिष शेलार यांनी त्याच्या उपचाराची जबाबदारी उचलली आहे.

गजधरबांध येथील अष्टविनायक बाल मित्र मंडळ पथकाचा गोविंदा अमित ठाकूर सरावादरम्यान 17 ऑगस्टला रात्री जखमी झाला. त्यांच्या पायाच्या हाडाला इजा झाली असल्याने तातडीने त्याला नानावटी रुग्णालयात दाखल करुन आवश्यक



ती सर्व मदत आमदार अँड आशिष शेलार यांनी उपलब्ध करून दिली आहे.काल त्याच्या पायावर शस्त्रक्रिया करण्यात आली.

दरम्यान, काल दुपारी रुग्णालयात जाऊन आमदार आशिष शेलार यांनी त्याची भेट घेऊन विचारपूस केली. नातेवाईकांना आणि उपचार करणाऱ्या डॉक्टरांशी संवाद साधून माहिती घेतली.

## राज्य उत्पादन शुल्क विभागाच्या निरीक्षकांच्या वैद्यकीय व विनंती बदल्या रखडल्या, निरीक्षकांमध्ये आक्रोश

मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्याकडे बदल्यांचे आदेश देण्याची मागणी

■ मुंबई

राज्य उत्पादन शुल्क विभागातील ब संवर्गात निरीक्षक पदावर कार्यरत असलेल्या निरीक्षकांच्या विनंती व वैद्यकीय बदल्या प्रलंबित असल्याने निरीक्षकांमधून नाराजी निर्माण झाली असून या बदल्यांबाबत मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी लक्ष घालून त्वरित बदल्यांचे आदेश द्यावेत अशी मागणी निरीक्षकांमधून होत आहे. वैद्यकीय व विनंती बदल्या न झाल्याने त्याचा परिणाम त्यांच्या कुटुंबांवर देखील पडत आहे. या प्रश्नाकडे मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांचे लक्ष वेधण्यात आले आहे. राज्य उत्पादन शुल्क विभागातील ब संवर्गात निरीक्षक पद महत्त्वाचे मानले जाते.

मुंबईत रहिवाशी असलेले निरीक्षक पदोन्नतीने राज्याच्या विविध जिल्ह्यात महसुली संवर्गात पाठविले जातात. त्या ठिकाणी त्यांना एक वर्षाहून अधिक सेवाकाळ झाल्यास त्यांनी विनंती किंवा वैद्यकीय कारणास्तव बदली मागितल्यास प्रत्येक वर्षी त्यांची बदली केली जाते. त्याबाबतचा १४ जुलै २०२१ चा शासन निर्णय देखील आहे. या निर्णयामुळे राज्य उत्पादन शुल्क विभागातील मुंबई वास्तव करणाऱ्या निरीक्षकांना व त्यांच्या कुटुंबाला मोठा दिलासा मिळाला होता.

वैद्यकीय बदलीसाठी जे अधिकारी स्वतः अपंग आहेत, ज्या अधिकाऱ्याचा जोडीदार किंवा ज्यांची मुले मतिमंद आहेत किंवा ज्या अधिकाऱ्याने मतिमंद असलेल्या स्वतःच्या भावाचे किंवा बहिणीचे पालकत्व स्वीकारले आहे, कायदेशीर कागदपत्राद्वारे एकल पालकत्व सिद्ध असलेले अधिकारी अश्या सहा बाबींचा समावेश आहे. ज्या अधिकाऱ्यांची मुंबईबाहेर पदोन्नती नंतर एक वर्ष सेवाकाळ झाला असेल त्यांची वैद्यकीय कारणास्तव व विनंती बदली पुन्हा मुंबईत केली जाते. या वर्षी अनेक निरीक्षकांच्या वैद्यकीय व विनंती बदल्या प्रलंबित आहेत. यातील आलेले बदलीचे अर्ज सर्वच गरजवंतांचे आहेत. त्यांच्या बदल्यांकडे त्याचे कुटुंबीय टक लावून आहेत. मात्र या विभागाच्या सचिवांनी याकडे पूर्ण दुर्लक्ष केले आहे.

शासनाचा निर्णय असताना देखील अशा बदल्या रोखून ठेवणे यामागील कारण अद्याप समजू शकले नसले तरी एकप्रकारे गरजवंत असलेल्या या निरीक्षकांसह त्यांच्या कुटुंबियांवर एकप्रकारे अन्याय आहे. मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी याबाबत लक्ष घालून त्वरित बदल्यांचे आदेश द्यावेत अशी मागणी करण्यात आली आहे.

## चेंबूर मध्ये व्यसनमुक्तीसाठी महिलांचे अनोखे रक्षाबंधन



प्रतिनिधी
■ मुंबई

रक्षाबंधन निमित्ताने काल चेंबूर खारदेवनगर मध्ये सामाजिक कार्यकर्ते राजेंद्र नगराळे यांच्या संकल्पनेतून महिलांनी व्यसनाधीन झालेल्या बांधवाना राखी बांधून ओवाळणी म्हणून दारू अथवा जे असेल ते व्यसन सोडावे अशी विनंती केली. सामाजिक कार्यकर्ता नंदा पाटीदार, मीनाक्षी देशमुख, रंजना रासकर, अंजली केंजळे, सुषमा यादव या भगिनींनी व्यसनाधीन भावांना राखी बांधली.

निमकर सोसायटी व कोळेकर हॉस्पिटल समोर रिक्षा मध्ये अथवा उघड्यावर भर रस्त्यात दारू पीत असतात त्यामुळे विद्यार्थी तसेच अवतीभवती येजा करणाऱ्या मुला मुलींवर यांचा वाईट परिणाम होतो. तसेच व्यसनाधीन असलेले रस्त्यावरच भांडण करत राहतात त्यामुळे परिसरातील इतर लोकांनाही त्याचा मोठ्या प्रमाणात त्रास होतो. म्हणूनच स्थानिक लोकांच्या मागणीनुसार गोवंडी पोलीस ठाण्याच्या मदतीने सामाजिक कार्यकर्ते राजेंद्र नगराळे हे तेथील स्थानिकांना सोबत घेऊन जन आंदोलन उभारणार आहेत.

## युक्रेनने 3 दिवसांत रशियाचा दुसरा पूल उडवला, लष्कराची पुरवठा लाइन कट

**मॉस्को :** युक्रेनने कुर्स्कमधील आणखी एक महत्त्वाचा पूल हल्ला करून उद्ध्वस्त केला आहे. युक्रेनच्या हवाई दलाचे कमांडर मायकोला ओलेशचुक यांनीही यासंबंधीचा एक व्हिडिओ सोशल मीडियावर जारी केला आहे. ते म्हणाले की, या पुलाचे धोरणात्मक महत्त्व आहे. तो खंडित झाल्यानंतर, रशियाच्या पुरवठा लाइनवर मोठ्या प्रमाणात परिणाम होईल. युक्रेनने उद्ध्वस्त केलेला हा रशियातील दुसरा पूल आहे. दोन दिवसांपूर्वी युक्रेनच्या लष्कराने कुर्स्कमधील ग्लुश्कोवो येथील आणखी एक पूल पाडला होता. रॉयटर्सच्या माहितीनुसार हा पूल सीम नदीवर बांधण्यात आला आहे. हे युक्रेनियन सीमेपासून 15 किमी दूर आहे. रविवारी पुलावर झालेला हल्ला नेमका कुठे झाला याबाबत अद्याप अधिकृत माहिती मिळालेली नाही. तथापि, रशियन टेलिग्राम चॅनेलने दावा केला आहे की ज्वानोये गावात सीम नदीवरील दुसऱ्या पुलावर हल्ला झाला. रशियाच्या मॅश न्यूजनुसार, कुर्स्कमध्ये 3 पूल होते. आता एकच पूल शाबूत राहिला आहे.



# कोलकाता रेप-मर्डर केस, पीडितेच्या डायरीची अनेक पाने गायब

## दिल्लीत रस्त्यावर रुग्णांवर डॉक्टर करणार उपचार; आज संपाचा 8 वा दिवस

**वृत्तसंस्था**
**कोलकाता**

कोलकाता येथील आरजी कार मेडिकल कॉलेज आणि हॉस्पिटलमध्ये 9 ऑगस्ट रोजी प्रशिक्षणार्थी डॉक्टरच्या बलात्कार-हत्या प्रकरणात नवीन तथ्ये समोर आली आहेत. त्यामुळे मृत्यूचे गूढ अधिकच गडद होत आहे.

रविवारी (18 ऑगस्ट) प्रशिक्षणार्थी डॉक्टरच्या काही सहकाऱ्यांशी आणि तिच्या आईशीही चर्चा केली. त्यांनी सांगितले की त्यांची मुलगी रोज डायरी लिहायची. मात्र, डायरीची अनेक पाने गायब (फाटलेली) असल्याचे आता समोर आले आहे.



असे मानले जाते की या पानांमध्ये पीडितेच्या मृत्यूशी संबंधित काही रहस्य लपलेले होते. असा प्रश्न उपस्थित होत आहे की, पीडितेने डायरीच्या फाटलेल्या पानांमध्ये काय लिहिले होते? पुरावे नष्ट करण्यासाठी ही पाने फाडली असावीत असा आईचा दावा आहे. पोलिसांनी डॉक्टरचा लॅपटॉप आणि ती डायरी इतर पुराव्यांसह सीबीआयकडे सोपवली आहे. मात्र, त्या डायरीतून या घटनेचा कोणताही सुगावा एसआयटीला मिळाला नसल्याचे पोलीस सूत्रांनी सांगितले.

मात्र, सीबीआयने पीडितेची डायरी हा तपासाचा महत्त्वाचा पैलू बनवला आहे. कोलकाता घटनेच्या निषेधार्थ दिल्लीतील डॉक्टरांच्या संपाचा सोमवारी (19 ऑगस्ट) 8 वा दिवस आहे. एम्स आणि इतर रुग्णालयांचे निवासी डॉक्टर आजपासून आरोग्य मंत्रालयाबाहेरील रस्त्यावर रुग्णांवर उपचार करतील.

निवासी डॉक्टर्स असोसिएशनने रविवारी (18 ऑगस्ट) रात्री प्रसिद्धीपत्रकाद्वारे ही माहिती दिली. प्रेस रिलीझनुसार, निवासी डॉक्टर निर्माण भवनाबाहेरील रुग्णांना औषध, शस्त्रक्रिया, प्रसूती आणि स्त्रीरोग, बालरोग, डोळ्यांच्या समस्या, ऑर्थोपेडिक्स यासह सुमारे 36 वैशिष्ट्यांच्या ओपीडी सेवा प्रदान करतील. सर्व रुग्णालयांमध्ये पूर्वीप्रमाणेच आपत्कालीन सेवा सुरू राहतील. केंद्रीय सुरक्षा कायद्याद्वारे रुग्णालयांमध्ये पुरेशी सुरक्षेची हमी मिळेपर्यंत आपला संप सुरूच राहणार असल्याचे डॉक्टरांनी सांगितले आहे.

दुसरीकडे, कोलकाता बलात्कार-हत्या पीडितेच्या वडिलांनी आपल्या मुलीच्या मृत्यूबाबत अनेक नवे खुलासे केले आहेत. रविवारी (१८ ऑगस्ट) वृत्तसंस्था एएनआयला दिलेल्या मुलाखतीत त्यांनी सांगितले की, पोलिसांनी घाईघाईने त्यांच्या मुलीचे अंतिम संस्कार केले. वडिलांच्या म्हणण्यानुसार, प्रशिक्षणार्थी डॉक्टरच्या मृतदेहाव्यतिरिक्त स्मशानभूमीत तीन मृतदेह होते. मात्र, आधी पीडितेच्या मृतदेहावर अंत्यसंस्कार करण्यात आले. हॉस्पिटलमध्येही आपल्या मुलीचा मृतदेह सेमिनार रूममध्ये सापडलेल्या स्थितीत नसल्याचा दावा त्यांनी केला. हत्येनंतर मृतदेह सेमिनार रूममध्ये अन्यत्र ठेवण्याच्या शक्यतेबाबत त्यांनी आपल्या मुद्याचा पुनरुच्चार केला. पीडितेच्या वडिलांनी सांगितले की, 'आम्हाला सांगण्यात आले की, आमच्या मुलीचा मृतदेह ज्या स्थितीत सेमिनार हॉलमध्ये होता, त्याच स्थितीत सापडला नाही. तिच्या शरीराच्या काही भागांवर कपडे नव्हते. त्यानंतर सेमिनार हॉलमध्ये मृतदेह ठेवण्यात आला.

## भूस्खलनग्रस्तांचे कर्ज माफ केले पाहिजे

# लोक कर्ज भरण्याच्या स्थितीत नाहीत





**वृत्तसंस्था**
**तिरुवनंतपुरम**

केरळ सरकारने सोमवारी (19 ऑगस्ट) वायनाडमधील भूस्खलनात बळी पडलेल्या आणि वाचलेल्यांना मदत करण्यासाठी बँकांना कर्जमाफी देण्याचे आवाहन केले. वास्तविक, मुख्यमंत्री पिनाराई विजयन राज्यस्तरीय बँकर्स समितीच्या (SLBC) बैठकीला संबोधित करण्यासाठी आले होते.

स्थानिक लोकांनी केरळ ग्रामीण बँकेला विरोध केल्यानंतर विजयन यांची ही प्रतिक्रिया आली आहे. अशा परिस्थितीत, कार्यक्रमादरम्यान, मुख्यमंत्र्यांनी भूस्खलन पीडितांच्या खात्यातून मासिक कर्जाचा हप्ता (म्हणजे EMI) कापल्याबद्दल नाराजी व्यक्त केली. सीएम म्हणाले की, ईएमआय वाढवून भूस्खलनग्रस्तांचा प्रश्न सुटू शकत नाही. बँकांना विनंती आहे की ही सर्व कर्जे पूर्णपणे माफ करावीत. त्यामुळे बँकेवर फारसा बोजा पडणार नाही.

कार्यक्रमाला संबोधित करताना मुख्यमंत्री पिनाराई विजयन यांनी भूस्खलनानंतर बाधित झालेल्या लोकांना भेडसावणाऱ्या समस्यांचा उल्लेख केला. ते म्हणाले की वायनाड भूस्खलनात वाचलेले लोक मोठ्या संख्येने शेतीत गुंतले होते, परंतु या आपत्तीने तेथील शेतजमिनीचे नुकसान झाले आहे. अशा स्थितीत आता भूस्खलन क्षेत्रात कोणतीही शेती किंवा वस्ती शक्य नाही. मुख्यमंत्री असेही म्हणाले, 'या भागातील बहुतांश शेतकऱ्यांनी कर्ज घेतले आहे. ज्यांनी घरे बांधण्यासाठी कर्ज घेतले होते त्यांची घरे गेली आहेत. आता भूस्खलनग्रस्त हप्ते भरण्याच्या स्थितीत नाहीत. अशा परिस्थितीत पीडितांच्या खात्यातून ईएमआय कापून घेऊ नये, अशी विनंती बँकांना करण्यात आली आहे.

पान ९ वरुन

### महायुतीला तडे

चव्हाणांवर टीका केली. रवींद्र चव्हाण हे कुचकामी मंत्री, त्यांचा राजीनामा घ्यावा अशी मागणी कदमांनी केली. त्यावर रवींद्र चव्हाणांनीही पलटवार करत रामदास कदम अडाणी माणूस, तोंड सांभाळून बोलावे अन्यथा तोंड फोडल्याशिवाय राहणार नाही असे प्रत्युत्तर दिले. माझे तोंड फोडायला तुला 100 जन्म घ्यावे लागतील, असे कदमांनी त्यांना सुनावले. यावर रामदास कदमांनी बालिश विधाने करू नये, असे भाजपने म्हटले आहे.तसेच आमची स्वतंत्र्य लढण्याची तयारी आहे, अशी समज देण्यात आली. रायगड येथील शिंदे गटाचे आमदार महेंद्र थोरवे यांनी अजित पवार गटाचे खासदार सुनील तटकरे विश्वासघातकी असल्याचं म्हटलं आहे. अजित पवार गट विश्वासघात करणारा आहे, हे मी आज जाहीरपणाने सांगतो. प्रत्येक ठिकाणी विश्वासघात करणं, हेच त्यांचं काम आहे. त्यांच्या गटाचे नेतृत्वच विश्वासघातकी असल्याचे महेंद्र थोरवे म्हणाले. महेंद्र थोरवे हे अदखलपात्र आहेत, त्यांना आमचे स्थानिक नेते उत्तर देतील असे प्रत्युत्तर तटकरेंनी दिले. आठवड्याभरात घडलेल्या अनेक घटनांवरून महायुतीत आलबेल नसल्याचे दिसत आहे. श्रेयवादावरून भाजप, अजित पवार गट, शिंदे गट यांच्यात जुंपली आहे. त्यातच अनेक नेते आता स्वबळाची भाषा करत आहेत. त्यामुळे महायुतीतील अंतर्गत वाद आणि संघर्ष चव्हाट्यावर येत असून विधानसभा निवडणुकीपुर्वी महायुती तुटण्याची शक्यता राजकीय वर्तुळात वर्तवण्यात येत आहे.

### काँग्रेसी आमदार झिशान यांना गुलाबी भुरळ

आम्हाला काही गोष्टी यापुर्वीच माहीत होत्या. मात्र लोकसभा निवडणुकीत कोणी सोडून गेलं तर त्याचा फायदाच होतो असा आमचा अनुभव आहे. नांदेडचे बडे नेते गेले मात्र सर्वसामान्य जनता आमच्या पाठीशी आहे हे दिसून आलं. काँग्रेस हा एक विचार म्हणून असलेला पक्ष त्यामुळे कोण गेलं याचा विचार आम्ही करत नाही. कोणी सोडून गेलं तर आम्ही त्या ठिकाणी जोमाने उभे राहतो, अशी प्रतिक्रिया बाळासाहेब थोरात यांनी दिली आहे. झिशान यांना अजितदादांचा बदललेला लूक आणि गुलाबी रंगाची भुरळ पडल्याची चर्चा रंगली. आता झिशान यांनी उघडपणे जनसन्मान यात्रेचं जोरदार स्वागत केल्यानं ते लवकरच अजित पवारांच्या राष्ट्रवादी पक्षात जाणार असल्याच्या चर्चांना उधाण आलं आहे.

# बिहारच्या कडक उन्हात 935 सैनिकांचे आंदोलन

## नाश्त्यानंतर 265 ट्रेनी कॉन्स्टेबलची प्रकृती खालावली

**वृत्तसंस्था**
**सुपौल**

बिहार विशेष सशस्त्र पोलिसच्या 935 प्रशिक्षणार्थी कॉन्स्टेबलनी सोमवारी 6 तास कडक उन्हात आंदोलन केले. त्यांना विषारी जेवण दिले जात असल्याचा आरोप प्रशिक्षणार्थी हवालदारांनी केला आहे. अन्नाचा दर्जाही खराब आहे. रविवारी नाश्त्यात पुरी, जिलेबी आणि चिकूची करी खाल्ल्यानंतर 265 ट्रेनी कॉन्स्टेबलची प्रकृती खालावली होती.

यानंतर प्रशिक्षणार्थी हवालदारांना तातडीने वीरपूर उपविभागीय रुग्णालयात दाखल करण्यात आले. उपचारानंतर रात्री 1 वाजता सर्वांना घरी सोडण्यात आले. सल्फास (गव्हाचे कीटकांपासून संरक्षण करणारे विषारी औषध)

### सल्फास मिसळल्याचा आरोप



अन्नात मिसळले होते, त्यामुळे त्यांची प्रकृती खालावली, असा आरोप आहे. स्वयंपाकघरात सल्फासचे पाकीटही सापडले. तथापि, अन्नामध्ये सल्फास जोडण्याबाबत अद्याप पुष्टी झालेली नाही.

सकाळी 8 वाजल्यापासूनच सैनिक संपावर बसले होते. डीआयजी सफीकुल हक दुपारी 2 वाजता घटनास्थळी पोहोचले. जेवणाची व्यवस्था केली जाईल, असे आश्वासन दिले, त्यानंतर सर्वजण आपापल्या बॅरेकमध्ये परतले.

अन्नातून विषबाधा झाल्याचे प्रकरण खरे असल्याचे डीआयजींनी सांगितले. चौकशीनंतर कारवाई केली जाईल. जवानांच्या जेवणाच्या ताटात पाकिट सापडले आहे. ते नेमके काय आहे याचाही शोध घेतला जात आहे. याबाबत स्थानिक पोलिस ठाण्यात एफआयआर दाखल करण्यात येणार आहे. आंदोलन करणारे सर्व प्रशिक्षणार्थी सैनिक आहेत. प्रशिक्षण पूर्ण होताच विभागीय परीक्षेनंतर त्यांच्यामधून एसआय बनवले जातील.

प्रशिक्षणार्थी हवालदारांचे म्हणणे आहे की, 'पीटीएससी प्रशिक्षणासाठी बिहारच्या विविध जिल्ह्यांतील ते दीड महिन्यांपासून येथे वास्तव्यास आहेत. आपल्याला दररोज खराब अन्न मिळते. अधिकाऱ्यांकडे तक्रार करूनही कारवाई होत नाही.

## शेख हसीना यांच्या अडचणीत वाढ

# एकापाठोपाठ आणखी तीन गुन्हे दाखल

**वृत्तसंस्था**
**नवी दिल्ली**

बांगलादेशमध्ये काही दिवसांपूर्वी उसळलेल्या हिंसाचारानंतर शेख हसीना यांनी पंतप्रधानपदाचा राजीनामा देत देश सोडला. शेख हसीना यांनी सध्या भारतात आश्रय घेतलेला आहे. बांगलादेशमधील राजकीय उलथापालथीनंतर नोबेल पारितोषिक विजेते मुहम्मद युनूस यांच्या नेतृत्वाखाली अंतरिम सरकार स्थापन झालं आहे. दरम्यान, आता शेख हसीना यांच्या अडचणीत वाढ झाली असून त्यांच्याविरोधात रविवारी एकापाठोपाठ आणखी तीन गुन्हे दाखल करण्यात आले आहेत.



दरम्यान, २०१५ मध्ये बांगलादेश नॅशनलिस्ट पार्टी (BNP) च्या प्रमुख खालिदा झिया यांच्यावर हल्ला केल्याप्रकरणी आणि २०१३ मध्ये ढाका येथे एका रॅलीवरील गोळीबार प्रकरणामध्ये माजी पंतप्रधान शेख हसीना यांचा सहभाग असल्याचा आरोप करत बीएनपी नेते बेलाल हुसैन यांनी गुन्हा दाखल केला आहे. यामुळे आता शेख हसीना यांच्यावर दाखल करण्यात आलेल्या गुन्ह्यांची संख्या वाढली असून त्यांच्या अडचणी वाढण्याची शक्यता आहे.

बांगलादेशमध्ये नुकत्याच झालेल्या आरक्षणविरोधी आंदोलनाच्यावेळी दोन वेगवेगळ्या महाविद्यालयातील दोन विद्यार्थ्यांचा मृत्यू झाला. या प्रकरणामध्ये शेख हसीना यांच्यावरही गुन्हा दाखल करण्यात आला आहे. ढाका येथे झालेल्या हिंसाचारात दोन विद्यार्थ्यांच्या हत्येप्रकरणी शेख हसीना यांच्यासह अन्य १२ जणांवर गुन्हा दाखल करण्यात आला आहे. वृत्तानुसार, १९ जुलै रोजी शेकडो विद्यार्थी निदर्शने करत होते. त्यामध्ये मृत्यू झालेल्या दोन विद्यार्थ्यांचाही सहभाग होता. मात्र, विद्यार्थी निदर्शन करत असताना पोलीस आणि अवामी लीग समर्थकांनी दोन्ही विद्यार्थ्यांना गोळ्या घातल्या. या प्रकरणात न्यायालयात खटला दाखल करण्यात आला आहे.

बांगलादेश नॅशनलिस्ट पार्टी (बीएनपी) नेते बलाल हुसैन यांनी शेख हसीना यांच्यावर २०१५ मध्ये बीएनपी प्रमुख खालिदा झिया यांच्या ताफ्यावर झालेल्या हल्ल्यात शेख हसीना आणि अन्य ११३ जणांचा सहभाग असल्याचा आरोप करत गुन्हा दाखल केला आहे.

# आसाममध्ये मुख्याध्यापकाने विद्यार्थिनीला पॉर्न दाखवले

## POCSO अंतर्गत गुन्हा; लोकांनी शाळा पेटवली

**वृत्तसंस्था**
**गुवाहाटी**

आसाममधील करीमगंज जिल्ह्यातील एका सरकारी शाळेच्या मुख्याध्यापकावर POCSC कायद्याअंतर्गत गुन्हा दाखल करण्यात आला आहे. मुख्याध्यापकाने अल्पवयीन विद्यार्थिनीला पॉर्न पाहण्यास भाग पाडल्याचा आरोप आहे.

करीमगंजचे एसपी पार्थ प्रतिमा दास यांनी रविवारी (१८ ऑगस्ट) सांगितले की, ही घटना १२ ऑगस्ट रोजी घडली. याबाबत पीडित विद्यार्थिनीने कुटुंबीयांना माहिती दिली होती. ही बाब मुख्याध्यापकांना समजताच त्यांनी आपापल्या स्तरावर प्रकरण सोडविण्याचा प्रयत्न केला.

एसपी म्हणाले की संतप्त कुटुंबातील सदस्याने मुख्याध्यापकावर हल्ला करण्याचा देखील प्रयत्न केला होता, परंतु तो घटनास्थळावरून फरार झाला होता. यानंतर लोकांनी शाळेची तोडफोड करून आग लावली.

कुटुंबीयांनी पोलिसांना सांगितले की, मुख्याध्यापक अनेक दिवसांपासून विद्यार्थिनीला पॉर्न दाखवत होते. घरी आल्यानंतर तिने आईला हा प्रकार सांगितला. तिने असेही सांगितले की मुख्याध्यापक तिला पॉर्न पाहण्यास भाग पाडत असे आणि अयोग्यरित्या स्पर्शही करत असे. स्थानिक लोकांचे म्हणणे आहे की आम्ही आमच्या मुलांना शाळेत पाठवतो जेणेकरून ते शिक्षण घेऊन चांगले माणूस बनतील, पण अशा शिक्षकाकडून ते काय शिकणार? डेहराडूनमध्ये 13 ऑगस्टच्या रात्री ISBT बसस्थानकावर एका अल्पवयीन मुलीवर (16) 5 जणांनी बसमध्ये सामूहिक बलात्कार केला होता. पोलिसांनी घटनेच्या चौथ्या दिवशी एफआयआर नोंदवला. पोलिसांनी अटक केलेल्यांमध्ये तीन बस चालक, एक कंडक्टर आणि एका कॅशियरचा समावेश आहे.

## बंगळुरूमध्ये पार्टीतून परतणाऱ्या मुलीवर बलात्कार

**बंगळुरू**

कर्नाटकातील बंगळुरूमध्ये महाविद्यालयीन विद्यार्थिनीवर बलात्कार झाल्याची घटना समोर आली आहे. पार्टी आटोपून मुलगी घरी परतत होती. त्यासाठी तिने एका दुचाकीस्वाराकडून लिफ्ट घेतली. पोलिसांनी रविवारी (18 ऑगस्ट) या घटनेची माहिती दिली. बंगळुरूचे अतिरिक्त पोलिस आयुक्त रमण गुप्ता यांनी सांगितले की, रविवारी सकाळी ही घटना घडली. पीडित तरुणी शनिवारी रात्री कोरमंगला परिसरात पार्टीसाठी गेली होती. सकाळी त्यांनी हेब्बागोडी भागातील आपल्या घरी परतण्यासाठी दुचाकीस्वाराकडून लिफ्ट घेतली होती. एसीपी पुढे म्हणाले की, मुलीचा आरोप आहे की दुचाकीस्वाराने तिच्यावर हल्ला केला आणि बलात्कार केला. यानंतर तो घटनास्थळावरून पळून गेला. पीडितेच्या तक्रारीवरून एफआयआर नोंदवण्यात आल्याचे त्यांनी सांगितले. पोलिसांनीही घटनास्थळी भेट देऊन पाहणी केली आहे.

## मुरादाबादमध्ये डॉक्टरने नर्सवर केला बलात्कार, तिघांना अटक; हॉस्पिटल सील

**वृत्तसंस्था**
**नवी दिल्ली**

मुरादाबादमधील एका खासगी रुग्णालयात एका नर्सवर जबरदस्ती करण्यात आली. रात्री 12 वाजता हॉस्पिटलच्या ऑपरेशन डॉक्टरांनी नर्सला बोलावले. वॉर्ड बॉय आणि नर्सने तिला जबरदस्तीने खोलीत ओढले आणि बाहेरून कुलूप लावले. डॉक्टरने 20 वर्षीय नर्सला खोलीत बंद करून ठेवले आणि तिच्यावर बलात्कार केला.

माहिती मिळताच पोलिस घटनास्थळी दाखल झाले. डॉक्टर, वॉर्ड बॉय आणि नर्सला अटक करण्यात आली आहे. ठाकूरद्वाराचे एसडीएम मणि अरोरा आरोग्य विभागाच्या टीमसोबत रुग्णालयात पोहोचले. एबीएम रुग्णालय सील करण्यात आले आहे.

ठाकूरद्वारा पोलिस स्टेशन हद्दीतील ठाकूरद्वारा-काशीपूर रोडवर असलेल्या एबीएम हॉस्पिटलमध्ये ही घटना घडली. त्याचे संचालक डॉ. शाहनवाज हे बीएयूएमएस पदवीधारक आहेत. त्यांची पत्नीही बीएयूएस आहे. दोघे मिळून हे हॉस्पिटल चालवतात. डॉ. शहनवाज यांचे निवासस्थान रुग्णालयाच्या वर आहे.

पीडित महिला दिलीरी पोलिस ठाण्याच्या हद्दीतील गावातील रहिवासी आहे. वडिलांनी पोलिसांना सांगितले की, त्यांची मुलगी गेल्या 10 महिन्यांपासून एबीएम रुग्णालयात परिचारिका म्हणून काम करत होती. शनिवारी सायंकाळी सात वाजण्याच्या सुमारास त्या ड्युटीसाठी रुग्णालयात गेल्या होत्या.

# एनडीए सरकार मुस्लिमविरोधी नाही !

## केंद्रीय राज्यमंत्री रामदास आठवले यांचे प्रतिपादन

**वृत्तसंस्था**
**हैदराबाद**

प्रधानमंत्री नरेंद्र मोदींच्या नेतृत्वातील एनडीए सरकार सर्व समाजाचा विकास करीत आहे सबका साथ सबका विकास आणि सबका विश्वास जिंकणारे केंद्र सरकार आहे. एनडीए सरकार हे मुस्लिम समाजाविरुद्ध नाही. मुस्लिम समाजातील 80 टक्के लोक ओबीसी आरक्षणाचा लाभ घेत आहेत तसेच एनडीए सरकारने आर्थिकदृष्ट्या मागासवर्गीयांना 10 टक्के इ डब्ल्यू एस आरक्षणाचा कायदा केला आहे.त्याचा फायदा मुस्लिम ख्रिश्चन जैन बौद्ध आणि सवर्ण समाजातील उच्चवर्णीय जातींतील गरीब घेत आहेत असे प्रतिपादन रिपब्लिकन पक्षाचे राष्ट्रीय अध्यक्ष केंद्रीय सामाजिक न्याय राज्यमंत्री नामदार रामदास आठवले यांनी केले.

हैदराबाद मधील विश्वेश्वरय्या भवन येथे रिपब्लिकन पक्षाच्या



तेलंगणा शाखेतर्फे केंद्रीय राज्यमंत्रीपदी तिसऱ्यांदा निवड झाल्याबद्दल नामदार रामदास आठवले यांचा भव्य सत्कार करण्यात आला यावेळी सत्काराला उत्तर देताना ना.रामदास आठवले बोलत होते.

वक्फ बोर्ड ठराविक लोकांची मक्तेदारी नको म्हणून वक्फ बोर्ड सुधारणा नियम केंद्र सरकार लागू करणार आहे.सर्व मुस्लिम समाजाला वक्फ बोर्ड चा फायदा झाला पाहिजे. केवळ काही लोकांची वक्फ बोर्ड प्रॉपर्टी होऊ नये हा सरकार चा उद्देश आहे.एनडीए सरकार मुस्लिमविरोधी नाही.मोदी जी सर्व देशवासियांना आपले कुटुंब मानत आहेत असे ना.रामदास आठवले म्हणाले.

रिपब्लिकन पक्ष केवळ एका जातीचा पक्ष नसून सर्व जाती धर्मीयांचा सर्वसमावेशक रिपब्लिकन पक्ष आहे. समाजातील गरीब गरजू लोकांना रिपब्लिकन कार्यकर्त्यांनी मदत केली पाहिजे.रुग्णांना ; ज्येष्ठ नागरिक; दिव्यांग आणि विधवा महिला यांना शासनाच्या विविध योजनांचा लाभ मिळवून दिला पाहिजे.लोकांच्या प्रश्नांवर लढले पाहिजे.अन्याय अत्याचार होईल तिथे धावून जाऊन अन्यायाचा प्रतिकार करण्यासाठी रिपब्लिकन कार्यकर्त्यांनी अग्रेसर राहिले पाहिजे असे आवाहन ना.रामदास आठवले यांनी यावेळी केले.

यावेळी ख्रिश्चन समाजाचे नेते जॉन मस्कू यांनी आपल्या अनेक सहकाऱ्यांसह रिपब्लिकन पक्षात जाहीर प्रवेश केला. यावेळी रिपब्लिकन पक्षाचे ज्येष्ठ नेते परम शिवा नागेश्वर राव गौड, ब्रह्मानंद रेड्डी, रिपाइं तेलंगणाचे प्रदेश अध्यक्ष रवी कुमार पासुला, गोरख सिंग,रत्न प्रसाद, बेगला नागेश्वर राव. रोझा राणी, स्नेह लता, पुष्पलता आदी अनेक मान्यवर उपस्थितीत होते.

# चीन-फिलिपाइन्सची जहाजे दक्षिण चीन समुद्रात पुन्हा भिडली

## 2 महिन्यांत दुसऱ्यांदा संघर्ष



**वृत्तसंस्था**
**मनिला**

चीन समुद्रात चीन आणि फिलिपाइन्सच्या जहाजांमध्ये पुन्हा एकदा टक्कर झाली आहे. वृत्तसंस्था रॉयटर्सने दिलेल्या माहितीनुसार, सोमवारी पहाटे 3.24 वाजता वादग्रस्त सेकंड थॉमस शोलजवळ ही घटना घडली. चीनच्या तटरक्षक दलाने यासंबंधीचा एक व्हिडिओ सोशल मीडियावर शेअर केला आहे. ते म्हणाले की फिलिपाइन्सचे जहाज 4410 ला चिनी तटरक्षक जहाज 21551 ने अनेक वेळा इशारा दिला होता, परंतु त्यांनी त्याकडे दुर्लक्ष केले आणि धडक झाली. चीनच्या तटरक्षक दलाचे प्रवक्ते गेंग यू यांनी सांगितले की, फिलिपाइन्स जहाजाने अत्यंत बेजबाबदारपणे आणि धोकादायक वर्तन केले. ते म्हणाले की फिलिपाइन्सच्या जहाजाने जियाबिन रीफ (सबिना शोल) जवळील चिनी प्रादेशिक पाण्यात बेकायदेशीरपणे प्रवेश केला होता.

गेंग यू म्हणाले की, फिलिपाइन्सच्या जहाजाने प्रणालीचे उल्लंघन केले आहे. त्यांनी अशी चिथावणीखोर कृत्ये केल्यास त्याचे परिणाम त्यांना भोगावे लागतील. फिलिपाइन्सने म्हटले आहे की चिनी जहाजे आपल्या हद्दीत धोकादायक चाली खेळत आहेत. यावेळी फिलिपाइन्सच्या जहाजांची टक्कर झाली आणि त्यात त्यांच्या दोन जहाजांचे नुकसान झाले.

## दिल्लीत इमारतीवरून AC पडला, तरुणाचा मृत्यू

**नवी दिल्ली**

दिल्लीतील करोल बाग भागात एका इमारतीच्या दुसऱ्या मजल्यावरून एअर कंडिशनर युनिट पडल्याने एका तरुणाचा मृत्यू झाला. एकजण जखमी झाला आहे. ही घटना शनिवारी (१७ ऑगस्ट) सायंकाळी ७ वाजण्याच्या सुमारास घडली. त्याचा व्हिडिओ आता सोशल मीडियावर आला आहे.बिल्डिंगच्या खाली एक मुलगा स्कूटरवर बसल्याचे व्हिडिओमध्ये दिसत आहे. त्याच्या शेजारी त्याचा एक मित्र उभा होता. दोघे बोलत होते. त्यानंतर दोघांनी एकमेकांना मिठी मारली. त्यानंतर अचानक एसीचे आऊटडोअर युनिट तरुणाच्या डोक्यावर पडले. या अपघातात दोन्ही मित्र जखमी झाल्याचे पोलिसांनी सांगितले. त्याला जवळच्या रुग्णालयात नेण्यात आले, तेथे स्कूटरवरील तरुणाला मृत घोषित करण्यात आले.